पुणे, गुरुवार, २४ जुलै २०२५ · RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 236 · वर्ष ४ थे, अंक २३६ · किंमत ₹ ६ · पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




दिव्यांगाना मिळणार 'राजाश्रय'...!
P३



भारताच्या पोरींनी इतिहास रचला!
१२

# इस्रो आणि नासाच्या उपग्रहाचे प्रक्षेपण

## ३० जुलै रोजी श्रीहरिकोटा येथून हवेत झेपावणार


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीहरिकोटा :** भारताची अंतराळ संस्था इस्रो आणि अमेरिकेची नासा यांनी एकत्रितपणे विकसित केलेला निसार (नासा-इस्रो सिंथेटिक एपर्चर रडार) हा महत्त्वाकांक्षी उपग्रह ३० जुलै रोजी श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित होणार आहे. सुमारे १३ हजार कोटी (१.५ अब्ज डॉलर) खर्चाच्या या प्रकल्पामुळे पृथ्वीच्या निरीक्षणात एक मोठी झेप घेण्यात येणार आहे.

दोन रडार बँड्सवर काम करणारा हा पहिला उपग्रह असून, नासाचा एल-बँड आणि इस्रोचा एस-बँड एकाच वेळी वापरणारा हा तो पहिलाच उपग्रह असून, त्याचे वजन २३९२ किलोग्रॅम इतके आहे. प्रक्षेपणासाठी इस्रोचा जीएसएलव्ही-एफ१६ या प्रक्षेपण यानाचा वापर करण्यात येईल. ७४३ किमी उंचीवरची सूर्य-समकालिक कक्षा असेल. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे प्रत्येक १२ दिवसांनी उच्च-रिझोल्यूशन चित्रण तो करेल.

सिंथेटिक एपर्चर रडार हे एक विशेष प्रकारचे रेडार इमेजिंग तंत्रज्ञान आहे. हा उपग्रह मोठ्या भागाचे उच्च-रिझोल्यूशन चित्रण करू शकतो, अगदी ढग, धुके, वा अंधारातही. एक छोटासा रडार अँटेना, उपग्रहाच्या हालचालीमुळे मोठ्या अँटेना सारखा काम करतो,
» पान ७ वर






# पुण्यातून धावणार ४ नव्या 'वंदे भारत एक्सप्रेस'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणेकरांसाठी गुडन्यूज आहे. भारतीय रेल्वेने पुणे शहरातून लवकरच चार नवीन वंदे भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्या सुरू करण्याची घोषणा केली आहे. या नवीन गाड्यांमुळे पुणे शहर शेगाव, वडोदरा, सिकंदराबाद (हैदराबाद) आणि बेळगाव या महत्त्वाच्या शहरांशी थेट जोडले जाईल. या नव्या सेवांमुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरित्या कमी होणार असून, प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.

सध्या पुणे शहरातून पुणे-कोल्हापूर आणि पुणे-हुबळी या दोन वंदे भारत सेवा कार्यरत आहेत. या चार नव्या वंदे भारत गाड्यांच्या समावेशामुळे पुण्यातून धावणाऱ्या एकूण वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांची संख्या ६ पर्यंत वाढणार आहे, ज्यामुळे शहरांची कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

पुणे-शेगाव वंदे भारत: या प्रस्तावित मार्गावर दौंड, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे थांबे अपेक्षित आहेत. धार्मिक पर्यटकांना आणि भाविकांना मोठा दिलासा या मार्गामुळे मिळेल. कारण शेगाव हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध गजानन महाराज मंदिरासाठी ओळखले जाते.

पुणे-वडोदरा वंदे भारत: ही हाय-स्पीड रेल्वे लोणावळा, पनवेल, वापी आणि सुरत येथे थांबण्याची शक्यता आहे. पुणे आणि वडोदरा दरम्यानचा प्रवासाचा वेळ सध्याच्या ९ तासांवरून अंदाजे ६ ते ७ तासांपर्यंत कमी होईल.
» पान ७ वर




### तिकीट दर किती असू शकतो?

- या नवीन गाड्यांचे तिकीट दर मार्ग आणि श्रेणीनुसार अंदाजे १५०० ते २००० रुपयांच्या दरम्यान अपेक्षित आहेत. या वंदे भारत गाड्यामध्ये एर्गोनॉमिक सीटिंग, स्वयंचलित दरवाजे, ऑनबोर्ड वाय-फाय, आधुनिक स्वच्छतागृहे आणि प्रगत सुरक्षा प्रणाली यांचा समावेश आहे.

## ओसाड गावची पाटीलकी जाणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना वादग्रस्ते विधाने भोवण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषिखाते काढून घेण्याच्या विचारात असल्याचे कळते. माणिकराव कोकाटे यांना विधान परिषद सभागृहात रमी खेळण्याचे प्रकरण चांगलेच महागात पडणार आहे. आपल्या आधीच्या वक्तव्यांवर स्पष्टीकरण देताना कोकाटे यांनी शासनाला भिकारी म्हटल्याने राज्य सरकारची प्रतिमा मलिन झाल्याने त्यांच्याकडून कृषि खात्यासारखे अतिशय महत्त्वाचे खाते काढून घेण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली
» पान ७ वर

# हिंजवडी घेणार मोकळा श्वास

## वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी १६६ अतिक्रमणे हटवली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हिंजवडी आणि आसपासच्या परिसरात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सक्रिय झाले आहे. पीएमआरडीएने सुरू केलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेंतर्गत गेल्या १५ दिवसांत तब्बल १६६ अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान अनेक नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करत स्वतःहून आपली अनधिकृत बांधकामे काढून घेतली आहेत.

हिंजवडी हा पुण्यातील एक महत्त्वाचा आयटी हब असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पीएमआरडीएने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. या कारवाईत एकूण १६६ अतिक्रमणांवर कार्यवाही करण्यात आली, ज्यामुळे वाहतुकीसाठी अधिक मोकळी जागा उपलब्ध झाली आहे.



पीएमआरडीएने केवळ कारवाई करून थांबले नसून, उपाययोजना सुरू केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्मशान भूमी रोड, वाकड रोड, फेज १ रोड तसेच हिंजवडी-माण आणि मारुंजी रोड भागात देखील सर्वेक्षण सुरू केले आहे. याचा उद्देश भविष्यातील अतिक्रमणे ओळखून त्यावर वेळेत कार्यवाही करणे हा आहे. या संपूर्ण कार्यवाहीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी पीएमआरडीएने एक केंद्रीय नियंत्रण यंत्रणा उभारली आहे. ही यंत्रणा संपूर्ण कारवाईचे समन्वय साधेल आणि पुढील नियोजन करेल.

## अल- कायदाच्या ४ संशयितांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदाबाद :** गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाने अर्थात एटीएसने अल-कायदा या कुख्यात दहशतवादी संघटनेशी संबंधित चार संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. एटीएसचे डीआयजी सुनील जोश यांनी याबाबत माहिती दिली. त्यापैकी दोघांना गुजरातमधून, एकाला दिल्लीतून आणि एका दहशतवाद्याला नोएडामधून अटक करण्यात आली आहे. हे चौघेही अल-कायदाच्या विचारसरणीचा प्रचार करत होते. हे दहशतवादी बऱ्याच काळापासून सक्रिय होते. गुजरात एटीएसला एक गुप्त माहिती मिळाली. त्यानंतर एटीएसने तपास सुरू केला. योग्य कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. एटीएसच्या मते, ते सोशल मीडियाद्वारे
» पान ७ वर

# न्यायमूर्ती वर्मा प्रकरणी सुनावणीतून सरन्यायाधीशांची माघार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या कथित रोख रकमेच्या प्रकरणात भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी स्वत:ला सुनावणीपासून अलग केलं आहे. गवईंनी स्पष्ट केलं, "या प्रकरणात मी याआधीही सहभागी झालो होतो, त्यामुळे आता सुनावणीमध्ये सहभागी होणं योग्य नाही." १४ मार्च रोजी दिल्लीतील न्या. यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी लागलेल्या आगीत ५०० रुपयांच्या जळालेल्या नोटांचे पोते सापडले होते. या प्रकरणानंतर अंतर्गत चौकशी समितीने जस्टिस वर्मा
» पान ७ वर

### वर्मा यांच्या याचिकेतील ५ मुख्य प्रश्न

- रोख रक्कम कोणी, कधी आणि कशी ठेवली?
- एकूण किती रक्कम होती?
- रक्कम खरी होती का?
- आग लागण्याचं कारण काय?
- वर्मा १५ मार्च रोजी ती रक्कम हटवण्यास जबाबदार होते का?



### महत्त्वाचे १० तर्क

- महाभियोगाची शिफारस अनुच्छेद १२४ आणि २१८ चं उल्लंघन करते.
- १९९९ ची 'इन-हाउस' पद्धत ही प्रशासकीय असून ती कायदेशीर किंवा घटनात्मक नाही.
- चौकशी समिती अनुमानावर आधारित होती, कोणतीही ठोस तक्रार नव्हती.
- २२ मार्च रोजी प्रेस नोटमधून आरोप सार्वजनिक झाले – त्यामुळे मीडिया ट्रायल.
- साक्षीदारांशी वर्मा यांच्या अनुपस्थितीत चौकशी.
- सीसीटीव्ही फुटेज पुरावा म्हणून विचारात घेतले गेले नाही.
- नोटांची सत्यता, कोणी ठेवली, आग कशी लागली – हे प्रश्न दुर्लक्षित.
- समितीचा अहवाल अनुमानांवर आधारित.
- अहवाल मिळाल्यानंतर लगेच वर्मा यांना राजीनामा द्यावा की महाभियोग सामोरा जावा – असा इशारा.
- अहवाल माध्यमांत लीक – प्रतिमेला मोठा धक्का.

## हिंमत असेल तर राजीनामा घेऊन दाखव- कदम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रत्नागिरी :** शिवसेना विरुद्ध शिवसेना उबाठा हा वाद आता नवा राहिला नाही. त्यातूनच दोन्ही पक्षातील नेतेही एकमेकांविरुद्ध लढताना पाहायला मिळतात. आमदार अनिल परब आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यात सध्या चांगलीच जुंपली आहे. मुंबईतील सावली डान्स बार हा गृहराज्यमंत्र्यांच्या मातोश्रींच्या नावावर असल्याचा गंभीर आरोप अनिल परब यांनी केला होता. त्यानंतर, राजकीय द्वेषापोटी हे आरोप करण्यात आल्याचं योगेश कदम यांनी म्हटलं. मात्र, अनिल परब यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन डान्सबार हा योगेश कदम यांच्याच मातोश्रींचा
» पान ७ वर

# कांदा खरेदीबाबत ग्राहक विभागाचा मोठा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कांदा उत्पादकांसंदर्भात मोठी बातमी आली असून, दरवर्षी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन घेतले जाते. या पार्श्वभूमीवर ग्राहक विभागानं मोठा निर्णय घेतला आहे. ग्राहक विभागातर्फे जवळपास ३ लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार आहे. कांद्याची ही खरेदी बाजार समितींनी करण्याबाबत आपण सांगितल्याची माहिती मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे.

कांद्याची लोकांसमोर खरेदी झाल्यास चांगला भाव मिळेल या उद्देशाने ही खरेदी पारदर्शकपणे देखील करण्यात येणार असल्याची माहिती जयकुमार रावल यांनी दिली आहे. यात चुकीचे काही झाल्यास कठोर करावाई करण्यात येईल अशी माहितीही जयकुमार रावल यांनी दिली. कांद्याची खरेदी ही बाजार समित्यांच्या मार्फत व्हावी असा आग्रह आम्ही केंद्र सरकारडे केल्याची माहिती रावल यांनी दिली आहे. लोकांसमोर खरेदी झाली तर दर वाढण्याची शक्यता आहे.




केंद्र शासनाच्या केंद्रीय ग्राहक संरक्षण, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय हे 'नाफेड' व 'एनसीसीएफ'या केंद्रीय नोडल संस्थेमार्फत कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून
» पान ७ वर

# महाराष्ट्रात निवडणूक चोरलीच - राहुल गांधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्रातील निवडणूकांवरून टीकास्त्र डागले आहे. महाराष्ट्रातील निवडणूक भाजपने मतांचा घोळ करून जिंकल्या, असा पुनरूच्चार राहुल गांधींनी केला आहे. मतांमध्ये घोळ कसा केला जातो, याचे पुरावे हाती लागल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच याबाबत निवडणूक आयोगाकडे पुराव्यांसह सादरीकरण करणार असल्याचेही राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात एक कोटी नवीन मतदार दिसून आले. त्यांच्याद्वारे भाजपने मतांचा घोळ करून



महाराष्ट्रातील निवडणूक जिंकली. कर्नाटकात आम्ही ही चोरी पकडली आहे. मी तुम्हाला, इलेक्शन कमिशनला हे अगदी ब्लॅक अँड व्हाईट रुपात स्पष्टपणे ही मतचोरी कशी होते ते दाखवून देऊ. आमच्या हातात पुरावे आहेत. त्यांनाही ते कळून चुकले आहे की
» पान ७ वर

# रविवारपासून तीन दिवस रंगणार 'शि. द. १००' महोत्सव

### महोत्सव

**यानिमित्त मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी संध्याकाळी ६.०० वाजता 'शिदं'चा हृद्य नागरी सत्कार सोहळा बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार आहे. या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मूर्तिशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर उपस्थित रहाणार आहेत. या विशेष सत्कार सोहळ्यात शिदंच्या शतकी वाटचालीला समर्पित 'हसरी सेंच्युरी' हा विशेष दृक श्राव्य कार्यक्रम सादर होणार आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवराम दत्तात्रय फडणीस अर्थात सर्वांचे लाडके ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस दिनांक २९ जुलै रोजी वयाची शंभर वर्षे पूर्ण करीत आहेत. ही घटना जगातील कलाविश्वासाठी एक मणिकांचन योग आहे. 'शिदं'च्या रुपाने भारतातला एकमेव सक्रिय व्यंगचित्रकार शतकी वाटचाल पूर्ण करीत आहे. यानिमित्त वसुंधरा क्लब व कार्टूनिस्ट्स कम्बाइन यांच्या संयुक्तपणे 'सुहाना आयोजित' शि. द. १००'हा तीन दिवसांचा भव्य महोत्सव दिनांक २७ ते २९ जुलै दरम्यान रगंणार आहे. हा महोत्सव 'कोहिनूर कट्टा व कहिनूर ग्रुप'प्रस्तुत करीत असून, पु. ना. गाडगीळ अँण्ड सन्स लि. आणि रेवा डायमंड्स यांच्या सहयोगाने महोत्सव होत आहे.

यानिमित्त शि. द. फडणीस यांचा हृद्य नागरी सत्कार देखील करण्यात येणार आहे, अशी माहिती या महोत्सवाचे निमंत्रक आणि प्रविण मसालेवाले ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन राजकुमार चोरडिया, महोत्सवाचे स्वागताध्यक्ष आणि कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल, महोत्सव संयोजक आणि वसुंधरा क्लबचे वीरेंद्र चित्राव, महोत्सव संयोजक आणि कार्टूनिस्ट्स कम्बाइनचे चारुहास पंडित यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी 'शि.द. १००´ या महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या करण्यात आले. सर्वांसाठी विनामूल्य खुल्या असलेल्या
» पान ७ वर

#रा



## कोंढव्यात दुकानावर कोयत्यांसह हल्ला

**पुणे :** कोंढवा परिसरात एका दुकानावर कोयत्यांसह हल्ला करत काही अज्ञात व्यक्तींनी दुकानातील वस्तूंची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करत परिसरात दहशत निर्माण केली. ही घटना रविवारी रात्री घडली असून, याप्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

फरमान अन्सारी (वय २८, रा. शांग्रीला अपार्टमेंट, कोंढवा खुर्द) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, अरमान इलियास शेख याच्यासह पाच ते सहा जणांनी एकत्र येत हल्ला केला. घटना कोंढव्यातील युनिटी पार्क रोडवरील बैतुल उलूम मदरशासमोरील 'अमन मार्केट' या दुकानात रात्री सुमारे ९.३० वाजता घडली.

घटनेच्या वेळी फिर्यादी अन्सारी, त्यांचे मित्र शेहजाद अन्सारी, झिशान आणि भाऊ जावेद अन्सारी हे दुकानात उपस्थित होते. तेव्हा अरमान शेख आणि त्याचे साथीदार तेथे पोहोचले. त्यांनी हातातील धारदार शस्त्रांचा वापर करत दुकानातील फ्रिज, चॉकलेटच्या बरण्या, फरसाण व अन्य वस्तूंची तोडफोड केली. फ्रिजची काच फोडून त्याचेही नुकसान केले. त्यानंतर या टोळक्याने हवेत कोयते फिरवत परिसरात दहशत पसरवली.या गोंधळात मुनावर इक्बाल खान यांच्या रिक्षावर कोयता चालवत रिक्षाचेही नुकसान करण्यात आले. हल्लेखोर त्यानंतर दुचाक्यांवरून जे.के. पार्कच्या दिशेने पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक शिवराज खराडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## पांचभौतिक चिकित्सावर वैद्यकीय परिषद

**पुणे :** वैद्यराज दातार पांचभौतिक चिकित्सा व संशोधन केंद्र सांगली, आयडीआरए भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट




वाघोली व सेंटर ऑफ एक्सलन्स, आयुष विभाग पुणे विद्यापीठ या चार संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पांचभौतिक चिकित्सा या आयुर्वेदातील विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील दोनदिवसीय वैद्यकीय परिषद आयोजित केली होती. ही परिषद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पार पडली. परिषदेत भारतभरातून ४०० हून अधिक वैद्य विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी संशोधक उपस्थित होते. यावेळी आयुष विभागाचे डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. कौस्तुभ उपाध्याय, डॉ. तनुजा नेसरी, डॉ. राकेश शर्मा, सदानंद सरदेशमुख, वैद्य प्रशांत सुरु, गिरीश टिल्लू व सुहास जोशी उपस्थित होते.

## रोटरी क्लब कर्वेनगरच्या अध्यक्षपदी नितीन महाजन

**पुणे :** रोटरी क्लब कर्वेनगरच्या अध्यक्षपदी नितीन महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मावळते अध्यक्ष दीपक थिटे यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्वीकारली. तसेच सचिवपदी प्रभाकर वावगे यांची नियुक्ती करण्यात आली. मृत्युंजय सोसायटीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी नियोजित प्रांतपाल चारुचंद्र श्रोत्री, सहाय्यक प्रांतपाल स्वाती मुळे व रोटरी पदाधिकारी उपस्थित होते. महाजन यांनी आगामी काळात, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण आदी विषयांवर विविध समाजोपयोगी प्रकल्प राबविणार असल्याचे सांगितले.

## 'पीएमपी' अध्यक्षपदाचा देवरेंनी पदभार स्वीकारला

**पुणे :** पीएमपीच्या अध्यक्षपदाचा पदभार पंकज देवरे यांनी सोमवारी स्वीकारला. सह व्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत केले. दीपा मुधोळ मुंडे यांच्या जागी देवरे यांची नियुक्ती झाली आहे. पंकज देवरे हे महाराष्ट्र राज्याच्या प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी आहेत. यापूर्वी ते लातूर जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. नुकतीच त्यांची 'आयएएस'साठी पदोन्नती झाली. पीएमपीच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर देवरे यांनी सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली. यात त्यांनी तीन मुद्यांवर चर्चा करून विभाग प्रमुखांना काही आदेश दिले आहेत.

## पत्रकार गोळवळकर यांना पत्रकार संघाची श्रद्धांजली

**पुणे :** पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी सरचिटणीस, 'सकाळ'चे विशेष प्रतिनिधी अमित गोळवलकर यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भावना व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

पत्रकार संघातर्फे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले, पुणे श्रमिक पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष शैलेश काळे आणि दिवंगत पत्रकार अमित गोळवलकर यांचे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी गोळवलकर यांचा मुलगा अॅड. अथर्व गोळवलकर, शैलेश काळे, मनोज एरंडे, निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त राजेंद्र भामरे, राजेंद्र जोशी, ज्येष्ठ पत्रकार आनंद आगाशे, अभय कुलकर्णी, स्वप्नील पोरे, कल्पना खरे, नम्रता वागळे, अंजली खमीतकर, सुनीत भावे, स्वप्नील बापट, मिलिंद वाडेकर, भाजपचे प्रवक्ते संदीप खर्डेकर यांनी भावना व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शोकसंदेशाच्या माध्यमातून गोळवलकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. गोळवलकर हे क्राईम आणि क्रीडा वार्ताहर होते. त्यांनी वृत्तपत्रासह वृत्तवाहिनीतही कामाचा ठसा उमटवला. टिळक जलतरण तलावाचे सचिव म्हणून त्यांनी भरीव काम केल्याचे मोहोळ यांनी नमूद केले.

## मायेच्या 'पांघरुणा'ची 'एकता'...!



पुणे अरण्येश्वर येथील एकता मित्र मंडळाने केवळ उत्सव साजरा करण्यावर भर न देता झोपडपट्टीतील रहिवाशांना पावसाळी रेनकोटचे वाटप करत अन्य गणेशोत्सव मंडळाच्या समोर एक नवा आदर्श उभा केला आहे. मंडळाचे अध्यक्ष सुधीर ढमाले यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

## पावसात निराधारांना मायेचा आधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सामाजिक बांधीलकी जपली जावी आणि उत्सवाच्या माध्यमातून समाजातील बंध आणखी दृढ व्हावेत; यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरु केला. याच गणेशोत्सवाला राज्य शासनाने आता 'राज्य महोत्सव' असा दर्जा दिला असून त्यामुळे गणेशोत्सव मंडळातील एकोपा आणखीनच बळकट झाला आहे. मात्र; त्यापुढेही जाऊन अरण्येश्वर येथील एकता मित्र मंडळाने झोपडपट्टीतील रहिवाशांना पावसाळी रेनकोटचे वाटप करत अन्य गणेशोत्सव मंडळाच्या समोर एक नवा आदर्श उभा केला आहे. मंडळाचे अध्यक्ष सुधीर ढमाले यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येत आहे; दर चतुर्थी अन्नदान सेवा एकत्रित संकल्प देणगीतून स्वारगेट, शंकर महाराज मठ, कात्रज, शनिपार व मार्केट यार्ड अशा विविध ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन निराधार व गरजूंना त्यांच्या आरोग्याची काळजी कारणास्तव शंभरहून अधिक पावसाळी रेनकोट वाटप करण्यात आले.मंडळाचे कार्यक्षम कार्यकर्ते देवांग करकंडे, प्रथमेश शिंदे, आदर्श चावट, हेरंब ढमाले, हर्षद खंडागळे, यश वायकर, चैतन्य बोबडे यांनी हे कार्य हाती घेऊन तडीस नेले.

# 'गुण' उधळणे आता महागात...!

### कामांच्या गुणवत्तेचे 'मोजमाप': पालिका प्रशासनाचा निर्णय

तब्बल साडेतीन वर्षांहूनही अधिक काळ महापालिकेत 'प्रशासकराज' कार्यरत आहे; त्यामुळे प्रशासनातील अधिकारी चांगलेच बेताल झाले असून विकासकामांची गुणवत्ता दिवसेंदिवस अधिकच ढासळत चालली आहे. परंतु त्यांच्यावर राजकर्त्यांचा अथवा नगरसेवकांचा वचक नसल्याने त्यामध्ये अधिकच वाढ होत आहे; त्यातूनच प्रशासनाची प्रतिमा मलीन होत आहे. त्याची आता वरिष्ठ पातळीवर गंभीर दखल घेतली आहे, प्रशासनातील 'दबंग' अधिकारी अशी प्रतिमा असलेल्या आयुक्त नवलकिशोर राम यांनी या बेतालांना सूतासारखे सरळ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रत्येक विकासकामांच्या गुणवत्तेचे त्रयस्थ संस्थेच्या माध्यमातून 'मोजमाप' करण्याचे फर्मान त्यांनी सोडले आहे.



> महापालिकेकडे पीएमसी केअर, आपले सरकार, अभ्यागत कक्ष व लेखी तक्रारींमार्फत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात येत आहे. गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. असा संदेश प्रशासनाने या निर्णयातून दिला आहे.
> **-नवलकिशोर राम,** आयुक्त, पुणे महापालिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या विविध विभागांद्वारे करण्यात येणाऱ्या विकास कामांची तांत्रिक गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी, भारत सरकारच्या उपक्रम असलेल्या इंजिनिअर्स इंडिया लिमिटेड या त्रयस्थ संस्थेमार्फत गुणवत्ता तपासणी बंधनकारक करण्यात आली आहे. मात्र, काही विभागांकडून या आदेशाचे पालन न करता स्वतंत्ररित्या इतर संस्थांकडून तपासणी करून घेतली जात असल्याचे समोर आले आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे.

आयुक्तांनी सांगितले की, ५ लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विकास कामांसाठी कायएल कडूनच गुणवत्ता तपासणी करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेपासून दुरुस्ती आणि देखभाल विषयक कामांना वगळण्यात आले असून, उर्वरित सर्व विकास प्रकल्प ईआयएल कडून तपासले गेले पाहिजेत. ही अट मार्च २०२५ अखेरपर्यंत सक्तीची आहे. महापालिकेच्या स्थायी समितीने यास मान्यता दिलेली असून, महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ५(२)(२) नुसार ही प्रक्रिया बंधनकारक आहे.

तथापि, अनेक वेळा खात्यांकडून ईआयएल कडून तपासणी न करता इतर संस्थांची मदत घेतल्याचे वा कोणतीही तपासणी न करता थेट निविदा प्रक्रियेला गती दिल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारची पद्धत प्रशासनाच्या शिस्तीला बाधा पोहोचवणारी आहे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर, आयुक्तांनी निर्देश दिले आहेत की, अपवादात्मक परिस्थितीतच EIL कडून तपासणी शक्य नसेल, तर खात्याने संबंधित अतिरिक्त महापालिका आयुक्तांची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील. त्याशिवाय थेट अन्य संस्थांकडून तपासणी केल्यास ती नियमभंग मानली जाईल.

याशिवाय, सर्व अतिरिक्त महापालिका आयुक्तांना त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, परीमंडळे आणि मुख्य खात्यांतील विकास कामांपैकी किमान १० अथवा १० टक्के निविदा प्रकरणांची (जे अधिक असेल) निवड करून दक्षता विभागामार्फत प्रत्यक्ष तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित कामांची गुणवत्ता समाधानकारक नसल्यास, कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता व खातेप्रमुख यांच्यावर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आयुक्त नवल किशोर राम यांनी दिला आहे.

# कर्करोग नियंत्रणासाठी उपायोजना कराव्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिलांमध्ये कर्करोगाच्या वाढत्या संख्येबाबत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी सोमवारी संसदेत लक्ष वेधले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सत्रात महिलांमधील वाढत्या कर्करोगाबाबत चिंता व्यक्त करत कर्करोग नियंत्रणासाठी शासनाने प्रतिबंधात्मक उपायोजना त्वरित कराव्यात, अशी मागणी केली.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, हिंगोली जिल्ह्यात अलीकडेच झालेल्या 'संजिवनी' आरोग्य तपासणी मोहिमेत २.९३ लाख महिलांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १४,५०० महिलांमध्ये कर्करोगाची लक्षणे आढळून आली आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून, ग्रामीण आणि वंचित भागांमध्ये वेळेवर निदान, त्वरित उपचार आणि सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी मोहिमा स्तुत्य असल्या तरी त्या केवळ पहिला टप्पा असून, त्यानंतरच्या उपचार, फॉलोअप आणि वैद्यकीय पायाभूत सुविधांचा अभाव मोठा अडथळा ठरतो, असे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने काही तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी त्यांनी केली.

डॉ. कुलकर्णी यांनी स्थानिक आरोग्य केंद्रांमध्ये मॅमोग्राफी, गर्भाशय मुख तपासणी व बायोप्सीसारख्या निदान चाचण्यांसाठी अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना मांडली. त्याचप्रमाणे दुर्गम भागांमध्ये मोबाइल ऑन्कोलॉजी युनिट्स (कर्करोग निदान गाड्या) उप्लब्ध करून सुरुवातीच्या टप्प्यावरच निदान करण्याची गरज त्यांनी मांडली. महिलांमध्ये कर्करोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांची जाणीव व्हावी.



> महाराष्ट्रात २०२३ मध्ये १.२१ लाख नव्या कर्करोग रुग्णांची नोंद झाली असून, २०२१ मध्ये ही संख्या १.१८ लाख होती. ही वाढती आकडेवारी राज्यातील, विशेषतः ग्रामीण महिलांमधील कर्करोगाचे संकट अधोरेखित करते . ही एक 'मूक आरोग्य आपत्ती' आहे आणि त्यासाठी बहु-क्षेत्रीय, तातडीची आणि सातत्यपूर्ण कृतीची गरज आहे.
> **-प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी,** खासदार राज्यसभा

# ओला, उबेर, रॅपिडो यांच्या भाडेवाढीवर चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ओला, उबेर, रॅपिडो यांसारख्या अॅप-आधारित प्रवासी वाहतूक सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडून ऑटो, टॅक्सी आणि कॅब चालकांचे होणारे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी आणि त्यांच्या भाडेवाढीच्या मागणीवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी आज परिवहन आयुक्त कार्यालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

अतिरिक्त परिवहन आयुक्त भारत कळसकर यांच्यासोबत झालेल्या या बैठकीत १४ प्रमुख संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुंबईतील परिवहन आयुक्त कार्यालयात झालेल्या या बैठकीत ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे, ज्येष्ठ कामगार नेते उदयजी आंबोणकर, महाराष्ट्र अॅप बेस युनियन अध्यक्ष प्रशांत उर्फ बंटी सावडेकर, मा साहेब कॅब संघटना अध्यक्ष वर्षाताई शिंदे पाटील, महाराष्ट्र राज्य कामगार संघ अॅप बेस ट्रान्सपोर्ट युनियनचे अध्यक्ष रिजवान शेख, महाराष्ट्र टुरिस्ट टॅक्सी संघटना अध्यक्ष बिरुदेव पालवे, या बैठकीला उपस्थित होते.

अतिरिक्त परिवहन आयुक्त भरत कळसकर यांनी ओला, उबेर, रॅपिडो आणि इतर संबंधित कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्रपणे चर्चा केली.



पुणे ओला, उबेर, रॅपिडो यांसारख्या अॅप-आधारित प्रवासी वाहतूक सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडून ऑटो, टॅक्सी आणि कॅब चालकांचे होणारे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी आणि त्यांच्या भाडेवाढीच्या मागणीवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी आज परिवहन आयुक्त कार्यालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

# बंधुतेचा विचार करतो दुभंगणाऱ्या समाजाला जोडण्याचे काम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जातीधर्माच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून जगण्याची ऊर्जा बंधुता देते. बंधुतेची कास धरल्याशिवाय समतेचे मूल्य रुजणार नाही. विषमतेचा अंधकार दूर व्हायचा असेल, तर बंधुता मनामनात रुजायला हवी. कारण दुभंगणाऱ्या समाजाला सांधायचे असेल, तर बंधुतेचा विचार प्रत्येकाने जपायला हवा," असे प्रतिपादन बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी केले.

विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या वतीने पुढील महिन्यात आयोजिलेल्या बाराव्या विद्यार्थी-शिक्षक साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षपदी डॉ. अविनाश सांगोलेकर व स्वागताध्यक्षपदी डॉ. पांडुरंग भोसले यांची निवड झाल्याबद्दल काषाय प्रकाशन व बंधुता प्रकाशन यांच्या वतीने दोघांचाही सत्कार करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी कार्यक्रमावेळी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्रा. शंकर आथरे, प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया, बंधुता प्रकाशनाच्या मंदाकिनी रोकडे आदी उपस्थित होते.

प्रकाश रोकडे म्हणाले, "देशविदेशांतील सर्व भाषांतील साहित्य प्रवाहांना सामावून घेण्याची क्षमता विश्वबंधुता साहित्यात आहे. म्हणूनच देश महान आहे. सर्व साहित्य प्रवाहांचा मूळ उद्देश हा माणसा-माणसात बंधुभाव निर्माण करण्याचाच आहे. डॉ. पांडुरंग भोसले यांनी आदर्श व्यक्तिमत्त्वांच्या योगदानावर देशाचे भविष्य असते. भारतातील महापुरुषांनी आपल्यासमोर ठेवलेल्या आदर्शांवर वाटचाल करण्याची गरज आहे, असे सांगितले. प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया, प्रा. चंद्रकांत वानखेडे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. शंकर आथरे यांनी प्रास्ताविक केले. संगीता झिंजुरके यांनी सूत्रसंचालन केले. मंदाकिनी रोकडे यांनी आभार मानले.

> "बंधुता ही कृतितून जगण्याची गोष्ट आहे. बंधुतेचे मूल्ये जनमानसात रुजावे, यासाठी आयुष्याची ५० वर्षे खर्ची घालणारे प्रकाश रोकडे व बंधुता परिवाराचे कार्य कौतुकास्पद आहे. बंधुतेचा विचार विश्वव्यापी असून, समाजामध्ये स्थैर्य टिकवायचे असेल, तर आपल्याला बंधुता जपायला हवी. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यातून बंधुतेचे महत्व अधोरेखित होते.
> **-डॉ. अविनाश सांगोलेकर;** नियोजित अध्यक्ष विद्यार्थी शिक्षक साहित्य संमेलन

## चंद्रकांतदादांच्या हस्ते दिग्गजांचा सन्मान



**पुणे :** गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने राज्याच्या उच्च शिक्षणमंत्र्यांनी विविध क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेल्या समाजगुरुंचा सन्मान करावा या संकल्पनेतून सुरू झालेल्या कार्यक्रमाचे यंदा तिसरे वर्ष आहे. त्यानिमित्ताने येत्या शनिवार, २६ जुलै राजी सायं. ४ वाजता कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात (कर्वे नगर) होणाऱ्या सोहळ्यात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

यामध्ये भारतीय हवाई दलाचे निवृत्त उपप्रमुख एअर मार्शल भूषण गोखले, ज्येष्ठ निरुपणकार डॉ. शंकर अभ्यंकर, पुण्यात हायड्रोजनवरील बसची निर्मिती करणारे प्रसिद्ध उद्योजक डॉ. रवी पंडित, भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष आणि प्रसिद्ध लेखक - विचारवंत माधव भांडारी, पुणे आयसरचे संचालक डॉ. सुनील भागवत, स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सचे (डिक्की) संस्थापक पद्मश्री मिलिंद कांबळे, जुन्या पिढीतील अभिनेत्री निर्मलाताई गोगटे, नाट्यसंगीताच्या क्षेत्रातील प्रसिद्ध गायिका आशाताई खाडिलकर, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुणे शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, दिव्यांगांसाठी सातत्याने कार्यरत असणारे जनसेवा बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, गुडविल इंडियाचे कालिदास मोरे आदिंचा सन्मान या सोहळ्यात होणार आहे. या कार्यक्रमास अधिकाधिक पुणेकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन या सोहळ्याचे समन्वयक भालचंद्र कुलकर्णी यांनी केले.

# ‘एफसी’ रस्त्यावर परप्रांतीयांचा ‘संसार’...!

## रात्री उशीरापर्यंत बेकायदा व्यवसायाला ऊत : सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; आमदार सिद्धार्थ शिरोळे यांचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज रस्ता हा शहराची शान असणारा भाग आहे. अलीकडच्या काळात या ठिकाणी रात्री उशिराने येऊन बेकायदेशीरपणे विक्री करण्याचे प्रकार वाढले आहे. हे विक्रेते बाहेरील लोक आहेत, त्यामुळे शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी महानगरपालिका आणि पोलीस आयुक्त यांच्याकडे केली आहे. देशातील कुठल्यातरी राज्याच्या नावावर बेकायदेशीररीत्या भारतात आलेले आणि पुणे शहरात फर्ग्युसन रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या लोकांमुळे सुरक्षिततेचे प्रश्न उपस्थित होत असतील तर त्यांना विरोध केला जायलाच हवा, असेही त्यांनी नमूद केले.

नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात शिरोळे यांनी उपस्थित केलेल्या शहरातील महत्त्वाच्या प्रश्नांबाबत माहिती देण्याकरीता आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना शिरोळे बोलत होते.

शिवाजीनगर बसस्थानकाविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शिरोळे म्हणाले, बसस्थानकाच्या विकासाचे काम हे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या माध्यमातून सुरु आहे. या ठिकाणी इन्व्हेस्टमेंट लिझ जर अधिक काळ ठेवता आले, तर त्याचा फायदा होणार आहे. सध्या त्यावर काम सुरु असून लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असताना हे काम रेंगाळले होते. आपण या कामात कोणताही खोडा घालत नसून हे काम मार्गी लावण्याचे पूर्ण प्रयत्न करत असल्याचे शिरोळे यांनी नमूद केले.

पुणे विद्यापीठ चौकात उभारण्यात आलेल्या पुलापैकी एका पुलाचे म्हणजे राजभवनापासून ते ईस्क्वेरकडे येणाऱ्या पुलाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. येत्या महिन्या अखेरपर्यंत हे काम पूर्ण होणार असून त्याचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्याचे नियोजन आहे. बाणेर आणि पाषाणकडे जाणाऱ्या पुलाचे काम देखील अंतिम टप्यात आले असून ते देखील लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती शिरोळे यांनी दिली. शिवाजीनगर येथील आकाशवाणी चौकातील मेट्रोचा खांब हा वाहतुकीसाठी अडथळा ठरत आहे, त्यामुळे त्यावर कोणता पर्याय काढता येईल, यावर चर्चा सुरु असून त्यावर लवकरच तोडगा निघेल, असा विश्वास शिरोळे यांनी व्यक्त केला. पावसाळी अधिवेशनात निर्णय घेण्याच्या दृष्टीने विधायक चर्चा झाल्या, चांगल्या प्रकारचे निर्णय या वेळी घेण्यात आले अशी माहितीही त्यांनी दिली.

पुण्यामध्ये ओव्हरहेड केबलचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे, त्यामुळे सरकारने त्याबाबतचे डक्ट पॉलिसी तयार करून त्याची सक्ती करण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा शिरोळे यांनी अधिवेशनात लावून धरला होता. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यासाठी समितीची स्थापना करून सरकार धोरण निश्चित करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुणे मेडिकल टुरिझम हब म्हणून विकसित करण्याची सूचना शिरोळे यांनी सरकारकडे केली.



> फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावर रात्री नऊ नंतर वेगळेच लोक येऊन लहान खोक्यांमध्ये विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री करत असतात, हे लोक स्थानिक नसून बाहेरून आलेले आहेत. इथे विक्री करण्याचा व्यवसाय ते बेकायदेशीरपणे करत आहेत, त्यामुळे शहराच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यामुळे त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी आपण महानगरपालिका आणि पोलीस आयुक्त या दोघांची भेट घेऊन त्यांच्याकडे केली आहे.
>
> **-आमदार सिद्धार्थ शिरोळे**

### पावसाळी अधिवेशनात केल्या या मागण्या...!

- *शहरांमध्ये अंडर फ्लायओव्हर रिडेव्हलपमेंट पॉलिसी करावी
- * शहरात अन्नधान्य वितरणात होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी पुण्यामध्ये पूर्णवेळ अन्नधान्य वितरण अधिकाऱ्याची नेमणूक
- * सायबर गुन्ह्याचा वाढता धोका लक्षात घेता शहरात पाच ठिकाणी सायबर पोलीस ठाणी निर्माण करण्याच्या प्रस्तावाला सरकारने तात्काळ मंजुरी द्यावी.
- * ऑनलाइन दाखले मिळण्यात विलंब होतो आणि विद्यार्थ्यांना महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियांमध्ये अडचण येते या करिता राज्य शासनाची वेबसाईटची क्षमता वाढवावी
- * शहरातील टेकड्यांवर टाकण्यात येणाऱ्या राडा रोडा थांबवण्यासाठी एक सर्वेक्षण करून असे प्रकार करणाऱ्यांवर कारवाई करावी
- * शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवताना त्याची देखभाल करण्याची यंत्रणा देखील उभी करण्यात यावी.
- * खाजगी जागेतील झाडांच्या फांद्या महानगरपालिकेकडून सवलतीच्या दारात तोडून मिळाव्यात



## उद्योजकांना मिळणार विविध योजनांचा लाभ

**पुणे :** पुण्यातील उद्योजक आणि स्वतंत्र व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना विविध शासकीय योजना, बँकांच्या योजना, वित्तीय संस्था देत असलेल्या योजना आणि शासकीय अनुदानाच्या योजना याबाबत माहिती देण्यासाठी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठा एन्त्रेप्रेनेऊर असोसिएशनच्या वतीने पुण्यात पहिल्यांदाच ‘लोन आणि सबसिडी एक्सपो-२०२५’ चे शुक्रवार दिनांक २५ रोजी, सकाळी १० ते सायं ७ पर्यंत,सिद्धी बँक्वेट,डीपी रोड,पुणे येथे आयोजन करण्यात आले आहे.सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य असणार आहे.अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विक्रम गायकवाड, सचिव सई बहिरट पाटील, उपाध्यक्ष नितीन भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला माजी अध्यक्ष अरुण निम्हण,उपाध्यक्ष विजय गवारे, प्रमोद साठे,खजिनदार राजेश कुराडे, कार्यकारिणी सदस्य आश्रम काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'आम्ही मुळशीकर' प्रतिष्ठानतर्फे गुणगौरव सोहळा



**पुणे :** 'आम्ही मुळशीकर' प्रतिष्ठानच्यावतीने १९ वा "शाब्बास" गुणगौरव सोहळ्याचे आयोजन २७ जुलै रोजी सायं. ६.०० वा. कोथरूड येथील उत्सव मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. १० वी, १२ वीतील यशवंत विद्यार्थांना शालेय उपयोगी वस्तू तसेच सन्मानचिन्ह देवून त्यांना गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे संयोजक ॲड. गणेश सातपुते यांनी दिली. सातपुते म्हणाले, की "शाब्बास" ही तीनच अक्षरे, काम करुन जातात विद्यार्थ्यांच्या पंखात, बळ देऊन जातात. विद्यार्थी वर्षभर अथक परिश्रम करून परिक्षेमध्ये यशस्वी होतात. पालकांना त्याचे समाधान असतेच. त्या समाधानात भोवतालचा समाजही सहभागी झाला तर तो आनंदोत्सव विद्यार्थ्यांच्या मनामध्ये कायम राहतो. 'आम्ही मुळशीकर' प्रतिष्ठानच्या माध्यमातून आम्ही गेल्या अनेक वर्षापासून हेच करीत आहोत. यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा हे त्याचेच प्रतिबिंब आहे. म्हणून मुळशी तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या समारंभास अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन आम्ही मुळशीकर प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी केले आहे.

## सीमेवरील जवानांना पाठविणार राख्या

**पुणे :** रावसाहेब चॅरिटेबल ट्रस्ट, प्रवर्तन फाउंडेशन आणि पाञ्चजन्य फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षाबंधनानिमित्त ‘सुरक्षाबंधन’ उपक्रम राबवण्यात येतो आहे. या उपक्रमाअंतर्गत काश्मीर सीमेवर तैनात जवानांसाठी ७५०० हून अधिक राख्या आणि २००० शुभेच्छापत्रे पाठवण्यात येणार आहेत. ही या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

या उपक्रमात सरस्वती विद्या मंदिर, विमलाबाई गरवारे प्रशाला, बाल शिक्षण इंग्लिश मीडियम शाळा, राणी लक्ष्मीबाई सैनिकी शाळा, एस. पी. एम. इंग्लिश स्कूल आदी शाळांचा सहभाग आहे. विशेष म्हणजे, दि पूना स्कूल अँड होम फॉर द ब्लाइंड गर्ल्स आणि वि. रा. रुईया मूकबधिर विद्यालय येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी राख्या तयार केल्या आहेत.

## समुपदेशकांसाठी ‘यशदा’ मध्ये प्रशिक्षण संपन्न

**पुणे :** महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित राज्यातील समुपदेशकांसाठी दोन दिवसीय क्षमताबांधणी प्रशिक्षणाचा समारोप सोमवारी झाला. यावेळी महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, ‘मिशन-शक्ती’अभियानाचे प्रमोद निकाळजे उपस्थित होते.

# दिव्यांगाना मिळणार ‘राजाश्रय’...!

### बच्चू कडूंचा ‘प्रहार’: निराधारांना ‘आसरा’

हाताने अथवा पायाने दिव्यांग असलेल्यांच्या नशीबी ‘फरफट’ पाचवीलाच पूजलेली असते; त्यातच समाजाकडून त्यांची नेहमीच अवहेलना होत असते. त्यामुळे त्यांना अपमानास्पद जीवन जगावे लागत असून ‘नको ते जगणे’ असे म्हणण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्यावर आली आहे; या दाहक परिस्थितीतून वाटचाल करत असतानाच बहुतांशी दिव्यांगाकडे जागाच नसल्याने त्यांना हक्काच्या घराचा ‘निवारा’ ही मिळत नव्हता. नव्हे नव्हे हे सुख त्यांच्या नशीबीच नव्हते. मात्र; माजी आमदार आणि दिव्यांगाचे नेते यांच्या मार्गदर्शनाखाली प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष धर्मेंद्र सातव पाटील यांनी जबरदस्त ‘प्रहार’ केल्याने त्यांना आता हक्काचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यासाठी आजतापर्यंत केलेल्या आंदोलनामुळे हजारो दिव्यांगाना ‘राजाश्रय’ मिळणार आहे.



> दिव्यांग हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक असून त्याला ‘माणूस’ म्हणून जगण्याचा हक्क आहे; याची जाणीव शासन आणि प्रशासनालाही आहे. त्यामुळेच त्यांना अधिकाअधिक सवलती देण्याचा शासन आणि प्रशासनाचा प्रयत्न आहे; त्याशिवाय यापुढील कालावधीत त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रशासनाचा अग्रक्रम असणार आहे.
>
> **-जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी; पुणे



> प्रशासनाचा हा निर्णय अतिशय कौतुकास्पद असून त्यामुळे हजारो दिव्यांगाना दिलासा मिळणार आहे. परंतु अद्यापही जिल्हास्तरावर पालकमंत्री आणि तालुका स्तरावर आमदारांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांग निधी खर्च समितीची स्थापना करण्यात आलेली नाही; त्यामुळे दिव्यांगासाठीचा पाच टक्के निधी खर्च होत नसल्याने ते या लाभापासून वंचित राहात आहेत.
>
> **-धर्मेंद्र सातव पाटील,** प्रदेशाध्यक्ष प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आश्वासन देऊनही दिव्यांगाच्या घराच्या संदर्भात कार्यवाही न झाल्याने माजी आमदार बच्चू कडू यांच्यासह शासन आणि प्रशासनाला या आश्वासनाचे ‘स्मरण’ करुन दिले आणि वेगळा मार्ग स्विकारण्याचा निर्वाणीचा इशारा दिला; त्यामुळे प्रशासन ताळयावर आले असून येत्या दीड ते दोन महिन्यात बेघर दिव्यांगाना घर बांधण्यासाठी एक गुंठा जागा देण्याचे आश्वासन खुद्द जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहे.

राज्यात दिव्यांगाची संख्या काही लाखांच्या आसपास आहे, परंतु त्यांना सवलती आणि त्यांच्या हक्काचे लाभ देण्यात राज्य शासन सपशेल अपयशी ठरले आहे.बेघर दिव्यांगाना त्यांच्या हक्काचा निवारा मिळावा यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाने शासन आणि प्रशासनाला जोरदार दणका दिला होता; प्रजासत्ताकदिनी केलेल्या जोरदार आंदोलनामुळे खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बेघर दिव्यांगाना एक गुंठा जागा देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्याची पूर्तता न झाल्याने आज कडू यांच्यासह प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष धर्मेंद्र सातव पाटील यांनी आज जिल्हाधिकारी डुडी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

त्यासाठी झालेल्या बैठकीत डुडी यांनी यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेत दिव्यांगाना घर बांधण्यासाठी एक गुंठा जागा त्यांच्या नावावर करुन देण्यास मान्यता दिली. यावेळी सुरेखा ढवळे, सुप्रिया लोखंडे, ज्योती हिवरे, विष्णू गुंडाळ, सचिन ओव्हाळ यावेळी उपस्थित होते. यावेळी कडू यांच्यासह सातव पाटील यांनी दिव्यांगाना नोकरी करणे शक्य नसल्याने त्यांना स्वंयरोजगारासाठी आर्थिक मदत मिळावी अशा मागण्या केल्या.

# हौसिंग सोसायट्याच तळीरामांचा ‘अड्डा’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून सिंहगड रस्त्यावरील उच्चभ्रू सोसायट्यांचा पारिसर म्हणजे तळीरामांसाठी ‘अड्डा’च बनला असून त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिक आणि विशेषत: महिला तसेच तरुणींना होत आहे. यासंदर्भात स्थानिक महिलांनी तक्रार केल्यानंतर मनसैनिकांनी या तळीरामांना अद्दल घडवित त्यांना थेट पोलीस ठाण्याचा रस्ता दाखविला;पोलीसांनीही त्याची गंभीर दखल घेतली असून असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत असा इशारा या तळीरामांना दिला आहे.

सिंहगड रोड, कांडगे पार्क, केतकी हौसिंग सोसायटी इथे काही महिन्यांपासून स्थानिक नागरिकांच्या तक्रारी येत होत्या. आमच्याकडे ते की इथे दुपारच्या आणि रात्रीच्या वेळेस चरस, अफिम, गांजा, एम.डी व इतर प्रकारचे ड्रग्सचे सेवन करून तरुण-तरुणी अश्लील चाळे करतात व येणाऱ्या जाणाऱ्या महिलांची व तरुणी ची चेड काळात असे, स्थानिक लोकांनी याची तक्रार अनेकदा सिंहगड रोड पोलीस ठाण्यात केली होती, ह्या सगळ्या गोष्टी होत असताना स्थानिक महिला, वृद्ध लोकं व लहान मुले/मुली यांना बाहेर पडणं अवघड झाले होते. त्यातला काही नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदधिकारी तन्मय मेमाणे आणि गौरव खेडेकर यांना संपर्क साधला, या दोघांनी तातडीने घटना स्थळी पोचून तिथे नशा करत असलेले तरुणांना हाकलून लावले.



> स्थानिक लोकांनी याची तक्रार अनेकदा सिंहगड रोड पोलीस ठाण्यात केली होती परंतु त्यांना काही यश आले नाही ह्या सगळ्या गोष्टी होत असताना स्थानिक महिला, वृद्ध लोकं व लहान मुले/ मुली यांना बाहेर पडणं अवघड झाले होते.त्यांना वठणीवर आणण्यास ‘मनसे’ला यश आले आहे.
>
> **-तन्मय मेमाणे** महाराष्ट्र नवनिर्माण सेना शाखाध्यक्ष, कोथरूड विभाग

# गुन्हेगारीला शहरातून पूर्णपणे हद्दपार करू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पोलीस दल संपूर्ण कार्यक्षमतेने शहराला शिस्तीत आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. यासाठी सर्वांचे प्रेम आणि विश्वास आम्हाला लाभत आहे. यामुळे आम्ही पुढील काळात गुन्हेगारीला शहरातून पूर्णपणे काढून हद्दपार करून टाकू, असे पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

शुक्रवार पेठेतील अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट चा म्हसोबा उत्सव महात्मा फुले मंडई, बुरुड आळी येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये सदाशिव पेठेतील महाराष्ट्र विद्यालयातील गरजवंत ५०० विद्यार्थ्यांना १ लाख २५ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला सद्गुरू मनोहर भोसले, राज्याच्या अंमलीपदार्थ विरोधी फोर्सचे पोलीस उपमहानिरीक्षक प्रवीण कुमार पाटील, परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, सहाय्यक पोलीस आयुक्त साईनाथ ठोंबरे, पोलीस निरीक्षक संतोष पांढरे, उद्योजक रवींद्र लुंकड, युवा उद्योजक संग्राम मुरकुटे, ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव यांसह लुंकड परिवार उपस्थित होता. आर.के.लुंकड हौसिंग फर्म चे संचालक रमणशेठ लुंकड यांचे विशेष सहकार्य या उपक्रमाला लाभले.




**पुणे** शुक्रवार पेठेतील अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट चा म्हसोबा उत्सव महात्मा फुले मंडई, बुरुड आळी येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये सदाशिव पेठेतील महाराष्ट्र विद्यालयातील गरजवंत ५०० विद्यार्थ्यांना १ लाख २५ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. यामध्ये ३ हजार फुलस्केप वह्या आणि ५०० पॅड चा समावेश आहे. यावेळी उपस्थित मान्यवर.

# माणिकरावांनी सोडावी ‘ओसाड गावची पाटीलकी’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शेतकऱ्यांच्या प्रश्नाप्रति इतके निष्काळजी असलेले कृषिमंत्री आपल्या महाराष्ट्राला नकोच... माणिकराव कोकाटे यांनी त्यांच्याच भाषेत "ओसाड गावची पाटीलकी" सोडून शेतकऱ्यांवर उपकार करावेत, मंत्री पदाचा राजीनामा द्यावा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रात सत्तेत असलेल्या तिन्ही पक्षांनी सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे, सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते हे आपल्या सर्वांना ज्ञात आहे. या आश्वासनाची पूर्तता करण्यास सरकार स्पष्टपणे नकार देत आहे. या असंवेदनशीलपणावर कळस म्हणून महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे लोकशाहीच्या पवित्र सभागृहात, म्हणजेच विधिमंडळात ऑनलाईन जुगार खेळताना चे चित्र सबंध महाराष्ट्राने बघितले आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेल्या या आंदोलनात प्रशांत जगताप यांनी तीव्र शब्दांत माणिकराव कोकाटे यांचा निषेध व्यक्त केला.यावेळी प्रशांत जगताप, जगन्नाथ शेवाळे, शेखर धावडे, फहीम शेख, रोहन पायगुडे, असिफ शेख, दीपक कामठे, राजू साने, योगेश पवार, पूजा काटकर, गौरव जाधव, फिरोज तांबोळी, प्राजक्ता जाधव, विमल झुंबरे, रुपाली शेलार, आशा साने यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> स्वतःच्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी माणिकराव कोकाटे महाराष्ट्राला भिकारी म्हणत आहेत. अशा व्यक्तीला महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात राहण्याचा काहीही अधिकार नाही. एकतर माणिकराव कोकाटे यांना पदावरून काढून टाका, किंवा महाराष्ट्राला जुगारी राज्य बनवण्यासाठी त्यांना थेट मुख्यमंत्री करा.
>
> **-प्रशांत जगताप,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीची ‘जादुई संजीवनी’...!

## सर्वसामान्य रुग्णांसह नातेवाईकांनाही ‘नवसंजीवनी’: सहा महिन्यात सतरा कोटींचा निधी; भार हलका




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचारासाठी अर्थसाहाय्य करण्यात येते. यावर्षी जानेवारीपासून आतापर्यंत या कक्षाद्वारे १७ कोटी रुपयांच्या निधीद्वारे पुणे शहर व जिल्ह्यातील संलग्न असलेल्या ४४५ खासगी रुग्णालयांत उपचार घेणाऱ्या १७८५ रुग्णांना मदत करण्यात आली आहे. महागड्या उपचारांनी सर्वसामान्यांना परवडत नसून या सहाय्यामुळे सर्वसामान्यांचा भार हलका झाला आहे.

हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, अस्थिमज्जा, हात, खुबा, गुडघा प्रत्यारोपण, अंतस्थ कर्णरोपण (कॉकलियर इम्प्लाँट) यासाठी ही मदत मिळते. त्याचबरोबर कर्करोग, अस्थिबंध शस्त्रक्रिया, नवजात शिशू, लहान बालकासंबंधित आजार, रस्ते अपघात, मेंदू आजार, हृदयरोग, डायलिसीस, जळीत रुग्ण आणि विद्युत अपघात, विद्युत जळीत रुग्ण या आजारपणासाठी मदत करण्यात येते. पुण्यात ४४५ रुग्णालयांमध्ये हे उपचार मिळतात. २५ हजार, ५० हजार, एक लाख, जास्तीत जास्त दोन लाख रुपयांचे आजारांनिहाय अर्थसाहाय्य करण्यात येते. उपचार पूर्ण होऊन डिस्चार्ज झालेल्या रुग्णाला हे अर्थसाहाय्य दिले जात नाही.

### पुण्यात येथे करा संपर्क

दुर्धर आजारावरील उपचारासाठी आर्थिक साहाय्य तसेच आपत्तीमध्ये देण्यात येणारे आर्थिक साहाय्य याबाबत नागरिकांना मार्गदर्शन मिळण्यासाठी जुनी जिल्हा परिषदेच्या इमारतीमधील तळमजल्यावर हा कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. डॉ. मानसिंग साबळे हे जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख आहेत. येथील ८०८७६७८९७७ या भ्रमणध्वनी क्रमांक तसेच cmrfpune@gmail.com ईमेल वर संपर्क साधता येतो.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीलाही करा मदत

समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आदी घटकांना या निधीला दान करता येते. यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या नावे पोस्टल ऑर्डर, मनी ऑर्डरद्वारे धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट स्वरूपात https://cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन मदत करता येते. ही मदत आयकर सूट घेण्यास पात्र आहे.





मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून जानेवारी ते जून २०२५ या कालावधीत जिल्ह्यात एकूण एक हजार ७८५ रुग्णांना १७ कोटी २८ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य करण्यात आले आहे. कक्षामार्फत गरीब व गरजू रुग्णांना अडचणीच्या काळात अर्थसाहाय्य करत दिलासा देण्याचे काम करण्यात येत आहे.

**- जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे

### असा करा अर्ज

- गरजू रुग्णांना https://cmrf.maharashtra.gov.i या संकेतस्थळावर किंवा कक्षाच्या cmrfpune@gmail.com मेलवर ऑनलाइनपद्धतीने अर्ज करता येतात
- प्रत्यक्ष कक्षात येऊन ऑफलाइनपद्धतीनेही अर्ज सादर करता येतात
- मूळ अर्जासह आवश्यक ती सर्व कागदपत्रे aao.cmrf-mh@gov.in ईमेलवर पीडीएफ स्वरूपात पाठवावे
- अर्जासोबत रुग्ण दाखल झाल्यास त्याचा जिओ टॅग छायाचित्र, निदान व उपचाराकरिता लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक हे जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रमुखांकडून प्रमाणित केलेले असावे
- चालू आर्थिक वर्षाचा एक लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला, रुग्णाचे आधारकार्ड, रेशनकार्ड
- व्याधी विकार, आजाराच्या संबंधी निदानात्मक तथा उपचारात्मक बाबींची कागदपत्रे, अपघातग्रस्ताच्या प्रकरणात प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर)
- अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेबाबतीत विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती मान्यता आवश्यक आहे.



## इंदिरा अत्रे वाचनकक्षा'चा वर्धापनदिन संपन्न

**पुणे :** सोमवार पेठेतील दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक संकुलातील 'बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचन कक्षा'चा वर्धापन दिन नुकताच संपन्न झाला. यानिमित्त पाच दिवस आयोजित कार्यक्रमात लेखक, कवी, नाटककार, शिक्षक तसेच आबासाहेब अत्रे शाळेतील मुलांनी सादर केलेल्या कविता, कथाकथन तसेच नाट्यवाचन अशा विविध साहित्य प्रकारांचा समावेश होता. कार्यक्रमाचे संयोजन संदर्भ ग्रंथपाल व माहितीतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांनी केले होते. सादरीकरणात राजेश हेन्द्रे, अस्मिता दाते, मानसी महाजन, अनिकेत आठवले, निखिल पुजारी, प्रसाद भडसावळे सहभागी झाले होते. लेखक व नाटककार राजेश हेंद्रे यांनी आपल्या 'इथे विझली वीरश्री' या यशवंतराव होळकर यांच्या शौर्यावर आधारित नाटकाचे अभिवाचन केले. याप्रसंगी प्रवीण सुपे, चंचला ललवाणी, प्रसाद भडसावळे, हरेश पैठणकर, विजयकुमार कुलकर्णी, ज्योती जोशी, अण्णासाहेब बनकर, केशव तळेकर, उत्तम साळवे उपस्थित होते.

## पुणे जिल्ह्यातील सहा सराईत गुन्हेगार तडीपार

**पुणे :** पुणे शहरात येणाऱ्या सणासुदीच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पुणे पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. कोंढवा, हडपसर व वानवडी परिसरात सक्रिय असलेल्या सहा सराईत गुन्हेगारांना दोन वर्षांसाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून तडीपार करण्यात आले आहे. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी ही कारवाई आदेशित केली आहे.

तडीपार करण्यात आलेले गुन्हेगार विविध गंभीर गुन्ह्यांत सहभागी होते. खंडणी, फसवणूक, सरकारी नोकरावर हल्ला, बलात्कार, बेकायदेशीर हत्यारे, गावठी दारू विक्री, खुनाचा प्रयत्न यांसारख्या गुन्ह्यांचा त्यांच्यावर ठपका आहे.तडीपार करण्यात आलेल्या नावे पुढीलप्रमाणे:इम्तीयाज इद्रीस मेमन (वय ४५, रा. विठ्ठलनगर, हडपसर),गणेश बबन लोंढे (वय २४, रा. तरवडे वस्ती, हडपसर),अविनाश अजय मिसाळ (वय २४, रा. घोरपडी बाजार) ,हुसेन अब्बास पटेल (वय २३, रा. शिवनेरीनगर, कोंढवा), आदित्य तानाजी पांडागळे (वय २०, रा. काटे चाळ, कोंढवा खुर्द).

## पर्वती दर्शनमध्ये कच्छी दाबेली विक्रेत्याचा खून

**पुणे :** पर्वती दर्शन परिसरात राहणाऱ्या २५ वर्षीय युवकाचा सोमवारी सकाळी घरात घुसून खून करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी नागरिकांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेतले असून, हत्या कोणत्या कारणाने झाली, हे अद्याप उघड झालेले नाही.

मृत युवकाचे नाव दानिश सिद्दिकी असून, गेल्या काही वर्षांपासून तो कुटुंबासोबत पर्वती दर्शन परिसरात राहत होता आणि यंग सर्कल परिसरात हातगाडीद्वारे कच्छी दाबेली विक्रीचा व्यवसाय करत होता.दानिशच्या घराचा दरवाजा उघडा असताना एक व्यक्ती चाकूसह घरात घुसला. दानिशने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला असता दोघांमध्ये झटापट झाली. या झटापटीत त्या व्यक्तीने दानिशच्या गळ्यावर चाकूने वार केला. गंभीर जखमी अवस्थेत दानिश कोसळला आणि त्याला तातडीने खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

घटनेनंतर आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना परिसरातील नागरिकांनी त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव दिनेश प्रभाकर क्षीरसागर (वय ३५, रा. यवतमाळ) असे आहे.



## महावितरणकडून स्मार्ट वीजमीटर मोहीम

**पुणे :** महावितरणने वीज ग्राहकांसाठी अधिक पारदर्शक व अचूक सेवा देण्याच्या उद्देशाने आधुनिक 'टीओडी' (टाइम ऑफ डे) वीजमीटर मोफत बसविण्याची मोहीम सुरू केली आहे. पुणे विभागात आतापर्यंत ४ लाखांहून अधिक घरांमध्ये हे मीटर बसविण्यात आले आहेत. नव्या तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना वीज वापराची माहिती मोबाईलवर थेट पाहता येणार आहे, तसेच अधिक अचूक वीजबिल मिळणार आहे.

महावितरणने यासाठी 'महाविद्युत' नावाचे विशेष मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून ग्राहक आपल्या वीजवापराचा तपशील कोणत्याही क्षणी आणि कुठूनही पाहू शकतात. पारंपरिक पद्धतीत रीडिंग घेण्यासाठी लागणारा वेळ आणि त्यातील मानवी चुका टाळण्यासाठी हा टीओडी मीटर उपयुक्त ठरणार आहे. ग्राहकांकडून यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च घेतला जाणार नाही.या नव्या मीटरमुळे महावितरणला दर महिन्याला मीटर रीडिंगसाठी कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. मीटरमधून रिअल टाइममध्ये डेटा ऑनलाइन मिळणार असल्यामुळे ठरलेल्या तारखेला थेट अचूक रीडिंग उपलब्ध होणार आहे.

# ‘चालढकल’ पुरवठादारांच्या ‘अंगलट’...!

## पुरवठादारांना अतिरिक्त भुर्दंड: ग्राहक आयोगाचा दणका

‘ग्राहक देवो भवं’ अशी सर्वच व्यवसायिकांची आणि सेवा पुरवठादारांची भावना असते; त्याच्याही पुढे जाऊन काही व्यवसायिक तशा आशयाच्या पाट्याही व्यवसायाच्या ठिकाणी लावतात. परंतु त्यांच्या बोलण्यातून आणि वागण्यातूनही कधीच ‘ग्राहकहित’ जाणवत नाही; त्यामुळे अनेकांना ग्राहकांच्या नाराजीचा सामना करावा लागतो. त्यातच अनेक व्यवसायिक ग्राहकांना निकृष्ठ दर्जाचा माल देऊन त्यांची फसवणूक करत असल्याची अनेक उदाहरणे आतापर्यंत घडली आहेत; याच ‘भामट्या’ व्यवसायिकांना ग्राहक आयोगाच्या माध्यमातून अद्दल घडविली जात असून त्यासाठी द्याव्या लागत असलेल्या भरपाईसाठीही ते विलंब करत असल्याने त्यांना अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे.

आयोगाच्या निर्णयानंतरही विलंब केल्यास सेवा पुरवठादारावर अधिक व्याजाचा बोजा पडतो. ही तरतूद ग्राहकाला संरक्षण देण्यासाठीच आहे. अनेक सेवा पुरवठादारांना आयोगाने दिलेले निर्णय वेळेत न पाळल्याने दंडात्मक व्याज भरावे लागले आहे. ग्राहक आयोगातील निकाल हे केवळ न्यायप्रक्रियेचा शेवट नसून त्याची अंमलबजावणी वेळेत झाली पाहिजे. अन्यथा, सेवा पुरवठादारांसाठी तो आर्थिकदृष्ट्या महागात पडू शकतो.

**- ॲड. महेंद्र दलालकर,**
ग्राहक आयोगात प्रॅक्टीस करणारे वकील




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारींवर आयोगाकडून निर्णय झाल्यानंतर त्याची वेळेत अंमलबजावणी न झाल्यास सेवा पुरवठादाराला अतिरिक्त परतावा द्यावा लागत आहे. आयोगाने तक्रारदाराच्या बाजूने दिलेल्या निर्णयात नमूद केलेली रक्कम वेळेत न दिल्यास त्यावर नऊ ऐवजी १२ टक्के दराने व्याज आकारले जात असल्याचे अनेक तक्रारींत स्पष्ट झाले आहे.

राज्यात विविध ठिकाणी असलेल्या ग्राहक तक्रार निवारण आयोगाने अशाच काही निकालांद्वारे सेवा देण्यास विलंब करणाऱ्या संस्थांना अधिक व्याजासह रक्कम परत करण्याचे आदेश दिले. त्यामुळे ग्राहकांचा फायदा होत असून, वेळेवर सेवा न देणाऱ्या कंपन्या आर्थिकदृष्ट्या अडचणीत येत आहेत. या निर्णयांमुळे ग्राहकांमध्ये आयोगाबद्दल विश्वास वाढत आहे.

### जास्त व्याजदर का आकारला जातो?

- वेळेत रक्कम न दिल्यास जादा व्याज आकारण्याची तरतूद कायद्यात आहे
- निर्णयाची वेळेवर पूर्तता न केल्याने ग्राहकाचे नुकसान भरून निघत नाही
- विलंबामुळे ग्राहकांना अतिरिक्त मानसिक त्रास सहन करावा लागतो
- जादा व्याजदराने रक्कम परत करावी लागू नये, या भीतीने निर्णयाची त्वरित अंमलबजावणी होवू शकते

### ग्राहक आयोगाचा नियम काय सांगतो?

ग्राहक आयोगाकडून तक्रारीवर निकाल दिला जातो, तेव्हा आयोग तक्रारदारास ठराविक रक्कम तक्रार दाखल केल्यापासून नऊ टक्के वार्षिक व्याजासह परत देण्याचा आदेश देतो. व्याजदर ठरवण्याचा संपूर्ण अधिकार हा ग्राहक आयोगाचा आहे. मात्र ग्राहक आयोग असे व्याजदर ठरविताना राज्य आयोगाने किंवा राष्ट्रीय आयोगाने दिलेल्या निकालांचा आधार घेत, त्यानुसार साधारणपणे नऊ ते बारा टक्के या दरम्यान व्याज दिले जाते.

# पुणे बाजार समितीत सेस चोरीचा पर्दाफाश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ विभागात बाजार शुल्क (सेस) चोरीचे रॅकेट सक्रिय असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रवेशद्वारावर नोंदवली जाणारी फळांची आवक आणि प्रत्यक्ष गाळ्यावर पोहोचणारी मालाची नोंद यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून आली असून, यामुळे समितीचे लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

फळ विभागात सध्या सफरचंद, प्लम, चेरी, संत्रा, द्राक्ष, लिची, ड्रॅगन फ्रूट, अवाकॅडो यांसारख्या देशी-विदेशी फळांची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू आहे. गेटवर फळांच्या वाहनांची वजने नोंदली जात असली तरी प्रत्यक्ष गाळ्यावर दाखल होणाऱ्या मालाच्या नोंदी वेगळ्याच निघाल्याने संशयाला पुष्टी मिळाली.

या प्रकाराचा तपास करण्यासाठी प्रशासनाने दोन सुरक्षारक्षकांची नियुक्ती करून गेटवरील आणि गाळ्यावरील नोंदींची छाननी सुरू केली आहे. तपासात २ ते १० टनांपर्यंतचा फरक अनेक गाळ्यांमध्ये आढळला आहे. यामुळे बाजार समितीच्या महसुलावर मोठा परिणाम होत आहे.

फळ विभागाचे प्रमुख प्रशांत गोते यांनी माहिती दिली की, गेल्या महिनाभरापासून आवक नोंदींची पडताळणी सुरू असून, काही अडत्यांच्या व्यवहारांमध्ये गंभीर विसंगती आढळल्या आहेत. सुरुवातीला त्यांना समज देण्यात आली असून, तपास पूर्ण झाल्यानंतर दोषी आढळल्यास संबंधित अडत्यांना नोटिसा बजावून खुलासा मागवला जाईल. समाधानकारक उत्तर न मिळाल्यास कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

या प्रकारामुळे बाजार समितीतील प्रशासनाची कार्यपद्धती, मालाची नोंद आणि महसुलाच्या व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात अशी फसवणूक टाळण्यासाठी डिजिटल नोंदणी आणि सखोल तपासणीची गरज व्यक्त केली जात आहे.

गेटवरील आणि गाळ्यावरील नोंदींची जबाबदारी तोलणाऱ्यांवरही आहे. त्यामुळे त्यांच्या कामगिरीचीही तपासणी करण्यात येत असून, दोषी आढळल्यास संबंधित तोलणाऱ्यांचे परवाने रद्द करण्यात येतील.

**-डॉ. राजाराम धोंडकर,** सचिव, पुणे बाजार समिती

# ‘चैतन्य’च्या सभासदांनी अनुभवला ‘आनंदक्षण’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चैतन्य भाषा प्रसार मंडळाचे कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी सिंहगड रस्त्यावरील 'आनंदक्षण' या संस्थेला भेट दिली. यावेळी मंडळाचे सदस्य आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंदक्षण ही संस्था मुलांना हसत खेळत ज्ञान संवर्धन करण्याचे काम अनेक वर्षे करत आहे.या संस्थेच्या संचालिका व त्यांच्या टीममधील सर्व सहाय्यक वर्गाने तिथे ज्ञानदानाचे काम कसे चालते हे सांगितले.एकूण ११० मुलांनी कथाकथन स्पर्धेत,संतांच्या गोष्टी या विषयावर कथा कथन करणे,तसेच संतांचे चरित्र स्वतःचे अक्षरात लिहून आणणे म्हणजेच मराठी हस्ताक्षर स्पर्धेत भाग घेतला होता.

त्या मुलांना चैतन्य भाषा प्रसार मंडळातर्फे आज प्रशस्तिपत्रके आणि खाऊ देण्यात आला. तसेच आनंदक्षणच्या संचालिका अमरजा जोशी यांनी हा जो स्तुत्य उपक्रम राबवला आहे त्यासाठी त्यांना एक सन्मानचिन्ह व गौरवपत्र चैतन्य भाषा प्रसार मंडळच्या संस्थापिका अनिता जोशी यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. त्यावेळी रेवती रायरीकर, अवंती बायस, मुग्धा पत्की, कुमुदिनी बिल्ला तसेच मुकुंद उत्पात जातीने हजर होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; व उपमुख्यमंत्रीअजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम पार पडला.



पुणे: चैतन्य भाषा प्रसार मंडळाचे कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी सिंहगड रस्त्यावरील ‘आनंदक्षण’ या संस्थेला भेट दिली. यावेळी मंडळाचे सदस्य आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सभासदांनी अनोखा असा ‘आनंदक्षण’ अनुभवला.

# राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जनकल्याण बहुउद्देशीय फाउंडेशन, पुणे आणि आशुतोष डान्स स्टुडिओज यांच्या संयुक्त विद्यमाने नृत्यकला संगम आणि अँजेलिक फेस ऑफ पुणे - सौंदर्य स्पर्धा या स्पर्धेतील विजेत्यांच्या सन्मान सोहळ्याचे नवी पेठेतील पत्रकार भवन येथे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



वायब्रंट ग्रुप ऑफ कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अश्विनी जाधव, पी.के. ट्रेडर्सचे शिवाजी इंडे, पुणे बिझनेस क्लबच्या संस्थापक सपना काकडे, अभिनेता निखिल निगडे, सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट प्रीत पाटील, फर्स्ट लेडी बाऊन्सर सिक्युरिटी ग्रुपच्या संस्थापक दीपा परब, तसेच आयोजक आशुतोष अभिजीत संकाये पाटील उपस्थित होते.

या स्पर्धेत विविध वयोगटांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. किड्स कॅटेगरीत साक्षी रामदासी हिने प्रथम क्रमांक पटकावला. टीन्स कॅटेगरीत स्वरा पाथरूडकरहिने बाजी मारली. मिस कॅटेगरीत धनश्री गायकवाड विजेती ठरली, तर मिसेस कॅटेगरीत प्रतीक्षा वालगुडे हिने प्रथम क्रमांक मिळवला. 'मोस्ट पॉप्युलर फेस ऑफ द इव्हेंट' हा किताब तितीक्षा राजेमाने हिला मिळाला.

स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर परीक्षक पॅनल उपस्थित होता. यामध्ये सागर अंदणकर (चंद्रपूर), प्रीत पाटील (बेंगळुरू), प्रणाली खाम्बेकर (नाशिक), निखिल निगडे (पुणे) आणि मयुरी आव्हाड (लातूर) यांचा समावेश होता.

या स्पर्धेमागचा उद्देश नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा होता. राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांनी अत्यंत चांगली कामगिरी केली. अशा स्पर्धांमुळे युवकांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होते. त्यामुळे पुढील काळात ही स्पर्धा अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्यात येईल.

**-आशुतोष अभिजीत संकाये पाटील;** आयोजक, अँजेलिक फेस ऑफ पुणे - सौंदर्य स्पर्धा



## पिंपरीत २८९ जणांचे रक्तदान

**पिंपरी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि कै. गणपतराव गोरखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त, आज पिंपरी येथे आमदार अमित गोरखे आणि माजी नगरसेविका, श्रीमती अनुराधा गणपत गोरखे यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला पिंपरी-चिंचवड परिसरातील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत पिंपरी मतदार संघातील संभाजीनगर / शाहूनगर येथील श्री सिद्धिविनायक मंदिर परिसर हे रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात २८९ पेक्षा जास्त रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी दर्शवली. यावेळी पिंपरी-चिंचवड परिसरातील भारतीय जनता पक्षाचे बहुतांश पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण महाराष्ट्रासह पिंपरी चिंचवड विधानसभा क्षेत्रातील निगडी प्राधिकरण, शाहूनगर , मोहननगर, संत तुकारामनगर, दापोडी, पिंपरी गाव, मोहननगर आणि शाहूनगर या विविध ठिकाणी भाजपच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या वतीने भव्य रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले.

## पहिल्या तिमाहीत १५ कोटींची पाणीपट्टी वसूल



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत १५ कोटी ५३ लाख ११ हजार ७३० रुपयांची पाणीपट्टी वसूल करण्यात आली. त्यामध्ये सर्वाधिक सहा कोटी ५३ लाख ५ हजार १५९ एवढी रक्कम ऑनलाइन जमा झाली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ४५ लाखांची अधिक वसुली झाली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक असे मिळून एक लाख ८० हजार ९०६ नळजोडधारक आहेत. त्यांच्याकडून विविध माध्यमांतून पाणीपट्टी भरली जात आहे. करसंकलन विभागाच्या कार्यपद्धतीमुळे ही वसुली अधिक प्रभावीपणे पार पडली. मात्र, अद्यापही ३२ हजार ४६० नळधारकांची पाणीपट्टी थकीत आहे. थकबाकीदारांनी लवकरात लवकर पाणीपट्टी भरावी, अन्यथा नळजोड खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे.दरम्यान, ऑनलाइन माध्यमातून सर्वाधिक सहा कोटी ५३ लाख पाच हजार १५९, धनादेशाद्वारे पाच कोटी ९० लाख ९८ हजार ५८५, रोख स्वरूपात तीन कोटी नऊ लाख सात हजार ९८६ रुपये पाणीपट्टीचा भरणा झाला आहे.

## पीएमआरडीएच्या ३५ भूखंडासाठी 'ई-लिलाव'



**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे ३५ भूखंड यांचे ऑनलाईन ई-लिलाव पद्धतीने ८० वर्षांच्या भाडेपट्टा तत्त्वावर वाटप करण्यात येणार आहे. यात हवेली, खेड, मावळ व मुळशी या तालुक्यातील विविध गावांतील ३२ सुविधा भूखंड, २ आरक्षित शैक्षणिक भूखंड आणि १ सार्वजनिक सुविधा (लायब्ररी / संगीत विद्यालय) भूखंड यांचे ऑनलाईन ई-लिलाव करण्यात येणार आहे. यासाठी विहीत पात्रता धारणा करणाऱ्या इच्छुक व्यक्ती / संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे. या भूखंडांचे वाटप ई-लिलावाद्वारे होणार असून नोंदणी व निविदा दस्ताऐवज डाऊनलोड हे २१/०७/२०२५ रोजी सायं. ५ वा. पासून ते ११/०८/२०२५ रोजी सायं. ५ वा. पर्यंत https://eauction.gov.in या संकेतस्थळावर करावयाचे आहेत. तांत्रिक दृष्ट्या पात्र बोलीदारांची घोषणा २१/०८/२०२५ रोजी करण्यात येणार असून २२/०८/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता संकेतस्थळावर ई-लिलाव प्रक्रिया सुरु होईल. या ई-लिलाव प्रक्रियेसंबंधी सूचना सविस्तर अटी व शर्तींचे माहितीपुस्तक https://eauction.gov.in व www.pmrda.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.

## फसवणूक प्रकरणात क्लासचालकाचा जामीन रद्द

**लोणावळा :** आर्थिक फसवणूक प्रकरणात क्लासचालक गजानन गोरे (सध्या रा. तळेगाव दाभाडे) याचा जामीन मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. अटी, शर्तीवर जामीन दिला असताना त्याचे पालन न केल्यानेच हा जामीन रद्द करण्यात आला आहे. याबाबत संबंधित इन्स्टिट्यूटमध्ये मालक नवनाथ देशमुख यांनी माहिती दिली आहे. गजानन गोरे हे त्यांच्या इन्स्टिट्यूटमध्ये कामाला असताना तेथे सुमारे एक कोटी ६८ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. साताऱ्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना ऑगस्ट २०२३ मध्ये अटक झाली होती. या प्रकरणामध्ये तो जवळपास आठ महिने कारागृहात होते. न्यायालयातून जामीन मिळावा, यासाठी त्यांनी स्वतःहून मुंबई उच्च न्यायालयामध्ये शपथपत्र लिहून दिले की आपण पाच महिन्यांत न्यायालयात २५ लाख रुपये जमा करू. तसेच संबंधित इन्स्टिट्यूटचे नाव वापरणार नाही. या आधारावर मुंबई उच्च न्यायालयाने एप्रिल २०२५ मध्ये जामीन मंजूर केला. मात्र, गोरे याने न्यायालयाच्या अटींचे पालन केले नाही. यामुळे देशमुख यांनी गोरे याचा जामीन रद्द व्हावा, म्हणून उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. ॲड. गणेश गोळे व अतित शिरोडकर यांनी न्यायालयात युक्तिवाद केला.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त ५५ देशी रोपांची लागवड

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आम्ही हे वृक्षारोपण केले आहे. झाडे लावणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एक तरी झाड लावावे आणि त्याचे संगोपन करावे. पर्यावरण जपल्यास निसर्गाचा समतोल राखला जाईल आणि त्याचा फायदा पुढील पिढ्यांना मिळेल." **-विजय शिंदे**

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**चिंचवड :** महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्रीi देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त माजी नगरसेवक तथा भाजप पिंपरी-चिंचवड सरचिटणीस विजय शिंदे यांच्या वतीने ५५ देशी रोपांची लागवड करण्यात आली. चिंचवड गाव ते थेरगाव जोडणाऱ्या उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेत, लिंक रोड आणि नदीकाठ स्वच्छ करून हे वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे, लावण्यात आलेल्या सर्व रोपांचे संगोपन करण्यात येणार असल्याची माहिती विजय शिंदे यांनी दिली. यावेळी बकुळ १०, कदंब १०, अर्जुन १०, कडूनिंब १०, आंबा ५, जांभूळ ५, वड ३, पिंपळ ३ अशा एकूण ५५ देशी रोपांची लागवड करण्यात आली.



# अभियंते गिरविणार खड्डे भरण्याचे धडे

### महापालिकेचा उपक्रम, १५७ अभियंत्यांनी घेतले प्रशिक्षण

> 'पॉटहोल मॅनेजमेंट' ॲपचा वापर कसा करावा, जलनिरोधक खड्डे भरणे तंत्रज्ञानानाबाबत माहिती देण्यात आली. तक्रारीवर तत्काळ प्रतिसादासाठी असणाऱ्या ऑटो मेकॅनिझम प्रणालीसह रस्ता, जलनि:सारण व पाणी पुरवठा अशा विभागातील समन्वयाचे नियोजन करण्याच्या सूचना तसेच खड्ड्यामध्ये जलनिरोधक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा. तत्काळ खड्डे बुजविणे, पाणीपुरवठा, जलनिःसारण आणि रस्ते विभागाचा समन्वय साधणे याबाबत अभियंत्यांना सूचना दिल्या आहेत.
>
> **-मकरंद निकम,** शहर अभियंता



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यावरील वाढत्या खड्ड्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने अभियंत्यांना खड्डे भरण्याचे प्रशिक्षण दिले आहे. पावसाळ्यात पडणाऱ्या तसेच इतर खड्ड्यांचे निराकरण करण्यासाठी अभियंत्यांना 'खड्डे नोंदणी व निराकरण प्रणाली'चा वापर व खड्डे भरण्याच्या तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल प्रशिक्षण देण्यात आले.

- महापालिकेने 'पॉटहोल मॅनेजमेंट' हे ॲप विकसित केले आहे. शहरातील रस्ते सुव्यवस्थित ठेवण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढावा, यासाठी महापालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'खड्डे नोंदणी व निराकरण प्रणाली'वर खड्ड्यांबाबत तक्रार आल्यानंतर कार्यवाही करण्यासाठी अभियंत्यांना देखील या प्रणालीची माहिती असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणात रस्त्यांवरील खड्डे शोधण्यापासून ते जलद गतीने त्याचे निवारण करण्याच्या प्रक्रियेपर्यंत प्रत्येक पायरीची माहिती देण्यात आली.

चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात झालेल्या एकदिवसीय प्रशिक्षण शिबिरात महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी प्रशिक्षण दिले. सह शहर अभियंता देवन्ना गट्टूवार, बापूसाहेब गायकवाड यांच्यासह स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण व शहर दळण वळण विभागातील कार्यकारी अभियंते, उप अभियंते, कनिष्ठ अभियंते, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक असे एकूण १५७ अभियंते सहभागी झाले होते. तज्ज्ञ सल्लागार विकास ठाकर यांनी हे प्रशिक्षण दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांवर सर्वत्र खड्डे झाले आहेत. अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली आहे. खड्ड्यांमुळे वाहतूक संथ होत असून, कोंडीत भर पडत आहे. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीमुळे अपघात होत आहेत. खड्ड्यांकडे, नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणे आणि खड्डे बुजविताना दर्जा न ठेवल्याप्रकरणी महापालिकेच्या २६ कनिष्ठ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटिसा दिल्या आहेत. खड्डे बुजविल्यानंतरही नवीन खड्डे वाढत आहेत. त्यामुळे खड्डे बुजविण्याबाबतची कार्यप्रणाली, खड्डे कसे बुजवायचे याबाबतचे प्रशिक्षण अभियंत्यांना देण्यात आले.

**प्रशिक्षणात वैशिष्ट्ये**

- पॉटहोल मॅनेजमेंट' ॲप वापर कसा करावा, याबाबत माहिती देण्यात आली.
- जलनिरोधक खड्डे भरणी तंत्रज्ञानानाबाबत माहिती
- तक्रारीवर तात्काळ प्रतिसादासाठी असणाऱ्या ऑटो मेकॅनिझम प्रणालीबाबत माहिती
- रस्ता, जलनि:सारण व पाणी पुरवठा अशा विभागातील समन्वयाचे नियोजन

# जेष्ठानुबंध ॲपवर स्वतः पोलीस आयुक्तांचा संवाद





■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी चिंचवड :** जेष्ठानुबंध ॲपचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काही दिवसांपूर्वी उदघाटन झाले होते. हे ॲप जेष्ठ नागरिकांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. जेष्ठानुबंध ॲप वर स्वतः पोलीस आयुक्त विनायकुमार चौबे यांनी फोन करून पोलीस किती तत्पर आहेत, याविषयी माहिती जाणून घेतली.

जेष्ठानुबंध ॲपमुळे ६० वर्षावरील नागरिकांना सोबती मिळाला आहे. दवाखाना, औषधे, किराणा माल, मोकळ्या वेळेत गप्पा, तातडीची सेवा, सरकारी रुग्णालये, खासगी रुग्णालयाचे नंबर ॲपमध्ये असल्याने तात्काळ सेवा भेटते. आज पोलीस आयुक्त विनायक चौबे यांनी याबाबत खात्री केली. पोलिसांकडून जेष्ठ नागरिकांना तातडीची सेवा मिळते का, हे पाहिलं. पोलीस आयुक्तांनी फोन लावून 'मला औषध हवं' असं सांगितलं. ॲपच्या नियंत्रण कक्षावरून पोलीस आयुक्तांना सर्व माहिती विचारून घेतली.

- हे सर्व पाहून पोलीस आयुक्तांनी समाधान व्यक्त केले आहे. पोलीस आयुक्तालयात याआधी कधीही अशी ॲपद्वारे जेष्ठ नागरिकांची सेवा करण्यात आली नाही. त्यामुळं या ॲपचे सध्या कौतुक होत आहे. जेष्ठानुबंधसाठी नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. त्याला विशेष मनुष्यबळ दिलेलं आहे. जेष्ठांच्या समस्या याद्वारे सोडवल्या जात असून आत्तापर्यंत २३ हजारांपेक्षा अधिक जेष्ठ नागरिकांनी ॲपमध्ये नोंद केलेली आहे. त्यामुळं त्यांच्यापर्यंत पोहचणे आणि तात्काळ सेवा पोहचवणे पोलिसांना अत्यंत सोपं होतं आहे. जेष्ठानुबंध हे ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.

# मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मोहिमेचे उद्‌घाटन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**सांगवी :** जिल्हा अंधत्व निवारण सोसायटीच्या वतीने दि. २२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेचे उद्‌घाटन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. लवेकर, जिल्हा नेत्रशल्य चिकीत्सक डॉ अंजली कुलकर्णी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ वंदना जोशी, नेत्रशल्य चिकित्सक डॉ विक्रम काकडे, डॉ प्रज्ञा निकम, डॉ प्रिया हरिदास, समुपदेशक सीमा हगवणे, संतोष चव्हाण आदी कर्मचारी उपस्थित होते.या शिबिराच्या पहिल्याच दिवशी ८८५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. राज्यातून पुणे जिल्ह्यासाठी ८५०० सर्वाधिक जास्त रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याचे टार्गेट दिले आहे. ही विशेष मोहीम जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्, बी जे वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत रुग्णालय येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. त्यास रुग्णांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

ही मोहीम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हा रुग्णालय व सलंग्न रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय व पिंपरी चिंचवड मनपा, पुणे मनपा अंतर्गत रुग्णालय, खासगी रुग्णालय आणि अशासकीय संस्था यांचे विशेष मोहिमेत सहभागी झालेत. सर्व रुग्णालयातील नेत्रशल्य चिकीत्सक, निवासी डॉक्टर,भूलतज्ञ, नर्सिंग स्टाफ, नेत्रचिकित्सक, अधिकारी, इतर सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



> नियमित नेत्र तपासणीचे फायदे आहेत. दृष्टिदोषाचे निदान लवकर होते. उपचारामुळे अधिक दृष्टी निरोगी ठेवता येते. रोज सकाळी उठल्याबरोबर स्वच्छ पाण्याने डोळे धुणे, दुसऱ्याने वापरलेले टॉवेल, रुमाल वापरू नये, डोळ्यात कचरा गेल्यानंतर ते चोळू नये, याबाबतची माहिती जनजागृती कार्यक्रमातून करण्यात आली.
>
> **— डॉ. अंजली कुलकर्णी,** नेत्रशल्य चिकित्सक

# स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकासकामांना मान्यता

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. स्थायी समिती बैठकीत महर्षी वाल्मिकी महिला बचत गट, ऐश्वर्या महिला बचत गट, आवडी महिला बचत गट, भीमक्रांती महिला बचत गट, गायत्री महिला बचत गट, वैशालीताई काळभोर बचत गट, मत भिमाई महिला बचत गट या बचत बचत गटांना धोरण २०२५-२६ आदी विषयांसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.



**आयुक्तांकडून अधिकाऱ्यांची शाळा**

- आयुक्त सिंह यांनी मंगळवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत अति वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्वच अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावत फैलावर घेतले. 'तुम्हाला लहान मुलांसारखे वारंवार सांगायचे का, कोणी कधीही येतो, कधीही जातो.' असे म्हणत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. मी महापालिका मुख्यालय सोडताना, शहराबाहेर जाताना नगरविकास विभागाच्या सचिवांना कळवितो. तर, तुम्हाला कळविण्यास काय हरकत आहेत. यापुढे कार्यालयीन वेळेत कार्यालयाबाहेर जाणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. संबंधित अति वरिष्ठ अधिकारी असला तरी 'कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार आहे,' असा इशाराही आयुक्तांनी दिला.

संपादकीय विशेष

# मतदानाचे नवे पर्व

मोबाइल अॅपद्वारे मतदान करण्याची परवानगी देण्याकडे लोकशाही प्रक्रियेतील नवीन युग म्हणून पाहिले जात आहे. बिहार राज्य निवडणूक आयोगाने 28 जून 2025 रोजी होणाऱ्या सहा महानगरपालिकांच्या महानगरपालिकांच्या निवडणुकांदरम्यान मोबाईल अॅपद्वारे ई-व्होटिंग घेतले. हे एक पायलट प्रोजेक्ट म्हणून सुरू करण्यात आले. सरासरी 69.49 टक्के मतदान मोबाईलद्वारे झाले. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीची तयारी तीव्र झाली आहे. निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्यासाठी आढावा घेण्याचे काम सुरू केले आहे. यापूर्वी एक मोबाइल अॅप सादर करण्यात आले आहे, जे मतदारांना मतदानकेंद्रांवर न जाता घरून मतदान करण्याची परवानगी देईल.

राज्य निवडणूक आयुक्त डॉ. दीपक प्रसाद यांनी सांगितले की, एस्टोनिया या युरोपियन देशामध्ये ई-व्होटिंगद्वारे मतदान होत असल्याची माहिती आहे. त्यानंतर भारतात प्रथमच बिहारमध्ये नगरपालिका निवडणुकीमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. सहा नगरपंचायत आणि नगरपालिका पोटनिवडणुकांमध्ये सर्व ठिकाणी शांततेत निवडणुका पार पडल्या. मतदान केंद्रांवर पोहोचण्यात अडचण असलेल्या वृद्ध, दिव्यांग, गर्भवती महिला आणि स्थलांतरित कामगारांसाठी ई-व्होटिंग प्रक्रिया तयार करण्यात आली आहे. आधीच नोंदणी केलेल्यांनाच या सुविधेचा लाभ मिळेल. मतदारांच्या आणि एकूणच मतदान प्रक्रियेच्या सुलभतेसाठी मोबाईलद्वारे मतदान स्वीकारार्ह्य वाटते. निवडणुकीतील मतदानाच्या टक्केवारीत सातत्याने घट होत असताना, राजकारणी आणि राजकीय विचारवंतांनी दोन्ही संभाव्य उपाय म्हणून नवीन तंत्रज्ञानाकडे लक्ष वेधले आहे. मतदान प्रक्रिया सुलभ करणे आणि इंटरनेट मतदानासारख्या नवीन, वापरण्यास सोप्या मतदान पद्धती मतदारांना उपलब्ध करून देणे, राजकीय सहभागाला चालना देईल किंवा किमान मतदानाच्या घटीला आळा घालेल, अशी अपेक्षा आहे.

मतदानात सहभागी होण्यासाठी लागणारा वेळ आणि धावपळ कमी करून ई-मतदान एकूणच ही प्रक्रिया सुलभ करेल, अशी अपेक्षा आहे. अशा निवडणूक सुधारणा मतदानाचा प्रत्यक्ष आणि वस्तुनिष्ठ खर्च कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतील. नव्या प्रक्रियेद्वारे मतदार आपल्या मोबाईल फोनवरून थेट मतदान करू शकतील. त्यांना मतदान करण्यासाठी बूथवर जाण्याची आवश्यकता असणार नाही. त्यांना कोणत्याही मतदान उपकरणाची आवश्यकता नसेल. वैयक्तिक मोबाईल फोनद्वारेच त्यांना मतदान करता येईल. या पध्दतीमध्ये मतदाराचे प्रमाणीकरण ऑनलाइन आणि कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय होईल. मोबाइल मतदानाची प्रक्रिया अतिशय सोपी, पारदर्शक, सुरक्षित, किफायतशीर आणि वेळ-कार्यक्षम आहे. मोबाइल मतदान इंटरनेटद्वारे होऊ शकेल. मतदार प्रमाणीकरण, मतदान आणि निकाल मोजण्याची संपूर्ण प्रक्रियाही स्वयंचलित असेल आणि त्यात कोणताही मानवी हस्तक्षेप असणार नाही. मतदार निवडणूक काळात कधीही मतदान करू शकतात. मतदारांना मतदानासाठी रांगेत उभे राहण्याची किंवा बूथ उघडण्याची वाट पाहण्याची आवश्यकता असणार नाही. पोस्टल मतदान प्रक्रियेशी संबंधित वेळही वाचेल. नागरिकांना, विशेषतः तरुण पिढीला ही मतदान प्रक्रिया आकर्षित करेल. त्यांच्यासाठी इंटरनेट आणि सोशल नेटवर्क्स संवादाचे मुख्य मार्ग बनले आहेत. मतदानाचा सोपा मार्ग देऊन मोबाइलद्वारे मतदान करण्यामुळे मतदान वाढण्याची अपेक्षा आहे. नागरिक मतदान केंद्रावर येणार नसतील तर मतदान केंद्रे नागरिकांच्या जवळ का आणू नयेत, अशा सवालातून या प्रक्रियेला बळ मिळाले आहे.

कोणतीही ऑफलाइन निवडणूक ही एक मोठी घटना असते. मतदारांना मतदान करता यावे, यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांना देशभरात बूथ उभारावे लागतात. बूथसाठी, मतदारांना मतदान करता यावे यासाठी अधिकाऱ्यांना प्रमुख ठिकाणी इमारती किंवा जागा भाड्याने द्याव्या लागतात. तिथे वीज, सुरक्षा, शौचालये यासारख्या मूलभूत सुविधा, मतदान उपकरणे उपलब्ध करून द्यावी लागतात. मतदान करण्यापूर्वी मतदारांची मॅन्युअली पडताळणी करणारे आणि मतदानासाठी रांगेत उभे असलेल्या गर्दीचे व्यवस्थापन करणारे निवडणूक अधिकारी बूथवर उपस्थित असावे लागतात. बूथ कॅप्चरिंग, बोगस मतदान, डुप्लिकेट मतदान टाळण्यासाठी बूथवर सुरक्षा कर्मचारी आणि सीसीटीव्ही यांचा कडक बंदोबस्त ठेवावा लागतो. मतपेट्या आणि ईव्हीएम मशीनच्या वाहतुकीसाठी, साठवणुकीसाठी देखील सुरक्षा पुरवावी लागते. काही अभ्यासकांच्या मते इंटरनेटच्या मदतीने मोबाइलद्वारे मतदानाची सोय प्रत्यक्षात मतदान वाढवेल की नाही आणि किती प्रमाणात वाढवेल हे प्रारंभिक परिस्थितीवर अवलंबून आहे. परदेशातील अनुभवजन्य पुरावे सूचित करतात की, ई-मतदानाचा एकूण मतदानावर होणारा परिणाम मोजता येत नाही.

ई-मतदानाचा मतदानावर मोजता येण्याजोगा परिणाम होत नाही असे दिसते. नवीन मतदारांना आकर्षित करण्याऐवजी ते प्रामुख्याने पोस्टल मतदानासारख्या विद्यमान मतदान माध्यमांना पर्याय ठरू शकेल. अभ्यासक ई-मतदानाच्या उपलब्धतेच्या परिणामांचे मूल्यांकन करू शकलेले नाहीत. त्यांच्या मते सर्वेक्षणांमधून घेतलेला वैयक्तिक डेटा ई-मतदानाच्या परिणामांचे वैध मापन प्रदान करत नाही. म्हणूनच ई-मतदान नागरिकांच्या सहभागी होण्याच्या निर्णयासाठी महत्त्वाचे आहे की नाही, याबद्दल चित्र स्पष्ट होऊ शकलेले नाही. भारतात होणाऱ्या सर्व प्रकारच्या स्थानिक निवडणुका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये मतदारांना मोबाईल अॅपद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार भविष्यात पुढे येऊ शकतो का, असा प्रश्न येथे पडतो. भारतातील मतदारांची सुशिक्षितता, स्मार्टफोन वापरण्यासाठी आवश्यक आर्थिक परिस्थिती याच्याशी या विषयाचा संबंध आहे. भारतातील किती नागरिकांना मोबाईल अॅपद्वारे नोंदणी करून प्रत्यक्ष मतदान करता येईल, याविषयी शंका आहे. शिवाय प्रौढ आणि वयस्क नागरिकांचे मतदान तरुण वर्गाकडून होण्याची भीती आहे. त्यातून खरा जनाधार कळणे शक्य होणार नाही. अशा परिस्थितीत वापरण्यास सोपी पोस्टल मतदान पद्धत आधीच उपलब्ध आहे. ई-मतदान हे प्रामुख्याने इतर मतदानपद्धतींना पर्याय म्हणून काम करते. ते नियमित मतदारांव्यतिरिक्त मतदान न करणाऱ्यांची टक्केवारी वाढवेल का, हा अभ्यासाचा विषय आहे.

# सर्वोत्तम राज्यावर वाढती जबाबदारी

**महाराष्ट्राने 2024-25 मध्ये विक्रमी 1.65 लाख कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली. ती देशातील एकूण गुंतवणुकीच्या 40 टक्के आहे. ही ऐतिहासिक कामगिरी स्थिर धोरणे, सक्षम नेतृत्व आणि उत्कृष्ट पायाभूत सुविधांचा परिणाम आहे. राज्यातील औद्योगिक विकास, कुशल मनुष्यबळ आणि प्रगत दळणवळण व्यवस्था गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहे. या गुंतवणुकीमुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल.**

परामर्श



हेमंत देसाई

देशाच्या आर्थिक नकाशावर आपला ठसा कायम ठेवत महाराष्ट्राने परकीय थेट गुंतवणुकीच्या शर्यतीत पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले. या परकीय थेट गुंतवणुकीमुळे राज्याने पुन्हा भारताच्या आर्थिक मांडणीत आपले स्थान भक्कम केले. यातून स्थानिक रोजगारनिर्मितीला हातभार लागणार आहे. महाराष्ट्राने 2024-25 या आर्थिक वर्षात एकूण 1,64,875 कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण 4,21,929 कोटी रुपयांपैकी तब्बल 40 टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात 32 टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च 2025) शेवटच्या तिमाहीमध्ये महाराष्ट्रात 25,441 कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले आहे. मागील तपशील पाहिला तर मागील दहा वर्षांमधील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांमध्येच ओलांडला गेला आहे. महाराष्ट्रापाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटकमध्ये 56,030 कोटी रुपये थेट परदेशी गुंतवणूक झाली आहे. म्हणजे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य महाराष्ट्राच्या निम्मा आकडाही गाठू शकलेले नाही. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीने 51,540 कोटी तर गुजरातने 47,947 कोटी रुपयांची गुंतवणूक मिळवली आहे. म्हणजेच महाराष्ट्र निर्विवाद आघाडीवर आहे.

परकीय गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षित होण्यामागे अनेक कारणे आहेत. महाराष्ट्रात औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यास अनेक संधी आहेत. महाराष्ट्र हे देशातील असे अग्रेसर औद्योगिक राज्य आहे, ज्याचे राज्याच्या सकल राज्य उत्पादनात 14 टक्क्यांहून अधिक योगदान आहे. मुंबईमध्ये भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील सर्वात जुने स्टॉक एक्सचेंज (मुंबई रोखे बाजार) आहे. राज्यात चांगले रस्ते, रेल्वे आणि विमानतळ नेटवर्क आहे. त्यामुळे वाहतूक आणि संपर्क साधणे सोपे होते. विविध उद्योगांसाठी आवश्यक असलेले पाणी, वीज, जमीन आणि जागा राज्यामध्ये उपलब्ध आहे. राज्यात उच्चशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ आहे. गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन आणि अनुदान उपलब्ध आहे. राज्यात मजबूत कनेक्टिव्हिटी आणि ग्राहकांची भरभक्कम मागणी आहे. औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि इतर फायद्यांमुळे हे राज्य गुंतवणुकीसाठी एक योग्य ठिकाण आहे. त्याचप्रमाणे राज्यात दळणवळणाची साधने विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. उत्तम भौगोलिक आणि आर्थिक परिस्थिती, अद्ययावत तंत्रज्ञानाची उपलब्धता यामुळे महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी एक उत्तम पर्याय ठरतो. राज्यात तांत्रिक कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात आहे. तरुण-तरुणींना वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यावर राज्य सरकारने भर दिला आहे. त्यांच्या कौशल्याचा उपयोग महाराष्ट्रात उद्योग उभारू इच्छिणाऱ्या उद्योगांना होत आहे. कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा तसेच महिलांचा विकास आणि परकीय गुंतवणुकीचे क्षेत्र अशा सात पैलूंमुळे हे राज्य दिवसेंदिवस उद्योगपूरक होत चालले आहे.

महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणुकीसाठी करण्यात येणाऱ्या परस्पर सामंजस्य करारांपैकी 90 टक्के करारांची अंमलबजावणी केली जात आहे. अशा प्रकारे करारांची अंमलबजावणी करण्यामध्ये राज्याचा पहिला क्रमांक असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. 2025 च्या दावोस जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राबरोबर वेगवेगळ्या कंपन्यांनी केलेल्या 46 करारांपैकी 15 उद्योगांना जमिनीचे वितरण करण्यात आले आहे. सात उद्योगांना जमीन देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून 20 उद्योग पसंतीच्या जमिनींसाठी प्रतीक्षेत आहेत. गडचिरोली हा नक्षलवादग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु लवकरच पोलादनगरी म्हणून जगाला त्याची ओळख होईल, अशी सरकारला अपेक्षा आहे. गडचिरोलीमध्ये एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली जात आहे. पण तेथील पर्यावरण विनाशाबद्दलही बातम्या येत आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये 60 हजार कोटी तर रत्नागिरी जिल्ह्यात 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यात महायुतीचे सरकार यशस्वी ठरल्याचे सरकारचे म्हणणे आहे. परंतु गडचिरोली व्यतिरिक्त राज्याच्या इतर मागास भागांमध्येदेखील उद्योगधंदे यायला हवेत. पुण्यात हिंजवडीसारख्या आयटीनगरीतच दोन, दोन दिवस वीज नसते, रस्त्यांवर खड्डे असतात. ठिकठिकाणी पाणी साचते. या पावसाळ्यात नागपूर या उपराजधानीच्या शहरातही अनेक भागात आणि औद्योगिक वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याच्या तक्रारी आहेत. खराब रस्ते, कमकुवत पूल, अतिक्रमणे यामुळे प्रवासी आणि मालवाहतुकीत बाधा येते. याचा व्यापार आणि उद्योगधंद्यांना थेट फटका बसतो, हे राज्य सरकारने लक्षात घेतले पाहिजे.

मुख्यमंत्री रोजगार योजनेंतर्गत 22 हजार नवीन उद्योजक तयार झाले आहेत आणि जिल्हास्तरावर जिल्हा उद्योग परिषद हा उपक्रम सरकारने सुरू केला आहे. त्या अंतर्गत स्थानिक उद्योजकांमार्फत सव्वा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. मुख्यमंत्री रोजगार योजनेत ओबीसी आणि अपंग घटकांचाही अंतर्भाव आहे. त्यांना स्टार्टअप उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सुविधा दिल्या जाणार आहेत. तसेच उद्योग विभागातर्फे प्रत्येक विभागात उभारलेली कौशल्य केंद्रे लवकरच सुरू होणार आहेत. मात्र नव्या उद्योजकांना पायाभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. आज राज्यात तळेगावसारख्या ठिकाणीही वारंवार वीज जाते. दुर्गम भागात परिस्थिती आणखी कठीण आहे. सरकार नवनवीन योजना जाहीर करते, परंतु त्यांची अंमलबजावणी नीट होत नाही, हा वर्षानुवर्षांचा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये वाहन क्षेत्रात 60 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे, ही चांगली बाब आहे. तेथे बजाजसारख्या प्रकल्पांनी औद्योगिक परिवर्तन आणले. त्यालाही काही दशके लोटली. परंतु संभाजीनगरमध्ये उद्योजकांकडून खंडणी मागण्याचा उद्योग तेजीत आहे. केवळ तेथेच नाही, तर नाशिक, पुणे, नागपूर अशा अनेक ठिकाणांहूनही अशा तक्रारी येत आहेत. कोणी खंडणी मागितल्यास खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला असला, तरी तळपातळीवरची परिस्थिती वेगळी आहे.

आज मुंबई, पुणे, नाशिक येथे आयटी, औषधनिर्मिती, जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांचा वेगाने विकास होत आहे. संभाजीनगरमध्ये ई वाहनांची निर्मिती जोरात आहे. संभाजीनगर हे शहर भारताची पहिली स्मार्ट औद्योगिक वसाहत म्हणूनही प्रसिद्ध झाले आहे. लवकरच हे शहर भारतातील विद्युत वाहनांची राजधानी म्हणून ओळखले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रामध्ये विद्युत उत्पादने, डेटाबेस उत्पादने आणि एरोस्पेससारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित होत आहे. हरित तंत्रज्ञान, डेटा सायन्स, रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये तरुणांना उत्तम शिक्षण मिळाल्यास महाराष्ट्रात हे उद्योग फुलतील, यात शंका नाही. सुदैवाने नवी मुंबई येथे सेमीकंडक्टर चीपनिर्मितीचा प्रकल्प सुरू होणार आहे. विदर्भात कापसाचे उत्पादन चांगले आहे. त्यामुळे तेथे वस्त्रोद्योग क्षेत्र विकसित होण्यास वाव आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमधील धार्मिक पर्यटन वाढणार आहे. आता संरक्षण क्षेत्रात देशी उद्योगांना वाव मिळू लागला असून नाशिकमध्ये संरक्षण उत्पादन निर्मितीचे अनेक प्रकल्प येत आहेत. यापूर्वी उत्तर प्रदेश आणि तामिळनाडू ही संरक्षणक्षेत्रातील साहित्यनिर्मितीचे निर्मितीची प्रमुख केंद्रे बनली होती.

आज पुणे, रायगड आणि नवी मुंबई भागात पायाभूत सुविधांचा विकास होत असून नवी मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळही होत आहे. त्यामुळे जगभरातील बड्या आयटी कंपन्या तिथे येत असून भविष्यकाळात हा विभाग डेटा सिटी म्हणून ओळखला जाईल, असे चित्र आहे. वाढवण येथे नवे बंदर होत असून त्याची क्षमता जेएनपीटीपेक्षा तिपटीने जास्त असणार आहे. जगातील दहा मोठ्या बंदरांमध्ये हे बंदर समाविष्ट असेल. परंतु मच्छिमार कृती समितीचा या बंदराला विरोध असून काही दिवसांपूर्वी त्यांनी आंदोलन देखील केले. मोठमोठी जहाजे आल्यामुळे मासेमारी करता येणार नाही, अशी त्यांची भीती आहे. जेएनपीटी अस्तित्वात आले, तेव्हा या परिसरात नवे बंदर आणले जाणार नाही, असे आश्वासन मिळाले होते, असे मच्छिमारांचे म्हणणे आहे. मात्र मच्छिमारांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्यास, त्यांच्या यथायोग्य पुनर्वसनाची सोय शासनाला करावीच लागेल. एकंदरीत, विविध मर्यादांवर मात करत महाराष्ट्र देशातले गुंतवणुकीसाठी सर्वाधिक योग्य राज्य म्हणून नावलौकीक कमावत आहे; फक्त या प्रवासाआड येणाऱ्या अडथळ्यांची गांभिर्याने नोंद घ्यायला हवी.

खेचाखेची

## बिनकामाचा

मी स्वतःला खूप बिनकामाचा समजत होतो.

.

.

.

नंतर लक्षात आलं,

.

.

.

मी झाडांसाठी कार्बन डाय ऑक्साईड सोडतो!

वेगळं काही

भारतातल्या काही राज्यांमध्ये रूदालीची परंपरा आहे. घरात कोणाचा मृत्यू झाल्यानंतर रडण्यासाठी या रूदालींना पैसे देऊन बोलावलं जातं. पण अशी प्रथा फक्त भारतातच नाही तर इतर देशांमध्येही आहे. आफ्रिकेतल्या घाना नावाच्या देशात मृत्यूच्या वेळी रडणारी एक जमात आहे. त्यांना व्यावसायिक मूरर्स असं म्हटलं जातं. हे लोक अनोळखी लोकांच्या घरी जाऊन रडतात. या कामाचे त्यांना पैसे दिले जातात. घरात कोणाचा मृत्यू झाल्यावर कुटुंबियांना धक्का बसतो. यामुळे अनेक जणांच्या डोळ्यांमधून अश्रूच येत नाहीत. अशावेळी हे मूरर्स रडून त्यांनाही रडायला भाग पाडतात. यामुळे त्यांच्या दु:खाला वाट मिळू शकते. हे काम करणाऱ्या बहुतांश महिला आहेत.


लाईफस्टाईल

## चेहऱ्यावरील पर्जन्यरंग

पावसाळ्यात पेहरावामध्ये काही बदल करावे लागतात. सहाजिकच त्यानुसार खरेदी करणं गरजेचं ठरतं. मान्सून सेलमध्ये खरेदी करताना ही बाब लक्षात घ्यावी. सेलला शक्यतो दुपारच्या वेळी भेट द्यावी. या सुमारास गर्दी कमी असल्याने वस्तूंची निवड शांतपणे करता येते. शॉपिंगवेळी हातात सहज कॅरी करता येण्यासारखी बॅग ठेवावी. त्यामुळे बॅग सावरण्यासाठी लागणारी एनर्जी वाचते आणि शॉपिंगचा थकवा जाणवत नाही. पावसाळ्यात बाहेर पडताना शक्यतो डार्क रंगाचे कपडे परिधान करावे. कॉटन, पॉलिएस्टर, सिंथेटिक अशा प्रकारचं फॅब्रिक वापरण्याला प्राधान्य द्यावं. या दिवसात जीन्स वापरणं शक्यतो टाळावं.



पावसाळ्याच्या दिवसात सर्वत्र रंगांची उधळण सुरू असते. यामुळे मेक अपचं तंत्र अवलंबताना निसर्गातला हा बदल आपल्या लूकमध्ये आणण्याचा प्रयत्न करावा. सध्या सात रंगांच्या मेक अपचा ट्रेंड आहे. यामध्ये सप्तरंगी आयशॅडो, लिपस्टिक यांची सुंदर कलाकुसर चेहऱ्यावर करु शकता. मेक अप करताना कँडी आणि मेटॅलिक कलरचा वापर करू शकता. ओठांवर या रंगांच्या उभ्या किंवा आडव्या स्ट्रीप्स काढू शकता.




राशीभविष्य

- **मेष** : कामाचा उत्साह राहील. दिलासादायक घटना घडतील. विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रगती साधता येईल.
- **वृषभ** : 'इच्छा तेथे मार्ग...'ची प्रचिती येईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. हितशत्रूंवर मात करू शकाल.
- **मिथुन** : दानधर्माकडे ओढा राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल. चर्चा, सुसंवादातून प्रश्न मार्गी लागतील.
- **कर्क** : मोठ्या खरेदीला चालना मिळेल. सर्व बाबतीत अनुकूलता राहील. आता कशाचीही चिंता करू नये.
- **सिंह** : अड्चणीतून मार्ग निघेल. स्थावर प्रश्न विचारानं सोडवावे, स्थापत्य, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील.
- **कन्या** : अनावश्यक खर्च टाळावा. कौटुंबिक जबाबदाऱ्यांनी जाणीव ठेवा. प्रेम प्रकरणात वाद संभवतात.
- **तूळ** : उपजत कला–गुणांना वाव मिळेल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृश्चिक** : कामांचं नीट नियोजन करावं. अडथळ्यांची शर्यत पार करावी लागेल. बोलताना विचार करावा.
- **धनु** : कामाचा ताण राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी सांभाळावी. महत्त्वाचे करार शक्यतो प्रलंबित ठेवावे.
- **मकर** : धनलाभाचे योग आहेत. संतती संबंधात शुभघटना घडतील. नव्या योजनांना चालना मिळू शकेल.
- **कुंभ** : कौटुंबिक वाद–विवाद संभवतात. व्यवसायात आवक उत्तम राहील. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल.
- **मीन** : आपापल्या क्षेत्रात नावलौकीक वाढेल. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. बकी चिंता नको.

ब्युटी टॉक

## पायांची काळजी घ्या

पाय हा शरीराचा सर्वात दुर्लक्षित भाग असतो. स्पामध्ये जाऊन पेडीक्युअर आणि मेनीक्युअर करून घेणं प्रत्येकीलाच जमतं असं नाही. टाचांना पडलेल्या भेगा फारशा गांभीर्याने घेतल्या जात नाहीत. चेहऱ्याच्या त्वचेकडे आपण जितकं लक्ष देतो तितकं पायांकडे दिलं जात नाही. पण याचे काही दूरगामी परिणाम होऊ शकतात. पायांची अगदी सोप्या पद्धतीने काळजी घेता येते. त्याविषयी...

✻ पावलांची त्वचा कोरडी पडल्याने टाचांना भेगा पडू शकतात. त्यामुळे दिवसातून दोन वेळा पायांना मॉईश्चरायझर लावा.

✻ गरम पाण्यामध्ये पाय बुडवून ठेवा. यासाठी पाण्यात थोडा मधही घालता येईल.

✻ बोटांच्या मधल्या भागात घामामुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो. त्यामुळे हा भाग वरचेवर स्वच्छ ठेवा.

✻ चांगल्या फूट केअर क्रीमचा वापर करा.

दिनविशेष

## २४ जुलै

- १९६९ : अपोलो ११ या अंतराळयानाचा प्रवास सुखरुप पूर्ण.
- २०१४ : कोळसा गैरव्यवहारप्रकरणी विशेष न्यायालयाची स्थापना.
- २०१५ : फाशी टाळण्यासाठी याकूब मेमनने सुप्रीम कोर्टाचा दरवाजा ठोठावला.
- २०१७ : इस्रोचे माजी अध्यक्ष आणि उडुपी रामचंद्र राव यांचे निधन.
- २०१८ : उत्तर कोरियाकडून अण्वस्त्रे आणि बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांची निर्मिती करण्याची केंद्रे निकामी करण्यास सुरूवात.

फन टाईम

## बो ताओशी आणि एक्स्ट्रीम आयर्निंग

ताओशी' हा जपानी खेळ आहे. या खेळात प्रतिस्पर्ध्याचा खांब खालच्या दिशेला वाकवायचा असतो. हा खेळ जपानमधल्या शाळांमध्ये तसंच सैन्य प्रशिक्षण संस्थांमध्ये खेळला जातो. हा बराच धोकादायक खेळ आहे. सैनिकांच्या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून बो ताओशी ही संकल्पना मांडण्यात आली होती. हळूहळू खेळ म्हणून ही संकल्पना लोकप्रिय झाली. बो ताओशीच्या एका संघात १५० लोक असतात. यातले ७५ लोक आक्रमण करतात तर ७५ लोक खांबाचा बचाव करतात. हा खेळ खेळताना पायात बूट घालता येत नाहीत तसंच हा खांब जमिनीतून उपटता येत नाही. या खेळाचा व्हिडिओ यू ट्यूबवर बघता येईल. कपड्यांना इस्त्री केली जाते. पण हीच इस्त्री करण्यासाठी तुम्हाला डोंगरमाथ्यावर जावं लागलं, बोटीत बसून इस्त्री करावी लागली तर? 'एक्सट्रिम आयर्निंग' या खेळात असं घडतं. या खेळात सहभागी होणारे लोक कपडे आणि इस्त्री करण्याचा बोर्ड सोबत नेतात. अगदी डोंगराच्या कड्यावर जाऊन इस्त्री केली जाते. काही लोक तर बोटीतही इस्त्री करतात. हा जगातला एक धोकादायक खेळ मानला जातो. अशा प्रकारे कपड्यांना इस्त्री करताना मजा येईल!

पंचांग

**गुरूवार, २४ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ कृ. १५, नक्षत्र : पुनर्वसु
चंद्रराशी : मिथुन, योग : हर्षण
सूर्योदय : ६.१५, सूर्यास्त : ७.१५

फॉरवर्ड्स

**वक़्त सिखा देतां हैं ज़ीने क़ा हुनर... फ़िर क़्या नसीब...**

**क्या मुक़द्दर औऱ क़्या हाथों क़ी लक़ीरें...!**

आरोग्यमंत्र

## पीसीओडीमुळे...

गर्भाशयामधील बीजांडाच्या भागी पाण्याच्या बुडबुड्यासारख्या ग्रंथी तयार होण्याची शारीरिक समस्या म्हणजेच वैद्यकीय भाषेत पीसीओडी. हा त्रास असणाऱ्या महिलांची मासिक पाळी वेळेवर येत नाही. वेळेवर येत असली तरीही त्यातून स्त्रीबीज बाहेर पडत नाही. काही कारणांमुळे ही समस्या उद्भवते. त्यात आळशीपणाने फक्त बसून राहणं, सतत मेद वाढवणारे पदार्थ खाणं, फास्ट फूड, तळलेले पदार्थ, जंक फूड अतिप्रमाणात खाणं, दिवसा झोपणं आणि रात्री उशीरापर्यंत जागणं, सतत अपचन, पोट साफ न होणं, व्यायाम न करणं, वजन वाढणं आदींचा समावेश असू शकतो. काही लक्षणांवरुन ही समस्या ओळखता येते.



✻ मासिक पाळीमध्ये अनियमितता. ✻ मासिक पाळी उशिरा येणं. ✻ मासिक पाळी आल्यानंतर अंगावरून जास्त जाणं. ✻ वजन वाढणं. ✻ चेहऱ्यावर, पोटावर लव येणं, चेहऱ्यामध्ये बदल होऊन तो पुरूषी दिसणं. ✻ त्वचा रुक्ष होणं. शरीरामध्ये जडपणा येणं. याखेरीज पीसीओडी झालेल्या युवती वा महिलांच्या वर्तनातली बदल दिसू लागतो. लाजाळूपणा, माया, प्रेम कुठे तरी कमी होत जातं. पीसीओडी झालेल्या स्त्रियांमध्ये पुरुषी अहंकार यायला लागतो. हे मानसिक बदल घडतात ते प्रोजेस्टेरॉनच्या वाढलेल्या प्रमाणामुळे. यावरूनच पेशंटला बघितल्यानंतर वा बोलण्यातूनही पीसीओडीचा आजार असल्याचं समजतं.

बी अलर्ट

फेसबुक, व्हॉट्स अॅपसारख्या सोशल मीडियाच्या पोस्ट्सवर आता पोलिसांची करडी नजर असणार आहे. याचं कारण म्हणजे या माध्यमांवरून पसरवल्या जाणाऱ्या अफवा आणि त्याचे होणारे गंभीर परिणाम. त्यामुळे सोशल मीडियाचा काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक वापर करायला हवा. कोणताही मेसेज फॉरवर्ड करण्याआधी खातरजमा करून घ्यायला हवी. तुमच्या पोस्टमध्ये कोणालाही टॅग करताना आधी त्यांची परवानगी घ्यायला हवी. एकाच दिवशी भरपूर पोस्ट्स किंवा फोटो अपलोड करू नका. इन्स्टावर दिवसाला दहापेक्षा जास्त फोटो अपलोड केले तर फॉलोअर्स तुम्हाला अनफॉलो करू शकतात. हॅशटॅग्जचा वापर गरजेपेक्षा जास्त करू नका.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## अहमदाबाद दुर्घटनेत चुकीचे मृतदेह पाठवले

**नवी दिल्ली :** अहमदाबाद येथे १२ जून रोजी झालेल्या एअर इंडिया विमानाच्या भीषण अपघातानंतर, ब्रिटनमधील काही पीडित कुटुंबांना चुकीचे मृतदेह पाठवल्याचा आरोप करण्यात आला आहे. ब्रिटनमध्ये राहणाऱ्या दोन पीडित कुटुंबांनी दावा केला आहे की, त्यांना त्यांच्या नातेवाइकांचे मृतदेह न मिळता इतर कोणाचेच मृतदेह सुपूर्द करण्यात आले. त्यांच्या वकील जेम्स हीली यांच्या मते, या दोन्ही मृतदेहांचे डीएनए नमुने संबंधित कुटुंबीयांच्या नमुन्यांशी जुळले नाहीत. ब्रिटनमधील एका वृत्तपत्रात या धक्कादायक प्रकरणाचा खुलासा करण्यात आला आहे. त्यांच्या अहवालानुसार, एका कुटुंबाने अंतिम संस्काराची तयारी सुरू केली होती. मात्र, डीएनए तपासणीत ताबूतात दुसऱ्याच व्यक्तीचा मृतदेह असल्याचे समजल्यानंतर कुटुंबीयांना अंतिम संस्कार थांबवावे लागले.

## अल- कायदाच्या ४ संशयितांना अटक


**(पान १ वरुन)** त्यांच्या गटात लोकांना जोडत होते आणि त्यात अल-कायदाचा प्रचार करत होते. ही माहिती मिळाल्यानंतर गुजरात एटीएसने झिशान, फरदीन, सैफुल्ला आणि फारिक यांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींचे वय २० ते २५ वर्षे असल्याचे सांगितले जात आहे. हे दहशतवादी मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट रचत होते असा दावा केला जात आहे. संशयित दहशतवाद्यांना वेळीच अटक करण्यात आली असल्यामुळे एटीएसची ही कारवाई एक मोठे यश असल्याचे मानले जाते आहे.

# जगाच्या समस्येवर भारतीयता हाच उपाय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** "आज जग ज्या प्रश्नांना तोंड देत आहे, त्यावर 'भारतीयता' हाच एकमेव उपाय आहे. नागरिकांनी भारतीयता आत्मसात करावी," असं आवाहन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केलं. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे मंगळवारी इग्नू आणि अखिल भारतीय अनुव्रत न्यास यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमाला संबोधित केलं, यावेळी ते बोलत होते.

सरसंघचालक डॉ. भागवत म्हणाले की, "गेल्या २००० वर्षात पाश्चात्य विचारांवर आधारित सर्व प्रयत्न 'अयशस्वी' झाले आहेत. भौतिकवादामुळे जग अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. आता ते उत्तरांसाठी भारताकडं पाहत आहेत," असं त्यांनी यावेळी सांगितलं. "जगात विज्ञान आणि आर्थिक प्रगतीमुळे सुखसोयी आल्या आहेत. नागरिकांचं जिवन




सुकर झालं आहे, परंतु दुःख संपू शकलं नाही," असं त्यांनी यावेळी सांगितलं. "शोषण वाढलं, गरिबी वाढली. गरीब आणि श्रीमंतांमधील दरी दिवसेंदिवस वाढतच गेली," असंही त्यांनी यावेळी त्यांनी स्पष्ट केलं.

डॉ. भागवत यांनी जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्याबाबतही भाष्य केलं. ते म्हणाले की, "पहिल्या महायुद्धानंतर शांततेचा पुरस्कार करणारी अनेक पुस्तकं लिहिली गेली. भविष्यात पुन्हा युद्ध होऊ नये, म्हणून राष्ट्रांची एक संघटना स्थापन करण्यात आली. मात्र दुसरं महायुद्ध सुरू झालं. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली. पण आपण आज तिसरं महायुद्ध होईल का, याचा विचार करत आहोत," असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

"आज जग ज्या समस्यांना तोंड देत आहे, त्यावर 'भारतीयता' हा एकमेव उपाय आहे. भारत असण्याचा अर्थ काय? भारतीयता म्हणजे नागरिकत्व नाही. नागरिकत्व आवश्यक आहे. भारताचा 'स्वभाव' संपूर्ण जीवनाचा विचार करतो. चार 'पुरुषार्थ' आहेत, 'मोक्ष' हे जीवनाचं अंतिम ध्येय आहे," असं त्यांनी यावेळी सांगितलं. भारताचं स्वरूप 'धर्म दृष्टी'वर आधारित आहे, असंही सरसंघचालकांनी यावेळी स्पष्ट केलं. "धर्माच्या शिस्तीमुळे भारत एकेकाळी सर्वात समृद्ध राष्ट्र होतं. जगाला हे माहीत आहे आणि म्हणूनच ते भारताकडं मोठ्या आशेनं पाहत आहेत. त्यांना भारत एक नवीन मार्ग दाखवेल. आपल्याला जगाला मार्ग दाखवावा लागेल. यासाठी, आपल्याला आपलं 'राष्ट्र' तयार करावं लागेल. त्यासाठी स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून सुरुवात करावी लागेल," असंही ते म्हणाले.

# मुंबईत मुसळधार पावसाचा इशारा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** येत्या काही दिवसांत मुंबईत मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. तसंच मुंबईकरांनी सतर्क राहण्याचं आवाहन देखील हवामान विभागानं केलं आहे. जून महिन्यात झालेल्या पावसानंतर जुलैच्या महिन्यातील पहिले २० दिवस मुंबईकरांना उकाड्याचा सामना करावा लागला. आता मुंबईत रविवारी रात्रीपासून सुरू झालेला मुसळधार पाऊस अद्यापही सुरू असून, मुंबईकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे.

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पुढील चार दिवस मुंबईसह कोकणात 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला असून, बुधवार (२३ जुलै) आणि गुरुवार (२४ जुलै) गुरुवारी मुंबईसह कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईत वातावरण ढगाळ राहणार असून, मुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ४०-५० किमी असू शकतो, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. तर, दुसरीकडे मुंबई उपनगरात आज सकाळपासूनच मुसळधार पाऊस सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे.

मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिलेल्या माहितीनुसार, "मान्सून वारे पुन्हा एकदा सक्रिय झाले असून, आता वातावरणातील परिस्थितीही पावसासाठी अनुकूल आहे. वातावरणातील आर्द्रता वाढली असल्यानं आणि वाऱ्यांचा वेगही वाढण्याची शक्यता आहे. तसंच वातावरणातील या स्थितीमुळं २७ जुलैपर्यंत राज्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे, " असं शुभांगी भुते यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यांसाठी शुक्रवारपर्यंत 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला असून, उत्तर कोकणात म्हणजेच पालघर, ठाणे आणि मुंबई या भागात पावसाचा जोर या तीन जिल्ह्यांच्या तुलनेत काहीसा कमी असेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# पंतप्रधान मोदी इंग्लंड, मालदीव दौऱ्यासाठी रवाना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी २३ ते २६ जुलै दरम्यान ब्रिटन आणि मालदीवच्या द्विपक्षीय दौऱ्यावर रवाना झाले असून, या दौऱ्यामुळे भारताची 'नेबरहुड फर्स्ट' धोरणाला बळकटी मिळेल आणि ब्रिटनसोबतच्या मुक्त व्यापार करारामुळे (एफटीए) जागतिक व्यापार क्षेत्रात भारताची ताकद वाढेल. हा दौरा रणनीतिक, आर्थिक आणि सुरक्षा सहकार्याला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

पंतप्रधान मोदी २३ जुलै रोजी ब्रिटनला भेट देत आहेत. हा त्यांचा पंतप्रधान म्हणून चौथा ब्रिटन दौरा आहे. ब्रिटनचे पंतप्रधान सर कीर



स्टारमर यांच्यासोबतच्या बैठकीत भारत-ब्रिटन सर्वसमावेशक रणनीतिक भागीदारी (सीएसपी) ची प्रगती तपासली जाईल. याशिवाय, राजा चार्ल्स तृतीय यांच्याशी शिष्टाचार भेट होणार आहे. बहुप्रतीक्षित मुक्त व्यापार करारावर (एफटीए) स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे निर्यात, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीला चालना मिळेल. व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण, जलवायु परिवर्तन, आरोग्य, शिक्षण आणि लोकांमधील संबंध यावर चर्चा होईल.

२५-२६ जुलै रोजी पंतप्रधान मालदीवला भेट देतील. मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने राष्ट्रपति डॉ. मोहम्मद मुइज्जू यांनी त्यांना विशेष निमंत्रण दिले आहे. भारत-मालदीव राजनैतिक संबंधांच्या ६०व्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर हा दौरा ऐतिहासिक आहे. राष्ट्रपति मुइज्जू यांच्यासोबतच्या बैठकीत समुद्री सुरक्षा, व्यापार, हिंद महासागरातील शांति आणि स्थैर्य यावर चर्चा होईल.

ऑक्टोबर २०२४ मध्ये स्थापन झालेल्या सर्वसमावेशक आर्थिक आणि समुद्री सुरक्षा भागीदारीची प्रगती तपासली जाईल. विदेश मंत्रालयाने म्हटले आहे की, हा दौरा भारताच्या रणनीतिक, आर्थिक आणि क्षेत्रीय स्थैर्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. पंतप्रधानांचा हा दौरा ठोस करार आणि रणनीतिक सहमतींना चालना देईल, ज्यामुळे भारताची जागतिक प्रतिष्ठा वाढेल.

# मुलींच्या शासकीय वसतिगृहात मुलीचा विनयभंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** शहरातील मुलींच्या वसतिगृहात शिरुन मुलीचा विनयभंग करण्यात आल्याची धक्कादायक घटना, नागपुरातील सरकारी वसतीगृहात घडली आहे. आरोपी दाराची कडी काढून आत शिरले अन् मुलीचा विनयभंग केला. सरकारी वसतीगृहात सीसीटीव्ही नाहीत, त्याशिवाय पुरेशी सुरक्षाही नसल्याचं समोर आलं आहे. त्यामुळंच आरोपींनी एवढी मोठी हिंमत केल्याचा संशय पोलीस निरीक्षक गोकुळ महाजन यांनी व्यक्त केला आहे.

रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेत दोन आरोपी मुलींच्या वसतीगृहात घुसले होते. मुलींनी पुढील धोका ओळखून लगेच




आरडाओरडा केला, त्यामुळं आरोपी पळून गेले. वसतीगृहातील मुलींच्या सतर्कतेमुळं मोठी घटना आता जरी टळली असली तरी, या निमित्ताने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

तर वसतीगृहात घुसून मुलीचा विनयभंग झाल्यामुळं इतर मुलींनमध्ये भीतीचं वातावरण आहे.

ज्या ठिकाणी वसतीगृह आहे, त्या ठिकाणी दाट लोकवस्ती आहे. वसतीगृहाच्या मागील भागात मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं एकही सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आलेला नाही.

रात्री दोघेजण मागच्या भागात असलेल्या लोखंडी पायऱ्यांनी वरच्या माळ्यावर गेले. लोखंडी गेटला कुलूप नसल्यानं आरोपी मुलीच्या खोलीपर्यंत थेट पोहोचले. त्यानंतर आरोपीनं मुलींचे मोबाईल चोरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपींनी मुलीचा विनयभंग केला. तेवढ्यातच एका मुलीला जाग आल्यानं तिनं आरडाओरडा सुरू केल्यानं दोन्ही आरोपी लगेच तिथून पळून गेले, अशी माहिती पोलीस निरीक्षक गोकुळ महाजन यांनी दिली. मुलींच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी एक पथक नेमल्याची माहिती एमआयडीसी पोलीस स्टेशन निरीक्षक गोकुळ महाजन यांनी दिली. प्राथमिकदृष्ट्या आरोपी चोरीच्या उद्देशाने मुलींच्या वसतीगृहात शिरल्याचा अंदाज व्यक्त केला जातोय. दोन्ही आरोपींनी संधीचा गैरफायदा घेत वसतीगृहात असलेल्या मुलींचा विनयभंग केल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

# ऑनलाईन रमीच्या नादात ८० लाखांचं कर्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत कामकाज सुरू असताना ऑनलाईन रमी गेम खेळल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यानंतर बरीच चर्चा रंगली. पण यातील ऑनलाईन रमी गेमचं व्यसन आणि त्या व्यसनापायी असंख्य तरुण कर्जबाजारी झाल्याचं चित्र आहे. यात कित्येकांनी तर आपली शेतजमीन गहाण ठेवल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील जय जाधव या तरुणावर तर या गेमच्या व्यसनापायी ८० लाखांचं कर्ज झालं आहे. रमीच्या नादात अवघ्या २६ व्या वर्षीचं त्याचं आयुष्य उद्ध्वस्त झालं.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात राहणारा जय जाधव हा तरुण शेतकरी कुटुंबातून आलेला. तो रमीच्या नशेत इतका गुरफटला की, त्याच्यावर सुमारे ८० लाख रुपयांचं कर्ज झालं. जयने रिअल इस्टेट व्यवसायातून कमावलेले २३ लाख, मित्रांकडून घेतलेले २० लाखांचं कर्ज, दीड एकर शेतजमीन, स्कॉर्पिओ गाडी गहाण ठेवून आणलेले पैसे, हे सर्व काही रमी गेममधील जुगारात हरवले.

जयने आता स्वतःचा अनुभव सांगताना जनतेला आवाहन केलं आहे, 'मंत्र्याचा व्हिडीओ पाहून चुकीची प्रेरणा घेऊ नका. झालेलं नुकसान पुरे, आता थांबा' अशा शब्दात त्याने या गेमच्या नादाला लागलेल्या तरुणाईला आवाहन केलं आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान कृषी मंत्री माणिकराव कोकाटे ऑनलाईन रमी गेम खेळताना दिसल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. या व्हिडीओमुळे फक्त राजकीय वर्तुळात नव्हे तर समाजातही गंभीर चर्चा रंगली आहे. कारण याच ऑनलाईन रमी गेममुळे अनेक तरुण आर्थिक संकटात सापडले आहेत.

राज्याच्या कृषी खात्याचे मंत्री अधिवेशनासारख्या गंभीर वातावरणात ऑनलाईन गेम खेळताना दिसल्याने सार्वजनिक नैतिकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

पान १ वरून

## रविवारपासून तीन दिवस रंगणार 'शि. द. १०० महोत्सव

या महोत्सवानिमित्त रविवार दिनांक २७ ते मंगळवार दिनांक २९ जुलै दरम्यान व्यंगचित्रांचे खास प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. रविवार दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता बालगंधर्व कलादालनात जगप्रसिध्द ज्येष्ठ शिल्पकार भगवान रामपुरे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. यानिमित्त महाराष्ट्रातील व्यंगचित्रकार शिंदेंना प्रत्येकी एक खास व्यंगचित्र भेट देणार आहेत. ती व्यंगचित्रे आणि शिंदेंची व्यंगचित्रे यांचे प्रदर्शन, 'हसरी गॅलरी' कलादालनात भरविण्यात येणार आहे. या महोत्सवात बालगंधर्व कलादालनात येथे रोज व्यंगचित्रविषयक विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यामध्ये, रविवार दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता 'महाराष्ट्राच्या हास्यरेषा' हा महाराष्ट्रातील जुन्या-नव्या व्यंगचित्रकारांची, त्यांच्या रेषा, शैली, विनोदातून नवी ओळख करून देणारा दृक-श्राव्य कार्यक्रम ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी सादर करणार आहेत. सोमवार दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता 'शि. द. : कला आणि कल्पना' या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना भावलेले शि. द. फडणीस याविषयी मंगला गोडबोले, प्रा. मिलिंद जोशी, चंद्रमोहन कुलकर्णी, सतीश पाकणीकर यांच्याशी चारुहास पंडित संवाद साधणार आहेत.

महोत्सवात मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता 'शब्दांवाचून ...' हा देश-विदेशातील शब्दविरहित व्यंगचित्रकलेची ओळख करून देणारा रसग्रहणाचा दृक-श्राव्य कार्यक्रम व्यंगचित्रकार विवेक प्रभुकेळुस्कर सादर करणार आहेत.

या महोत्सवानिमित्त रविवार दिनांक २७ ते मंगळवार २९ जुलै दरम्यान रोज दुपारी ४.०० वाजता विशेष दृक-श्राव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून डिजिटल कार्टून प्रात्यक्षिके आणि महाराष्ट्रातील मान्यवर व्यंगचित्रकारांकडून अर्कचित्रे रसिकांना पाहता येणार आहेत. यामध्ये योगेंद्र भगत, विश्वास सूर्यवंशी, अतुल पुरंदरे, शुभम जिंदे, उमेश कवळे सहभागी होणार आहेत.

यानिमित्त मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी संध्याकाळी ६.०० वाजता 'शिदं'चा हृद्य नागरी सत्कार सोहळा बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार आहे. या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मूर्तिशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर उपस्थित रहाणार आहेत. या विशेष सत्कार सोहळ्यात शिदंच्या शतकी वाटचालीला समर्पित 'हसरी सेंच्युरी' हा विशेष दृक श्राव्य कार्यक्रम सादर होणार आहे.

सर्वांसाठी हा महोत्सव विनामूल्य खुला असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## इस्रो आणि नासाच्या उपग्रहाचे प्रक्षेपण

ज्यामुळे सुस्पष्ट आणि विस्तृत इमेज मिळतात. या उपग्रहाच्या माध्यमातून पृथ्वीवरील बदलांची वास्तविक वेळेतील माहिती मिळणार असून, पुढील क्षेत्रांमध्ये तो मोलाची भूमिका बजावेल: भूकंप, भूस्खलन व ज्वालामुखी निरीक्षण. हिमनद्या व बर्फाच्या चादरींचे हालचाल व वितळणे. पिकांचे वाढीचे निरीक्षण, जमिनीतील ओलावा, आणि अन्नधारणा सुरक्षा. वनतोड, दलदलांचे बदल व सरोवरांची पातळी. आपत्ती व्यवस्थापन – चक्रीवादळ, पूर, त्सुनामी, वणवे इ.

इस्रोने या प्रकल्पासाठी सुमारे ७८८ कोटींचे आर्थिक योगदान दिले असून, यामुळे भारताला काही लाभ मिळणार आहेत. यात आपत्तीपूर्व सूचना प्रणाली अधिक सक्षम होणार, कृषी क्षेत्रासाठी अचूक डेटा उपलब्ध, हवामान बदलावर सखोल संशोधन शक्य, जैवविविधता व पर्यावरण रक्षणासाठी उपयुक्त माहिती यांचा समावेश आहे.

या प्रकल्पाचा डेटा सर्व देशांसाठी विनामूल्य उपलब्ध असणार आहे. त्यामुळे जगभरातील वैज्ञानिक, धोरणकर्ते आणि आपत्ती व्यवस्थापन संस्था यांचा फायदा होणार आहे. हा उपग्रह केवळ भारत-अमेरिकेचा नाही, तर संपूर्ण पृथ्वीसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

निसार उपग्रह प्रकल्प म्हणजे पृथ्वीच्या बदलती परिस्थितीवर नजर ठेवण्याचे एक प्रभावी आणि सशक्त माध्यम. हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन, कृषी नियोजन आणि पर्यावरणीय धोरणांसाठी याचा वापर क्रांतिकारी ठरेल, असे मानले जाते.

## महाराष्ट्रात निवडणूक चोरलीच - राहुल गांधी

ही चोरी आमच्या लक्षात आली आहे. कर्नाटक निवडणुकीतील अगदी ब्लॅक अँड व्हाईट पुरावे आमच्या हातात आहेत.

आम्ही लोकसभा मतदानावेळचा एक मतदारसंघ निवडला आणि त्यात खोलात जाऊन तपास केला. कारण अडचण अशी आहे की, हे लोक मतदार यादी कागदावर देतात. आणि या यादीचे विश्लेषण केले जाऊ शकत नाही. मग एका मतदारसंघातील सर्व मतदार यादी आम्ही घेतली. त्याला डिजिटल फॉरमॅट करून घेतला. त्यात आम्हाला सहा महिने लागले. पण आम्ही आता यांची सगळी चोरी पकडली आहे. हे कसे केले जाते, कोण मतदान करते, कुठून मतदान होते, कसे नवीन मतदार बनवले जातात, हे सगळं आता आम्हाला कळलं आहे. आणि आता सरकारलाही ही गोष्ट कळून आली आहे. त्यामुळे आता ते बिहारमध्ये सर्व मतदान यंत्रणा नव्याने करण्याच्या मागे लागले आहेत. जुने मतदार डिलीट करून नव्या पद्धतीने मतदारांची नावे घेतली जात आहेत. नवीन मतदार यादी केली जात आहे. भारतात निवडणूकच चोरली जात आहे. हेच भारताचे वास्तव आहे, असे राहुल यांनी म्हटले आहे.

यापूर्वीही केला होता आरोप

राहुल गांधी यांनी मॅच फिक्सिंग महाराष्ट्र या शीर्षकाने ७ जून रोजी लेख लिहिला. त्या लेखात त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील निकालावर फिक्सिंगचा आरोप केला होता. निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, मतदार याद्या वाढवून खोटे मतदार घडवणे, निवडणूकानंतर अचानक लाखो नव्या मतदारांची भरभराट, मतदानाची वेळ संपल्यानंतर झालेले मतदान, वाढलेली मतदानाची आकडेवारी, प्रलोभनांचा वापर, खोटे मतदान, पुरावे लपवणे, मशिन-योग्य मतदार यादी प्रसारित करू न देणे व मतदानाच्या सीसीटीव्ही फुटेज लपवणे, असे आरोप त्यांनी लेखातून केले होते. दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही वर्तमान पत्रात लेख लिहूनच राहुल गांधींच्या लेखांचा प्रतिवाद केला होता.

## कांदा खरेदीबाबत ग्राहक विभागाचा मोठा निर्णय

किंमत स्थिरता निधी योजनेअंतर्गत कांद्याची खरेदी होते. मात्र यात अनियमितता व भ्रष्टाचाराची अनेक गंभीर प्रकरणे समोर आली आहेत. कांदा खरेदी प्रक्रियेदरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्यासाठी तसेच खरेदी केंद्रांवर शासनाचे प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षता समिती नियुक्त केली आहे.

महाराष्ट्रात नाशिक, पुणे, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खरेदी दीड महिना उशिराने सुरू झाली. गेल्या दोन वर्षांपासून कांदा खरेदीमध्ये अनियमितता आहे. तसेच शेतकरी संघटनांनी शासनाकडे तक्रारी केल्या होत्या. दरम्यान, महाराष्ट्र दरवर्षी मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. मात्र, ज्यावेळी शेतकऱ्यांचा कांदा बाजारात येतो त्यावेळी दर कमी होताता. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो. मागील वर्षी अचानक सरकारनं कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेतला होता. याचा मोठा तोटा शेतकऱ्यांना सहन करावा लागला.

## ओसाड गावची पाटीलकी जाणार

होती. कोकाटे यांच्यावर कारवाई करावी, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातल्या अनेक नेत्यांनीही खासगीत बोलून दाखवले होते. त्यामुळे अजित पवार आणि तटकरे यांच्यावर पक्षांतर्गत दबाव देखील होता. याचाच विचार करून येत्या काही दिवसांत कोकाटे यांची गच्छंती होऊ शकते. माणिकराव कोकाटे यांच्याजागी अमळनेरचे आमदार, माजी मंत्री अनिल भाईदास पाटील यांना कृषिखाते देण्यात येऊ शकते, असे वृत्त आहे. अनिल भाईदास पाटील यांना सध्याच्या मंत्रिमंडळात जागा देण्यात आली नव्हती. महायुतीच्या पहिल्या कार्यकाळात ते आपत्ती आणि पुनर्वसन मंत्री होते. मात्र नव्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश होऊ शकलेला नव्हता.

## पुण्यातून धावणार ४ नव्या...

पुणे-सिकंदराबाद वंदे भारत: दोन प्रमुख आयटी आणि शिक्षण केंद्रांना जोडणारा हा मार्ग दौंड, सोलापूर आणि गुलबर्गा असा असण्याची शक्यता आहे. या मार्गावरील सध्याच्या प्रवासाच्या वेळेत २ ते ३ तासांची बचत होण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल.

पुणे-बेळगावी वंदे भारत: या मार्गावरील संभाव्य थांब्यांमध्ये सातारा, सांगली आणि मिरज या ठिकाणांचा समावेश असेल.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, गाव मौजे किरकटवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील गट न. 87 ते 90 मधील डीएसके मेघमल्हार को- ऑप. हौसिंग सोसायटी ली. मधील मेघमल्हार विंग आर इमारतीतील फ्लॅट न. 701, महेंद्र सनतकुमार मराठे या फ्लॅट धारकास भाग दाखला क्रं. 0249 याचा भाग न. 2481ते 2490 दिला होता. परंतु सदर मूळ भाग दाखला हरवल्याने विद्यमान मालक योग्य ती प्रक्रिया करून डुप्लीकेट भाग दाखल्याची मागणी करणार आहे. तरी सदर डुप्लीकेट भाग दाखला देण्यास कोणाची हरकत असल्यास ०७ दिवसांचे आत खलील पत्तावर मूळ कागदपत्रासहित संपर्क साधावा व खात्री पटवून द्यावी.

Date 23/07/2025

अॅड. शिल्पा एम. मुक्कावार
ऑफिस : हॉल न. २, रोहिणी ए बिल्डिंग,
रोहिणी सोसायटी ऑफिस समोर,
डिएसके विश्व, धायरी, पुणे ४११०४१
Mob No. 8793651063

## न्या. वर्मा प्रकरणी सुनावणीतून सरन्यायाधीशांची ...

यांच्यावर आरोप सिद्ध केल्याचं आपल्या अहवालात नमूद केलं.

जस्टिस वर्मा यांनी १८ जुलैला सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. त्यांनी म्हटलं की, केवळ निवासाच्या बाहेरील भागातून रोख रक्कम सापडल्यामुळे त्यांच्यावर आरोप निश्चित करणं चुकीचं आहे. त्यांनी ५ प्रश्न विचारले आणि समितीचा अहवाल रद्द करण्यासाठी १० तर्क दिले. सर्वोच्च न्यायालयात कपिल सिब्बल यांनी वर्मा यांच्यावतीने युक्तिवाद सादर केला. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीस गवईंनी स्वतःला यातून बाजूला केलं. न्यायालयाने सांगितलं की, प्रकरणाच्या सुनावणीसाठी नवं खंडपीठ तयार केलं जाईल.

२१ जुलै रोजी १४५ खासदारांनी लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांना याचिका सादर केली. राज्यसभेत पन्नासपेक्षा जास्त सदस्यांनी सुद्धा समर्थन केलं. केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी सांगितलं की, "महाभियोग प्रस्तावासाठी सर्व पक्ष सहमतीने पुढे येत आहेत." आता सर्वोच्च न्यायालयात नवीन खंडपीठ प्रकरणाची सुनावणी करणार असून, संसदेच्या दोन्ही सभागृहात महाभियोग प्रस्ताव सादर होण्याची शक्यता आहे.

## हिंमत असेल तर राजीनामा घेऊन दाखव- कदम



असल्याचा आरोप करत लाज कशी वाटत नाही? असा सवालही विचारला होता. आता, शिवसेना नेते आणि योगेश कदम यांचे वडिल रामदास कदम यांनी अनिल परब यांच्यावर पलटवार केला आहे. तसेच, अनिल परब यांच्याविरुद्ध दोन दिवसांत हक्कभंग आणणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अनिल परबने दादागिरीची भाषा करू नये, मी भीक घालत नाही. हिंमत असेल तर राजीनामा घेऊन दाखव, असे आव्हान रामदास कदम यांनी अनिल परब यांना दिलं आहे. मी राज्यातले सगळे डान्सबार बंद करण्याची मोहिम हाती घेण्यासाठी योगेश कदम यांना सांगणार आहे, असेही त्यांनी म्हटले.

# भारताने पुन्हा एकदा पाकला फटकारले

## पाकिस्तानमधील दहशतवादाबद्दल संयुक्त राष्ट्रात परखड भाष्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रांच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त, भारताने जागतिक शांतता, बहुपक्षीय सहकार्य आणि दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका मांडली. भारताने पुन्हा एकदा दहशतवादाबाबत पाकिस्तानला फटकारले आहे. शीतयुद्धानंतर संघर्षांचे स्वरूप कसे बदलले आणि दहशतवादी संघटनांची भूमिका कशी वाढली हे संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे राजदूत पार्वतानेनी हरीश यांनी त्यांच्या भाषणात स्पष्ट केले.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये भारताने पाकिस्तानवर जोरदार शब्दांत टीका केली. भारताचे संयुक्त राष्ट्रांतील स्थायी प्रतिनिधी परवथनेनी हरीश यांनी पाकिस्तानला दहशतवादात बुडालेला आणि आयएमएफकडून सातत्याने कर्ज घेणारा देश, म्हणून संबोधले. त्यांनी यावेळी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करत भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर' चे समर्थन केले.

परवथनेनी हरीश यांनी स्पष्ट केलं की, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचे बळी गेले. त्या घटनेनंतर भारताने ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' राबवले, जे पाकिस्तान व पाकिस्तानव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केंद्रित होते. "ही कारवाई मर्यादित, मोजकी आणि वाढीव संघर्ष टाळणारी होती," असं हरीश यांनी सांगितलं. "मुख्य उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर पाकिस्तानच्या विनंतीनुसार सैनिकी कारवाया थांबवण्यात आल्या," त्यांनी स्पष्ट केलं. या कारवाईदरम्यान काही सीमाभागांवर गोळीबाराच्या घटना घडल्या, मात्र १० मे रोजी युद्धविराम घोषित करण्यात आला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान दरम्यान शांततेसाठी मध्यस्थी केली असल्याचा दावा केला होता, त्यावर भारताने परस्पर चर्चेच्या माध्यमातून युद्धविराम साधल्याचे स्पष्ट केले.

हरीश यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये दहशतवाद आणि त्यास प्रोत्साहन देणाऱ्या राष्ट्रांवरही कठोर शब्दांत टीका केली. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देताना भारताने म्हटले की, एकीकडे, भारत एक परिपक्व लोकशाही, एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था आहे. तर दुसरीकडे, पाकिस्तान असा देश आहे जो अतिरेकीपणा आणि दहशतवादात बुडालेला आहे आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून सतत कर्ज घेत आहे.

भारताने स्पष्टपणे सांगितले की, पाकिस्तानी दहशतवादी शाळांवर हल्ला करून निष्पाप मुलांचे जीव घेतात आणि अफगाण सीमेवरील निर्वासित शिबिरांवर पाकिस्तानी सैन्य बॉम्ब हल्ला करते, ज्यात अनेक मुलांचा बळी जातो. अशा परिस्थितीत पाकिस्तानला दहशतवादाच्या मुद्द्यावर बोलण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. पी. हरीश यांनी पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेवर तीव्र टीका केली.

भारताने पाकिस्तानला नवीन आर्थिक पॅकेज देण्याच्या प्रस्तावावर तीव्र आक्षेप नोंदवला. भारताने पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय निधीचा, विशेषतः नाणेनिधीकडून मिळालेल्या कर्जाचा, सीमापार दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देण्यासाठी दुरुपयोग करत असल्याचा गंभीर आरोप केला. भारताने जागतिक कर्ज देण्याच्या चौकटीत नैतिक विचारांचा समावेश करण्याची मागणी केली.

संयुक्त राष्ट्र स्थापनेला ८० वर्षे पूर्ण होत असताना, आपल्याला बहुपक्षीयतेच्या आणि शांततामूलक वाद निवारणाच्या उद्दिष्टांचा आढावा घेणे आवश्यक आहे, असे हरीश यांनी नमूद केले. त्यांनी सुरक्षा परिषदेमध्ये प्रतिनिधित्वाच्या अभावावरही चिंता व्यक्त केली. हरीश यांनी भारताची शांततेच्या मार्गावरची वचनबद्धताही अधोरेखित केली. भारत हा संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य असून, आजवर शांतता राखण्यासाठी जगभरात सर्वाधिक शांतीसैन्य पाठवणारा देश आहे, असे त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय स्थैर्य, समावेशकता आणि न्याय्य व्यवस्था यासाठी भारत सदैव कटिबद्ध राहील, असे स्पष्ट करत त्यांनी भाषणाची सांगता केली.



### बंगाली भाषिकांवर हल्ले, टीएमसीची चर्चेची मागणी

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी लोकसभा आणि राज्यसभेत नोटीस सादर करून विविध राज्यांमध्ये बंगाली भाषिक स्थलांतरितांवर होणाऱ्या कथित भेदभावावर चर्चा करण्याची आणि मतदार याद्यांमध्ये विशेष सखोल सुधारणा करण्याची मागणी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तृणमूलच्या खासदारांनी दोन्ही सभागृहात नोटिसा सादर केल्या असून, विविध राज्यांमध्ये बंगाली भाषिक स्थलांतरितांना भेडसावणाऱ्या परिस्थितीवर थोडक्यात चर्चा करण्याची मागणी केली आहे. बिहारमध्ये सध्या सुरू असलेल्या आणि इतर राज्यांमध्ये विस्तारित करण्यात येणाऱ्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी ही नोटीस देण्यात आली आहे.



### राजीनामा देण्यापूर्वी धनखड यांची राष्ट्रपती भवनाला भेट

**नवी दिल्ली :** माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड़ यांनी राजीनामा देण्यापूर्वी सोमवारी सायंकाळी उशिरा राष्ट्रपती भवनाला भेट दिली. धनखड़ यांनी सोमवारी रात्री नऊच्या सुमारास राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेऊन त्यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. त्यानंतर अर्ध्या तासानंतर त्यांनी आपला राजीनामा एक्सवर जाहीर केला. धनखड़ यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, आरोग्य सेवेला प्राधान्य देण्यासाठी आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करण्यासाठी मी घटनेच्या कलम ६७ (अ) नुसार ताबडतोब उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा देतो. ७४ वर्षीय धनखड़ यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये पदभार स्वीकारला होता आणि त्यांचा कार्यकाळ ऑगस्ट २०२७ मध्ये संपणार होता. राज्यसभेचे पदसिद्ध सभापती धनखड यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अनपेक्षितपणे राजीनामा दिला.

# एक लाखात विधवा महिलेचा सौदा

## अंगावर काटा आणणारी घटना

पती आणि एका मुलाच्या अकस्मात मृत्यूनंतर विधवा महिलेचा तिच्या सासरच्या लोकांनी एक लाख वीस हजार रुपयांमध्ये सौदा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या सौद्यामध्ये विधवा महिलेला सासरच्या लोकांनी गुजरातमधील एका व्यक्तीला विकलं. या व्यक्तीनं विधवा महिलेचं लग्नाच्या नावाखाली दोन वर्षे शारीरिक आणि मानसिक शोषण केलं. दरम्यान तिच्यापासून मूल झाल्यानंतर त्यानं महिलेला तिच्या गावी सोडलं. पोलीस बेपत्ता व्यक्तींचा शोध घेत असताना हा धक्कादायक प्रकार समोर आलाय. सध्या महिला तिचा बेपत्ता मुलगा आणि मुलीचा शोध घेण्याची विनंती करत आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पाटणा :** आर्णी पोलीस स्टेशन हद्दीतील एका महिलेच्या पती आणि एका मुलाचा अकस्मात मृत्यू झाला होता. परिस्थिती हलाकीची असल्यामुळं दुसरा मुलगा आणि मुलीसह ती सासरी राहात होती. या निराधार महिलेच्या अवस्थेचा गैरफायदा घेऊन तिला रोजगार मिळवून देतो, असं सांगून तिची नणंद आणि नणंदेच्या नवऱ्यानं तिला मध्य प्रदेशात नेलं. तिथं त्यांनी विधवा महिलेला एक लाख वीस हजार रुपयांत गुजरात मधल्या एका व्यक्तीला विकलं. त्या व्यक्तीनं विधवा महिलेचं तब्बल दोन वर्ष शारीरिक आणि मानसिक शोषण केलं. पुत्रप्राप्तीनंतर त्यानं या महिलेला गावात सोडलं.

आर्णी पोलिसांनी बेपत्ता लोकांसाठी सुरू केलेल्या शोध मोहिमेतून हा धक्कादायक प्रकार उघड झाला. या महिलेचा एक मुलगा आणि मुलीचा अद्याप पत्ता लागलेला नाही. त्यांना शोधून द्यावं, अशी मागणी महिलेनं केली आहे. २०२३ मध्ये मुलगी आणि नातवंडं बेपत्ता आहेत, अशी तक्रार पीडित महिलेच्या आई-वडिलांनी पोलिसांत केली होती. आर्णी पोलीस बेपत्ता महिलेचा शोध घेत असताना त्यांना ही महिला गावीच असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी महिलेकडं चौकशी केली असता हा धक्कादायक प्रकार पुढं आला. याप्रकरणी पोलिसांनी तिची सासू, सासरे, दीर नणंद आणि तिचा नवरा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महिला आणि मुलींच्या असहायतेचा आणि अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांची विक्री करण्याचे अनेक प्रकार यवतमाळ जिल्ह्यात घडल्याची चर्चा आहे. याप्रकरणी कडक उपाययोजना आखण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.

२०२३ ला दीर, सासू, सासरा आणि मध्य प्रदेशमध्ये राहणाऱ्या नणंद, नंदोई यांनी संगममतानं गुजरातमधील एका व्यक्तीला विकलं. हा सौदा एक लाख वीस हजार रुपयांत झाला होता. त्यापैकी ८० हजार रुपये पीडित महिलेच्या समोर नणंद आणि नंदोई यांना देण्यात आले. यानंतर दोन वर्षे गुजरातमधील व्यक्तीनं तिचं शारीरिक शोषण केलं. यातून तिला मुल झालं. २०२३ साली महिला बेपत्ता असल्याची नोंद आमच्या इथं झाली होती. या महिलेचा शोध घेत असताना या सर्व बाबी आमच्या लक्षात आल्या. महिलेच्या तक्रारीवरून विविध कलमांनुसार चार जणांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेतलं आहे. याप्रकरणाचा उर्वरित तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांनी दिली.

# पाकच्या विमानांना भारतीय हद्दीत बंदी कायम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तानी विमानांना भारतीय हवाई हद्दीत प्रवेश करण्यावरील बंदी २३ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. याबाबतची माहिती नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी एक्सवर पोस्ट करत दिली आहे. "पाकिस्तानच्या विमानांना भारतीय हवाई क्षेत्रात प्रवेश प्रतिबंधित करणारी नोटीस टू एअरमन (नोटाम) अधिकृतपणे २३ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविली आहे. हा निर्णय सध्याच्या सुरक्षा प्रोटोकॉलनुसार आहे." असे त्यांनी म्हटले आहे.

पाकिस्तानने गेल्या आठवड्यात भारतीय विमानांना त्यांच्या हवाई हद्दीत प्रवेश बंदी करण्याचा कालावधी आणखी एक महिना वाढवून २४ ऑगस्टपर्यंत केला आहे. ही बंदी २४ ऑगस्ट रोजी सकाळी ५:१९ वाजेपर्यंत (भारतीय वेळेनुसार) लागू राहणार असल्याचे पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाने म्हटले आहे. पाकिस्तानच्या या निर्णयानंतर भारतानेदेखील मोठा निर्णय घेत पाकिस्तानच्या विमानांना भारतीय हद्दीत प्रवेश बंदी कायम ठेवली आहे.

दरम्यान, २३ ते २५ जुलै दरम्यान भारत- पाकिस्तान सीमेवर राजस्थानमध्ये होत असलेल्या भारतीय हवाई दलाच्या सरावासाठी ही नोटीस टू एअरमन जारी करण्यात आली आहे. भारतीय हवाई दल राजस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात लष्करी सराव करत आहे. यात बाडमेर ते जोधपूरपर्यंतचा परिसराचा समावेश आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून भारताने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यानदेखील अशाच प्रकारच्या नोटीस जारी करण्यात आल्या होत्या.

### शस्त्रतस्करी प्रकरणी चौघांना अटक

**चंदीगड :** सीमेपलीकडून शस्त्रास्त्रांची तस्करी करणाऱ्या चौघांना पंजाब पोलिसांनी दोन



वेगवेगळ्या कारवाईत अटक केली असून त्यांच्याकडून आठ बेकायदा शस्त्रेही जप्त केली आहेत. पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, गुप्त माहितीच्या आधारे अमृतसर ग्रामीण पोलिसांनी सीमा सुरक्षा दल (बीएसएफ पंजाब) सोबत संयुक्त कारवाईसह दोन वेगवेगळ्या मोहिमांमध्ये सीमेपलीकडून शस्त्रतस्करीत गुंतलेल्या चार आरोपींकडून आठ अवैध शस्त्रे जप्त केली. अमृतसरमधील घरिंडा पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला असून, संपूर्ण नेटवर्क आणि त्याचे संबंध उघड करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

## बीएमडब्ल्यू मागणाऱ्या पत्नीला न्यायालयाने फटकारले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पतीकडून पोटगीत १२ कोटी रुपये, मुंबईतील फ्लॅट आणि बीएमडब्ल्यू कारची मागणी करणाऱ्या महिलेला सर्वोच्च न्यायालयाने फटकारले. सुशिक्षित महिलांनी त्यांच्या देखभालीसाठी पतीच्या पैशावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःसाठी कमवावे, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले. या प्रकरणात महिलेने लग्नाच्या १८ महिन्यांत पतीपासून वेगळे झाल्यानंतर ही पोटगीची मागणी केली. न्यायालयाने या प्रकरणावर आदेश राखून ठेवला.

सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी महिलेच्या पोटगी मागणीवर प्रश्न उपस्थित केला. तुमचे लग्न फक्त १८ महिने टिकले आणि आता तुम्हाला बीएमडब्ल्यू देखील हवी आहे? दरमहा एक कोटी देखील पाहिजे? असे सवाल सरन्यायाधीशांनी केले. पोटगीची मागणी करणारी महिला एमबीए आणि आयटी तज्ज्ञ आहे. यावर महिलेने प्रतिवाद केला की, तिचे पती खूप श्रीमंत आहेत. महिलेने आरोप केला की, पतीमुळे तिची नोकरी गेली आणि त्याने तिच्याविरुद्ध खोटा एफआयआर दाखल केला. यावर सरन्यायाधीश गवई यांनी आश्वासन दिले की, एफआयआर रद्द करू. यानंतर न्यायालयाने पती आणि पत्नीला एकमेकांविरुद्ध कोणतीही फौजदारी कारवाई करु नये असे निर्देश दिले.



बेट लाहिया, पॅलेस्टिनी प्रदेश
उत्तर गाझा पट्टीतील बेट लाहिया येथे, मदत साहित्याचे वाटप करण्यात आले, तेव्हा ते घेण्यासाठी विस्थापितांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली.

### गुगल प्ले, अँड्रॉईडमुळे ४ लाख कोटींचा महसूल

**नवी दिल्ली :** इकॉनॉमिक्स, पॉलिसी अँड ओपिनियन रिसर्च कन्सल्टन्सी पब्लिक फर्स्टच्या ताज्या अहवालानुसार गुगल प्ले आणि अँड्रॉईडने




२०२४ मध्ये ॲप प्रकाशक आणि व्यापक भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अंदाजे ४ लाख कोटी रुपयांचा महसूल कमावला. भारतातील डिजिटल अर्थव्यवस्था जगातील सर्वात मोठी आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, वेगवान स्मार्टफोन स्वीकारणे, परवडणारा डेटा आणि डेव्हलपर्स आणि उद्योजकांच्या गतिशील इकोसिस्टममुळे अभूतपूर्व गती अनुभवत आहे, असे गुगल प्ले आणि अँड्रॉइडचा भारतातील प्रभाव आणि योगदान मोजणाऱ्या अहवालात म्हटले आहे. या अहवालानुसार, भारताच्या डिजिटल क्रांतीमुळे आधुनिक अर्थव्यवस्थेत कोट्यवधी लोक कसे सहभागी होतात हे बदलत आहेत, हे स्पष्ट होते.

# संभलमधील मंदिरात ४६ वर्षांनंतर भाविकांना दर्शन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभल :** संभल जिल्ह्यातील खग्गू सराय परिसरातील कार्तिकेय महादेव मंदिरात तब्बल ४६ वर्षांनंतर शिवरात्रीनिमित्त भाविकांनी दर्शन घेतले. सकाळपासूनच भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी करण्यास सुरुवात केली. कतारमधील एका मंदिरात शिवभक्तपूजा करतात. उपविभागीय दंडाधिकारी विकास चंद्रा यांनीही भाविकांसह मंदिरात पूजा केली. मंदिर परिसर आणि जामा मशिदीभोवती प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. कार्तिकेय महादेव मंदिराचे दरवाजे तब्बल ४६ वर्षांनंतर डिसेंबरमध्ये उघडण्यात आले होते. त्यानंतर या मंदिरात पूजा सुरू झाली.

त्याचबरोबर संपूर्ण जिल्ह्यात शिवरात्रीबाबत शिवभक्तांमध्ये प्रचंड श्रद्धा आणि उत्साह आहे. हरिद्वार आणि इतर ठिकाणांहून पाणी घेऊन येणारे कांवरिया मंदिरांमध्ये जलाभिषेक करत आहेत. कांवड्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी प्रशासनाकडून ही पुरेशी व्यवस्था करण्यात आली आहे. शिवभक्तांच्या सुरक्षेसाठी वैद्यकीय पथकेही उपस्थित होती. याशिवाय संवेदनशील ठिकाणी पीएसी, आरआरएफ, महिला पोलिस तैनात आहेत.

कांवड यात्रेदरम्यान डीजेवर गजबजलेल्या भक्तिगीतांनी वातावरण अधिकच चैतन्यमय केले. ठिकठिकाणी मंडप उभारण्यात आले असून, तेथे राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. संभल शहरातील प्रमुख चौक, मंदिरे आणि रस्त्यांवर नागरिकांनी स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने जलपान वाटपाची व्यवस्था केली आहे.

श्रावण महिन्याचे औचित्य साधून चांदौसी श्री कांवर सेवा समितीच्या वतीने मंगळवारी मोठ्या थाटामाटात भगवान शंकराची मिरवणूक काढण्यात आली. चारही बाजूंनी हर-हर महादेवाच्या जयघोषाने वातावरण भरून गेले होते. त्याचवेळी हरिद्वारहून पाणी घेऊन परतणाऱ्या कांवरियांचा एक गट अचानक चौकात हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यासाठी बसला. त्यामुळे चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. ज्यामुळे लोकांना काही काळ त्रासाला सामोरे जावे लागले. मात्र, हे वातावरण भक्तिमय पाहून लोकही शांतपणे निघून गेले. धडा संपल्यानंतर कांवड्यांची तुकडी आपापल्या गंतव्यस्थानाकडे निघाली.

# नीरेत महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** महसूल विभागांतर्गत राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकालात काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यासह पुणे जिल्ह्यात सध्या मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर पुरंदर तहसील कार्यालयाच्या वतीने नीरा (ता. पुरंदर) येथील श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरात २५९ प्राप्त अर्जांचा निपटारा तात्काळ करण्यात आला तर समस्यांच्या निवारणासाठी १० तक्रारी अर्जांची नोंद घेतली आहे. शिबिराचे उद्घाटन पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी केले.

नीरा शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सोमवारी (दि. २१) तहसील कार्यालय पुरंदर आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार विक्रम राजपूत, गटविकास अधिकारी प्रणोती श्रीश्रीमाळ, बांधकाम विभागाच्या स्वाती दहिवाल, निवासी नायब तहसीलदार संदिप पाटील, महसूल नायब तहसीलदार सोनाली वाघ, संजय गांधी योजना नायब तहसीलदार महादेव जाधव, भुमिअभीलखच्या स्मिता गौड, जलसंधारण अधिकारी ए. व्ही. आंबटवार, जिल्हा परिषदेचे बांधकाम अधिकारी रोहित बालगूडे, कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.विक्रम काळे, बालविकास प्रकल्प अधिकारी अनिल कांबळे, वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल शिवरकर, सहकार विभागाचे सह अधिक्षक भु. एन. मदने, पुरंदर उपसा सिंचन त्रिभुवन कदम, शिवप्रसाद पाटील, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता आनंदा पवार, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निर्मला माने,जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे, नीरेच्या सरपंच तेजश्री काकडे, कर्नलवाडीच्या सरपंच सुवर्णा महानवर, गुळूंचे पोलीस पाटील दिपक जाधव, पिंपरे (खुर्द) चे पोलीस पाटील रुपाली सोनवणे, पिसुर्टीचे पोलीस पाटील सुजाता बरकडे, कर्नलवाडी पोलीस पाटील दिनेश खोमणे, पिंगोरीचे पोलीस पाटील राहुल शिंदे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

शेतरस्त्याचे प्रश्न, श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी आपल्या तक्रारी व अडचणी मांडून या शिबिराच्या माध्यमातून सोडवून घ्याव्यात, असे आवाहन गटविकास अधिकारी प्रणोती श्रीश्रीमाळ यांनी केले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून शेकडो लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभप्रदान केले. तसेच स्वयं सहायता गट धनादेश वाटप, वय, राष्ट्रीयत्व, अधिवास दाखले, उत्पन्न दाखले, महिलांना बेबी केअर कीट, आभा कार्ड, अपघात विमा योजना लाभ, फळपीक विमा, सिंचन विहीर लाभ, नांगरणी यंत्र, घरकुल लाभ, बियाणे वाटप, नांगरणी यंत्र, पीठ गिरणी, सिंचन विहिरी लाभ सनद वाटप, प्रॉपर्टी कार्ड असे तब्बल २६९ लाभार्थ्यांना दाखले वाटप मान्यवरांच्या हस्ते झाल्याचे वाल्हे मंडळ अधिकारी भारत भिसे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महसूल नायब तहसीलदार सोनाली वाघ यांनी केले. स्वागतगीत सौ. लिलावती रिखवलाल कन्या विद्यालयाच्या विद्यार्थीनींनी केले. सुत्रसंचलन कन्या विद्यालयाच्या सहशिक्षिका माया गायकवाड व शिवाबाई मधे यांनी केले.



# लम्पीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात जनावरांमध्ये वेगाने पसरणाऱ्या लम्पी आजाराने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या तत्पर नेतृत्वामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.लम्पीमुळे काही शेतकऱ्यांचे पशुधन दगावले असून, या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच वळसे पाटील यांनी तातडीने प्रशासकीय यंत्रणा हलवली आहे.

अवसरी खुर्द येथील शेतकरी आकाश शिंदे आणि माजी सभापती संतोष भोर यांनी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन तालुक्यातील लम्पीच्या वाढत्या प्रादुर्भावाची माहिती दिली होती. वळसे पाटील यांनी जराही वेळ न घालवता आयुक्तांशी थेट बोलताना वळसे पाटील यांनी तालुक्यात लम्पीमुळे होणारे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान त्यांच्या निदर्शनास आणले, तसेच ज्या ठिकाणी लम्पीची लागण झालेली जनावरे आहेत तेथे पशुवैद्यकीय डॉक्टरांनी तातडीने घटनास्थळी जाऊन उपचार करावेत आणि प्रतिबंधात्मक औषधे व पावडर उपलब्ध करून द्यावीत असे आदेश दिले. त्यानंतर सोमवार (दि. २१) रोजी सकाळी, वळसे पाटील यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांनाही या परिस्थितीची माहिती दिली. जनावरांना योग्य उपचार मिळावेत आणि या आजाराचा प्रादुर्भाव कमी व्हावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.



वळसे पाटील यांच्या या तातडीच्या हस्तक्षेपानंतर प्रशासकीय यंत्रणा तात्काळ कामाला लागली. अवसरी खुर्द येथे डॉ.वाळूंज, डॉ.वाघ आणि त्यांच्या टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.त्यांनी लम्पीचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक औषधे आणि पावडरचे वाटप केले. यावेळी माजी उपसरपंच स्नेहा टेमकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन ढोणे, सुवर्णा क्षीरसागर, उर्मिला तांबे, शेतकरी शरद शिंदे पाटील आणि माजी सरपंच संगीता शिंदे पाटील उपस्थित होते. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दाखवलेल्या या कार्यतत्परतेमुळे आणि संवेदनशील भूमिकेमुळे आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. त्यांच्या या वेळेवरच्या हस्तक्षेपामुळे अनेक पशुधनाचे प्राण वाचण्यास मदत होईल, अशी आशा शेतकरी व्यक्त करत आहेत.

# दौंडकर स्मारकचे पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** स्व. आमदार बाबुराव दौंडकर स्मारक समिती गेले २८ वर्षे शिरूर तालुक्यातील कृषी व ग्रामविकासात काम करणारी एक अग्रगण्य संस्था असुन तालुक्यात अनेक व्यक्ती व संस्था विविध क्षेत्रात निरपेक्ष भावनेने काम करून समाजाची सेवा करीत आहेत त्याची दखल घेउन व त्यांचेपासुन प्रेरणा घेउन इतर घटकांनी देखील काम करावे या उद्देशाने बाबुराव दौंडकर स्मारक समितीच्या वतीने यावर्षी शिरुर तालुक्यात कृषी, पर्यावरण, जल व्यवस्थापण, सेवा, गोसेवा क्षेत्रात उल्लेखनिय काम करणा-या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार जाहीर करण्यात आले.

यामध्ये स्व. कांचनभाई शहा जलव्यवस्थापन पुरस्कार पाणीदार टीम, कान्हुर मेसाई ता. शिरूर, स्व. बिंदुमाधव जोशी पर्यावरण पुरस्कार ग्रामविकास फाउंडेशन कोंढापुरी ता. शिरूर, स्व. मधुकर आण्णा टेमगिरे कृषी गौरव पुरस्कार (पुरुष) कांतीलाल नाना नलगे, नागरगाव ता. शिरूर, स्व. संतोषबाप्पु गांधी गोसेवा पुरस्कार सुरेंद्र देव दहिवडी ता. शिरूर, स्व. गणपत मुर्कीदा खेडकर सेवाकार्य पुरस्कार महावीर की रोटी, शिरुर, स्व. बबुताई बाबुराव दौंडकर कृषी गौरव पुरस्कार (महीला) नुतन प्रवीण नळकांडे बुरुंजवाडी ता. शिरुर जि. पुणे यांना जाहीर करण्यात आले. पुरस्कार म्हणुन ५००१/- रुपये व मानपत्र देउन पुरस्कार्थींना गौरविण्यात येणार आहे. रविवारी (दि. ३ ऑगस्ट) रोजी सकाळी १०.३० वाजता समितीच्या सभागृहात रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे येथे शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे नियामक मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. एस. के. जैन यांचे हस्ते, चंदन पाटील प्रांत संघटन मंत्री भारतीय किसान संघ यांचे अध्यक्षतेखाली तर आमदार माउली कटके व पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे संचालक प्रदीप कंद यांचे उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष ॲड. धर्मेंद्र खांडरे व उपाध्यक्ष श्री धनंजय गायकवाड, सागर फराटे यांनी दिली.

# चैतन्य विद्यालयात पालक सभा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरमध्ये इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सहविचार सभा चार टप्प्यांमध्ये आयोजित करण्यात आली होती.या सहविचार सभेस ५५० पालक उपस्थित होते.या पालक सभा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाल्याची माहिती शिक्षक पालक संघाचे सचिव अजित डांगे यांनी दिली.

ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे यांनी शाळा व संस्था विद्यार्थ्यांच्या प्रगती साठी करत असलेले प्रयत्न व उपलब्ध करून देत असलेल्या भौतिक सुविधा याबाबत माहिती दिली. चैतन्य हा एक परिवार आहे. आपण सर्वजण याचे घटक आहोत.पालकांनी आमच्यावर विश्वास ठेवून यावर्षी पाचवीला २७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. हा विश्वास आम्ही सार्थ ठरवू असे आश्वासन दिले. पाल्याचे भविष्य एकमेकांच्या सहकार्याने उज्वल करूया. शैक्षणिक वर्षात गुणवत्ता वाढीसाठी राबवण्यात येणारे उपक्रम, संस्कार, शिस्त व पालकांची जबाबदारी, विद्यार्थ्यांचा आहार व आरोग्य, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अभ्यासाच्या सवयी, स्पर्धा व बाह्य परीक्षांविषयी माहिती, विविध शालेय समित्यांचे एकत्रीकरण करणे व समिती वरील सदस्य निवड करणे या विषयांवर प्रदीप गाढवे, पंकज घोलप, राजश्री भालेकर, संजय हिरे, अनिल उकीरडे, भाऊसाहेब खाडे, संतोष कांबळे, मिलिंद खेत्री, विशाल चौधरी, सोनाली माळवे, अमित झरेकर, मंगेश तांबे, अजित डांगे, देवचंद नेहे, अनिल जवरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित पालकांच्या वतीने श्रीकांत महाकाळ,सखाराम वाळेकर, शेखर डुंबरे, स्वाती कुलवडे, रेखा पानसरे, निकेत डुंबरे, गोरख फापाळे, सचिन तांबे, अरुणा आरोटे, जयश्री डुंबरे, सुहास डेरे, तुलसी पटेल यांनी शाळा विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, विद्यालयाची वाढती गुणवत्ता,शिक्षक विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेत असलेले कष्ट,श्रम,विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ याबाबत समाधान व्यक्त केले. प्रास्ताविक संजय हिरे,आशा गाडेकर,सोनाली कांबळे व सूत्रसंचालन शिल्पा भालेराव,वनिता भोर यांनी केले.



# वळतीत विविध विकासकामांचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** वळती (ता. आंबेगाव) येथे माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या विविध विकास कामांचा उद्घाटन, भूमिपूजन, लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

वळती गावातील नागरिकांची सन २०१५-१६ पासून प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची मागणी होती. आता वळती गावाला प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर झाले आहे. त्याचे भूमिपूजन माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे ,शरद बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, बाजार समितीचे सभापती नीलेश थोरात, शरद बँकेच्या संचालिका सुषमाताई शिंदे, शिवाजीराव लोंढे, किसनराव लोखंडे बारकू बेनके, रमेश खिलारी, अजय आवटे, पोपट थिटे सरपंच आनंद वाव्हळ, गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, गटशिक्षणाधिकारी प्रमिला धोका, आदी मान्यवर, वळती-गांजवेवाडी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यावेळी म्हणाले, वळती गावातील माजी जिल्हा परिषद सदस्य दिवंगत देवराम दामाजी भोर यांच्या



वळती प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी मान्यवर. (छायाचित्र - किशोर खुडे.)

पासून हे गाव नेहमी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मागे ठाम उभे राहिले आहे. गावाने सुरुवातीला माजी आमदार स्व.दत्तात्रय वळसे पाटील यांना साथ दिली.त्यानंतर गेली ३५ वर्षे वळती गाव माझ्यापाठी खंबीरपणे उभे आहे. आम्ही कधीही राजकारण केले नाही. सात वेळा जनतेला लोकप्रतिनिधी म्हणून मला निवडून दिले. अनेक मंत्री पदांवर मी काम केले. विधानसभेचा अध्यक्ष म्हणून देखील काम केले. मिळालेल्या पदांचा सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक शिवाजीराव लोंढे यांनी केले.यावेळी सरपंच आनंद वाव्हळ, रमेश खिलारी, वैभव उंडे यांची मनोगते झाली. सूत्रसंचालन अनिल वाजे यांनी केले. आभार बारकू बेनके यांनी मानले.

**संबंधित अधिकाऱ्यांना सूचना**

वळती ते नागापूर गावांदरम्यान असलेल्या मीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे ढापे जीर्ण झाले आहेत. त्यामुळे बंधाऱ्यात पाणी साठून राहत नाही. अल्पावधीतच बंधारा कोरडा ठाक पडतो. या बंधाऱ्याच्या दुरुस्ती कामासाठी निधी मिळावा. अशी मागणी शिवाजीराव लोंढे यांनी यावेळी केली. त्यावर वळसे पाटील म्हणाले, संबंधित अधिकाऱ्यांना बंधाऱ्याची पाहणी करून त्याची दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या जातील.

## संतोष लांडे यांचे निधन



**कारेगाव :** रांजणगाव गणपती, ता.शिरुर येथील युवा उद्योजक संतोष दत्तोबा लांडे (वय.५१) यांचे नुकतेच आकस्मित निधन झाले. गावातील विविध धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. त्यांच्या पश्चात आई,वडील, भाऊ,बहिणी,एक मुलगा, एक मुलगी व पुतणे असा परिवार आहे. येथील देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष दत्तोबा लांडे यांचे ते पुत्र तर रांजणगाव विकास संस्थेचे अध्यक्ष राजेश लांडे व उद्योजक विजय लांडे यांचे ते धाकटे बंधू होत.

## सहकार भारतीच्या जिल्हा संघटन प्रमुखपदी नितीन कुलकर्णी



**नीरा :** नीरा (ता. पुरंदर) येथील नितीन कुलकर्णी यांची सहकार भारतीच्या पुणे जिल्ह्याच्या संघटन प्रमुखपदी निवड करण्यात आली.सहकार भारती पुणे विभागाचा निवासी अभ्यासवर्ग आळंदी येथे पार पडला. यावेळी सहकार भारती पुणे जिल्ह्याची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सहकार भारती "बिना संस्कार नही सहकार, विना सहकार नही उद्धार" या उद्देशाने गेली ४७ वर्ष काम करीत आहे. नुकताच सहकार भारती पुणे विभागाचा निवासी अभ्यासवर्ग श्री. क्षेत्र आळंदी येथे संपन्न झाला. त्यामध्ये सहकार भारती पुणे जिल्ह्याची कार्यकारिणी घोषणा सहकार भारतीचे पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी केली. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष तसेच भारती सहकारी बँकेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब कड, सहकार भारतीचे केंद्रीय पदाधिकारी विनय खटावकर, रा.स्व. संघ प्रांत बौद्धिक मंडळाचे सदस्य मकरंद ढवळे, पुणे महानगर अध्यक्ष दिनेशजी गांधी, पिंपरी चिंचवड महानगर अध्यक्ष दशरथ जाधव उपस्थित होते. यावेळी प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी सहकार भारती काल, आज व उद्या या विषयावर मार्गदर्शन केले. पुणे महानगर अध्यक्ष दिनेश गांधी यांनी प्रस्तावना केली तर पिंपरी चिंचवड महानगर अध्यक्ष दशरथ जाधव यांनी आभार मानले. पुणे जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे - विनायक तांबे - पुणे जिल्हा अध्यक्ष, उत्तम फाळके - पुणे जिल्हा महामंत्री, नितीन कुलकर्णी- पुणे जिल्हा संघटन प्रमुख, बाळासाहेब गाढवे - पुणे जिल्हा सह संघटन प्रमुख, प्रतिभा कांचन - पुणे जिल्हा महिला प्रमुख, भाऊसाहेब आवळे - पुणे जिल्हा साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख, अनंत निकम - साखर कारखाना सह-प्रकोष्ठ प्रमुख, मच्छिन्द्र ताकवणे - पुणे जिल्हा दुग्ध प्रकोष्ठ प्रमुख, उदय आचार्य, पुणे जिल्हा दुग्ध प्रकोष्ठ सहप्रमुख, विनोद अष्टुल - पुणे जिल्हा पतसंस्था प्रकोष्ठ सहप्रमुख, संजय वरुडे - पुणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य

## अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर



**जेजुरी :** उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जेजुरी रेल्वे स्टेशन येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात रक्तदान,नेत्र तपासणी, चष्मे वाटप, वृक्षारोपण करण्यात आले याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जेजुरी शहर अध्यक्ष रमेश लेंडे, कात्रज दुध संघाचे व्हा. चेअरमन तानाजी जगताप, जेजुरी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष मोहन दादा महाजन, रोहिदास कुंभार, अविनाश भालेराव, माजी उपनगराध्यक्ष रमेश बयास, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे, तानाजी भालेराव, परवीन पानसरे,आदि मान्यवर उपस्थित होते. या शिबिराचा अनेक महिला व नागरीकांनी लाभ घेतला.

## जेजुरी भाजपाच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न

**बारामती :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जेजुरी शहर मंडल अध्यक्ष सचिन पेशवे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात दीडशे रक्तदात्यानी रक्तदान करून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मार्तंड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे , पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप , भाजपा पुणे जिल्हा दक्षिणचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, विश्वस्त पोपट खोमणे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये रक्तदान शिबिर संपन्न झाले. माजी आमदार संजय जगताप, जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, जेजुरी शहर भाजपा मंडल अध्यक्ष सचिन पेशवे, मंगेश घोणे यांनी वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी मा उपनगराध्यक्ष इनामदार राजाभाऊ पेशवे, समस्त ग्रामस्थ खांदेकरी मानकरी मंडळाचे माजी अध्यक्ष गणेश आगलावे, मार्तंड देव संस्थांनचे माजी प्रमुख विश्वस्त सुधीर गोडसे माजी नगरसेवक सचिन सोनवणे, अजिंक्य देशमुख, हेमंत सोनवणे, बाळासाहेब दरेकर,सतीश घाडगे,रवींद्र जोशी, दिगबर उबाळे,सरपंच अजिंक्य टेकवडे, राज्य परिषद सदस्य शैलेश तांदळे संभाजी काळाने संजय खोमणे पाटील, भाजपाच्या पदाधिकारी अलका शिंदे, मंगल पवार, उमा कुंटे, हरिचंद्र भापकर, शिवाजी बारसुडे, दशरथ उबाळे, तुकाराम यादव, पंकज घोणे, विलास राऊत, विक्रम माळवदकर अनिकेत हरपळे, निकिता धुमाळ, ईश्वर दरेकर, शिवसेनेचे शहर प्रमुख विठ्ठल सोनवणे, जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे, ग्रामीण संस्थेचे संचालक डॉ सुमित काकडे आदी उपस्थित होते.



## वाळद येथील कातकरी कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

**खेड :** वाळद, ता. खेड येथील ७ कातकरी कुटुंबांना प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेच्या माध्यमातून हक्काचे घर मिळणार आहे. या नियोजित घरांच्या कामाचे भूमिपूजन पंचायत समितीचे माजी सभापती भगवान पोखरकर यांच्या हस्ते बुधवारी (दि २३) करण्यात आले. लोकनियुक्त सरपंच मनोहर पोखरकर, उपसरपंच विक्रम पोखरकर यांच्या सह बाळासाहेब सावंत, प्रकाश पोखरकर, अशोक पोखरकर, रामभाऊ ढेरंगे, दीपक पोखरकर, लाभार्थी मारुती पवार व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. केंद्राच्या प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरासाठी अडीच लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.वाळद गावठाणात असलेल्या जागेत यापूर्वी चार घरकुल उभारण्यात आली आहेत. नव्याने सात कुटुंबांना घर बांधुन देण्यात येणार आहे. त्यात घरासह, शौचालय बांधुन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाणी पुरवठा, ड्रेनेज सुविधा देण्यात येणार आहेत, असे सरपंच मनोहर पोखरकर यांनी सांगितले.

## वृक्षारोपण ही काळाची गरज - दिलीप वळसे पाटील



**मंचर :** पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात वृक्षारोपण ही काळाची गरज आहे.निसर्गाचं संरक्षण म्हणजेच भविष्याची गुंतवणूक असून प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावण्याचा आणि त्याचे पालनपोषण करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जनविश्वास सप्ताहा अंतर्गत वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ नालंदा स्कूल,मंचर येथे करण्यात आला. त्यावेळी वळसे पाटील बोलत होते. याप्रसंगी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती निलेश थोरात, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विष्णू काका हिंगे, वैभव उंडे, सुषमा शिंदे, सागर काजळे, अरुण गिरे, सुनील बाणखेले, नितीन थोरात, मच्छिंद्र गावडे, राजेंद्र थोरात व शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ शेवाळवाडी-मणिपूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## कोकाटे यांच्या प्रतिमेचे दहन

**मंचर :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या फोटोचे महाळुंगे पडवळ येथे दहन करण्यात आले. कृषीमंत्र्यांना घरी पाठवा अशी मागणी हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी केली आहे. विधानसभेचे कामकाज सुरू असताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे सभागृहात बसून जंगली रमी खेळत असल्याची चित्रफित सर्वत्र फिरत आहे. याचा निषेध आज महाळुंगे पडवळ येथे करण्यात आला. हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर, उपसरपंच अनिल पडवळ ,वसंतराव भालेराव,याकूब इनामदार, शिवाजी पडवळ, रामहरी पडवळ, सदानंद चासकर, सुदाम पडवळ, दगडू चासकर, माणिक सैद ,गुलाब पडवळ ,संदीप पडवळ, युवराज सैद आदी यावेळी उपस्थित होते. कृषीमंत्र्यांच्या फोटोला पत्ते दाखवून त्यांचा फोटो व पत्ते जाळून निषेध करण्यात आला. बाबाजी चासकर म्हणाले राज्यात दररोज सहा शेतकरी आत्महत्या करीत असताना कृषिमंत्री ऑनलाइन रमी खेळत आहे. मंत्र्यांना कशाचेच भान राहिले नाही. विरोधी पक्षावर कारवाई करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी कृषी मंत्र्यांवर कठोर कारवाई करावी. केवळ पोकळ निषेध न करता कृषीमंत्र्यांना घरी पाठवा, अशी मागणी बाबाजी चासकर यांनी केली.

## पोंदेवाडी येथे बिबट्या जेरबंद

**मंचर :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पोंदेवाडी येथे मागील काही दिवसापासून धुमाकूळ घालणारा बिबट्या जेरबंद झाल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास टाकला आहे. सदर बिबट्या चार वर्षीय नर जातीचा आहे. पोंदेवाडी येथे मागील काही दिवसांपासून बिबट्याने धुमाकूळ मांडला होता यात अनेक पशुपालक शेतकरी त्रस्त झाले होते. मागील पंधरा दिवसापासून वन विभागाकडे पिंजरा लावण्याची त्यांनी मागणी केली होती. त्यानुसार मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या सूचनेवरून बबन नामदेव वाळुंज यांच्या घराजवळ पिंजरा पासून त्यात सावज ठेवण्यात आले होते.आज पहाटेच्या सुमारास या पिंजऱ्यामध्ये चार वर्षीय नर जातीचा बिबट्या जेरबंद झाला आहे, ही माहिती मिळतच वनपाल नीलम चव्हाण, वनरक्षक पूजा कांबळे व वन मजूर यांच्या साह्याने सदर बिबट्याला ग्रामस्थांच्या मदतीने ताब्यात घेऊन अवसरी रोपवाटिकेत आणले आहे. या बिबट्याची वैद्यकीय परीक्षण करून त्यानंतर त्याला निसर्ग सहवासात सोडून देणार असल्याचे वनविभागाने सांगितले.

# पुरंदर विमानतळाचे अखेर ठरले

### १०० शेतकऱ्यांची जागा संपादनास संमती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारने पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी पॅकेज जाहीर करताच स्थानिक १०० शेतकऱ्यांनी जागा देण्यास संमती दिली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहीर केल्यानुसार 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' अशा स्वरूपात मोबदला आणि विकसित भूखंड दिला जाणार असल्याने सात गावांमधून येत्या काही दिवसांत आणखी शेतकऱ्यांकडून संमतीपत्रे येतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पुरंदर विमानतळासाठी कुंभारवळण, एखतपूर, उदाची वाडी, मुंजवडी, खानवडी, पारगाव मेमाणे, वनपुरी या सात गावांतून २६७३ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पॅकेजचे स्वरूप जाहीर करण्यात आले. भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू करा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली होती. विमानतळानजीकच्या प्रस्तावित एरोसिटीत १० टक्के परताव्यासाठी २६८ हेक्टर अर्थात ६७० एकर जमीन राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विमानतळासाठी जमीन देण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांकडून संमतीपत्रे भरून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय आणि सासवड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयांत संमतीपत्रे दाखल करून घेण्यात येत आहेत. आतापर्यंत सात गावांतून सुमारे १०० जणांनी संमती दिली असून, त्यातून ५० हेक्टर जमिनीच्या (सुमारे १२५ एकर) संपादित करण्याची प्रक्रिया पुढे सरकणार असल्याचे स्पष्ट झाले.

भूसंपादन कायदा आणि महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ पुनर्वसन कायदा २०१९ नुसार चौपट मोबदला दिला जाणार आहे. तर एकूण संपादित जमिनीच्या १० टक्के विकसित जमीन शेतकऱ्यांना परत मिळणार आहे.



**एमआयडीसी 'प्लॅनिंग अथॉरिटी'**

● भूसंपादन करताना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर भूखंडांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रथम संमती कोण देणार, किती जण देणार याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, भूखंडांचे वाटप कशा पद्धतीने करायचे, औद्योगिक, वाणिज्यिक, निवासी प्रयोजनासाठी करताना संबंधित जमीनमालकांना कोणत्या ठिकाणी जमीन द्यायची याबाबतचा निर्णय महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) घेणार आहे. एमआयडीसीला याबाबत नियोजन अधिकारी म्हणून दर्जा प्राप्त करण्यात आला आहे. त्यामुळे त्याचा निर्णय 'एमआयडीसी' घेईल, असे स्पष्ट करण्यात आले

# खेड तहसिलदारांच्या निलंबनाची मागणी

### महिलेसह कार्यकर्त्यांचे प्रांत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** आंबेठाण, ता. खेड येथील जमिनीच्या जुन्या सातबारा उताऱ्यावरील दुरुस्ती (१५५ अंतर्गत ) मागणी प्रकरण रद्द केल्यावरून तसेच त्या दुरुस्तीसाठी मध्यस्थांमार्फत लाच मागणी करण्यात आल्याचा आरोप करून त्या विरोधात वारसदार असलेल्या सुरेखा बाळु नाईकनवरे यांनी मंगळवारी (दि २२) तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या विरोधात बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

प्रांताधिकारी कार्यालया समोर सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनात खेड तालुक्यातील अनेक संस्थांचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. या प्रकरणी खातेनिहाय चौकशी करून आंदोलकांनी तहसीलदार बेडसे यांच्यासह दोषींवर निलंबनाची मागणी केली आहे. चाकण एम आय डी सी मधील आंबेठाण गावच्या हद्दीत गट क्रमांक १५७ असुन २ हेक्टर २५.२५ आर क्षेत्र असलेल्या जमिन सातबारा दुरुस्तीचा हा विषय आहे.१९६४ पर्यंत सातबारा उताऱ्यावरील नोंदी बरोबर होत्या. त्यानंतर त्यात बदल झाला. त्याची दुरुस्ती करण्याकामी वारसानी ४ एप्रिल २०२४ मध्ये तेव्हाच्या तहसीलदार ज्योती देवरे यांच्या कडे पत्रव्यवहार केला होता. त्यांनी तीन सुनावण्या घेतल्या. नंतर प्रशांत बेडसे तहसीलदार म्हणुन रुजु झाले. त्यांनी जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख यांच्याकडे दाद मागावी असे पत्र देऊन हे प्रकरण निकाली काढले.

दरम्यान, या काळात तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी मध्यस्थांमार्फत अर्थपुर्ण मागणी केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या आंदोलनात स्वाभिमानी रिपब्लिकन महासभेचे हरेश देखणे, संदीप साळूंके, विकास शिंदे, सोनू काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास साडभोर, राम गोरे, वंचित बहुजन आघाडीचे, आरपीआयचे दिलीप नाईकनवरे, बाळासाहेब नाईकनवरे, वंचित चे महेंद्र नाईकनवरे, तुषार गायकवाड व इतर सहभागी झाले होते.




प्रांताधिकारी कार्यालया समोर उपोषणाला बसलेल्या सुरेखा नाईकनवरे व इतर (छायाचित्र - निखिल पाचारणे.)

> संबंधित प्रकरणी १९६४-६५ मध्ये बदल झाला आहे. २०१८ मध्ये अर्ज दाखल झाला असुन तो नियमात बसत नाही. गटवारी योजनेच्या अगोदरच्या नोंदीत तहसीलदार स्तरावर हस्तक्षेप करता येत नाही. त्यांना जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयाकडे दाद मागावी असे आवाहन केले आहे. काही मागणी झाल्याचा आरोप चुकीचा आहे. त्यासाठी जे कोणी मध्यस्थी असतील त्यांच्या विरोधात तक्रार केली पाहिजे."
>
> **— प्रशांत बेडसे,** तहसीलदार खेड.

## खेडमध्ये गुटख्याचा मोठा साठा जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड पोलीस स्टेशनच्या हद्दीत सांडभोरवाडी गावाजवळ पुणे नाशिक महामार्गाच्या जुन्या खेड घाट रस्त्यावर मंगळवारी (दि. २३) रात्री पावणेबारा वाजता पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे ४४ लाख ९ हजार २०० रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला जप्त केला. याप्रकरणी तुषार शांताराम बंदावणे (वय ३८, रा. बंदावणेशिवार, ता. खेड) आणि संदेश राजाराम ढमाले (रा. ढमालेशिवार, ता. खेड) यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम २६ (२), २६(४), ३० (२)(ए) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर, पिकअप वाहन (एमएच १४ एलबी ४६१५ ) च्या चालकाविरुद्धही तक्रार नोंदवण्यात आली आहे.

याबाबत पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी सांगितले की, खेड पोलिसांचे गस्ती पथक फिरतीवर असताना सांडभोरवाडी गावच्या हद्दीतील जुन्या खेड घाट रस्त्यावर तपासणी दरम्यान, एका टाटा कंपनीच्या लाल रंगाचा कंटेनर (एमएच १४ एलबी २००१) आणि महिंद्रा बोलेरो पिकअप (४६१५) मधून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाल्याचा साठा वाहुन नेत असताना आढळला. हा साठा संदेश राजाराम ढमाले याच्या मालकीच्या कंटेनरमध्ये ठेवण्यात आला होता, तर तुषार बंदावणे आणि पिकअप चालक यांनी संगनमताने हा माल वाहतुकीसाठी ताब्यात घेतला होता.



महाराष्ट्र राज्य अन्न सुरक्षा आयुक्तांच्या आदेशानुसार, गुटखा, पान मसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण, वाहतूक आणि विक्रीवर बंदी आहे. या प्रतिबंधित साठ्यामुळे जनआरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो, विशेषतः मुखाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. यामुळे आरोपींनी अन्न सुरक्षा कायद्याचे आणि भारतीय दंड संहितेचे उल्लंघन केल्याचे नमूद करण्यात आले आहे.हा गुन्हा पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे यांनी दाखल केला असून, सहाय्यक पोलिस निरीक्षक सिसोदे यांच्याकडे तपासाची जबाबदारी आहे. पोलिसांनी जप्त केलेला माल आणि वाहने ताब्यात घेतली असून, पुढील तपास सुरू आहे. अज्ञात पिकअप चालकाचा शोध घेण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. खेड पोलिसांनी केलेली ही कारवाई प्रतिबंधित पदार्थांच्या अवैध व्यापाराविरुद्ध मोठे यश मानले जात आहे.

## वाचनाने जीवन समृद्ध होते - ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** मनाच्या निरोगी वाढीसाठी वाचन आवश्यक असून वाचनाने मानवाचे जीवन समृद्ध होते, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सोमवारी (दि २१) मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयोजित 'पुस्तक भेट' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी, पालकांना मार्गदर्शन करताना ॲड देवेंद्र बुट्टे पाटील बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की विद्यार्थ्यांनी ज्ञानवृद्धी आणि प्रेरणा देणारे छंद जोपासायला हवेत. आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा आणि परिश्रम हा यशाचा राजमार्ग असून विद्यार्थ्यांनी यशापयशाचा विचार न करता सातत्याने प्रयत्न करीत राहायला हवे. विद्यार्थ्यांनी 'मन में है विश्वास' या आत्मकथनातून प्रेरणा घेऊन आपापल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील राहावे. या प्रसंगी प्रिया भालशिंगे आणि सृष्टी पवळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या माध्यमातून ६५ विद्यार्थ्यांना 'मन में है विश्वास' या पुस्तकाच्या प्रती देण्यात आल्या. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाचनसंस्कृतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयोजित 'पुस्तक भेट' उपक्रमात सहभागी मान्यवर.

# सामाजिक बांधिलकीतून रक्तदात्यांचा उत्साही प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** मुख्यमंत्री देवाभाऊ उर्फ देवेंद्र फडणवीस यांचे वाढदिवसा निमित्त राज्यात आयोजित महारक्तदान शिबिरांतर्गत भाजपा आळंदी शहर मंडळ आणि आळंदी ग्रामीण मंडळ आयोजित रक्तदान शिबिरास सामाजिक बांधिलकीतून रक्तदात्यांनी रक्तदानास उत्साही प्रतिसाद देत रक्तदान केले. आळंदीत आयोजित शिबिरांत ३०४ रक्तदात्यांनी रक्तदान करीत शिबिरास प्रतिसाद दिला.



आळंदी येथील श्री भैरवनाथ चौकातील ज्ञानदर्शन धर्मशाळेत भाजपा आळंदी मंडळाचे वतीने आणि साई मंगल कार्यालयात भाजपा आळंदी ग्रामीणचे वतीने मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांचे वाढदिवसा निमित्त रक्तदान श्रेष्ठदान, वाचावी गरजू रुग्नांचे प्राण, आरोग्य सेवेतील सामाजिक बांधिलकीचे कार्यास आळंदी शहर पंचक्रोशी मंडळ प्रमुख माजी नगराध्यक्षा वैजयंता उमरगेकर, आळंदी ग्रामीण पंचक्रोशी भाजपा मंडळ प्रमुख अमोल वीरकर यांनी शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख संजय घुंडरे पाटील, माजी उपनगराध्यक्ष रामदास भोसले, माजी नगरसेवक अशोक उमरगेकर, मंडूबाबा पालवे, अभिजित उमरगेकर, रेणुकादास पांचाळ, पश्चिम महाराष्ट्र आध्यात्मिक आघाडी अध्यक्ष संजयदादा घुंडरे पाटील, माजी उपाध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, सचिन गिलबिले, माजी नगरसेवक अशोकराव उमरगेकर, ज्ञानेश्वर रायकर, दिनेश घुले, सचिन काळे, माजी नगरसेविका रुक्मिणी कांबळे, गणेश राहणे, माजी नगराध्यक्ष. सुरेश वडगावकर, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस. अँड.आकाश जोशी, वासुदेव तुर्की, संकेत वाघमारे, उद्योजक श्याम कोलन, अभिषेक उमरगेकर, अनिल वाघमारे, शुभम दुर्वे, बंडू नाना काळे, सागर वहिले, शंतनू पोफळे, हिमांशू दळवी, बालाजी कांबळे, उज्वला पेटकर, अश्विनी दिघे , मीनाताई चव्हाण, जालिंदर महाराज भोसले, रेणुकादास पांचाळ, बाळासाहेब वडगावकर, राहुल घोलप, पांडुरंग ठाकूर, भागवतराव आवटे, एकनाथ मोरे, श्रीकांत काकडे, भागवत शेजुळ, ज्ञानेश्वर वाघमारे, सूर्यकांत भालेकर, प्रमोद बाफना, ज्ञानेश्वर महाराज देवस्थान विश्वस्त ह.भ.प. चैतन्य महाराज कबीरबुवा, ज्ञानेश्वर तापकीर, बंटी तापकीर, मनोहर दिवाणे आदी उपस्थित होते. यावेळी १९७ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. रक्तदात्यांनी उत्साही सहभाग नोंदविला.

गुरुवार, २४ जुलै २०२५

निरामय


राष्ट्रसंचार



# पन्नाशीनंतर काळजी घ्या

व्याधी विचार

प्रोस्टेट हा पुरुषांच्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. मात्र विशिष्ट वयानंतर प्रोस्टेट ग्रंथींचा आकार वाढू लागतो आणि याची परिणती प्रोस्टेट ग्रंथींच्या कॅन्सरमध्ये होते. पुरुषांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचं प्रमाण बरंच जास्त आहे. या विकाराला बऱ्याच बाबी कारणीभूत ठरतात. प्रोस्टेट कॅन्सरची वाढ मंद गतीने होत असल्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात त्याची लक्षणं लक्षात येत नाहीत. चुकीची जीवनशैली आणि आहाराच्या चुकीच्या सवयी प्रोस्टेट कॅन्सरला कारणीभूत ठरतात. जीवनशैलीत काही बदल करून प्रोस्टेट कॅन्सरचा धोका कमी करता येऊ शकतो. सर्वसाधारणपणे पन्नाशीनंतर पुरुषांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचा धोका वाढतो. पण सध्याच्या धकाधकीच्या काळात कमी वयाच्या पुरुषांनाही हा विकार जडू शकतो. प्रोस्टेट कॅन्सरच्या वाढीच्या कारणांची ही चर्चा...



वाढतं वय हे प्रोस्टेट कॅन्सरचं सर्वात महत्त्वाचं कारण ठरतं. पन्नाशी ओलांडलेल्या पुरुषांमध्ये हा कॅन्सर झपाट्याने पसरतो. त्यामुळे विशिष्ट वयानंतर पुरुषांनी प्रोस्टेट कॅन्सरची तपासणी करून घ्यायला हवी. जनुकीय कारणांमुळेही हा विकार होऊ शकतो. कुटुंबात प्रोस्टेट कॅन्सरचा इतिहास असेल तर पुरुषांनी विशेष काळजी घ्यायला हवी. आहाराच्या चुकीच्या सवयीही प्रोस्टेट ग्रंथींच्या वाढीला कारणीभूत ठरत आहेत. जंक फूड, लाल मांस, मेदयुक्त दुग्धजन्य पदार्थांच्या अतिसेवनामुळे प्रोस्टेट ग्रंथींच्या कॅन्सर होऊ शकतो. स्थूलत्व हे अनेक विकारांचं मूळ असू शकतं.

# गोड न खाताही होऊ शकतो मधुमेह

आरोग्य विशेष

डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे



मधुमेह हा एक जुनाट आजार असून त्यावर कोणताही इलाज नाही. केवळ आहार आणि जीवनशैली सुधारून तो नियंत्रित वा रोखला जाऊ शकतो. या आजाराबद्दल अनेकांच्या मनात गैरसमज आहेत. बऱ्याच लोकांना वाटते की मधुमेह फक्त जास्त साखर किंवा गोड खाणाऱ्या लोकांना होतो. मात्र टाइप २ मधुमेह जास्त साखर खाल्ल्याने होतोच असे नाही. रक्तात जास्त साखर असणे हे टाइप २ मधुमेहाचे लक्षण आहे; परंतु जास्त साखर खाणे हे रोगाचे मुख्य कारण असेलच असे नाही.

**मधुमेह का होतो?**

टाइप २ मधुमेहाचे मुख्य कारण इन्सुलिन प्रतिरोध हे आहे. यकृतामध्ये तसेच स्नायूंच्या पेशींमध्ये फॅटी ॲसिड तयार झाल्यामुळे इन्सुलिनला प्रतिकार होतो. ते इन्सुलिन रिसेप्टर्सला ब्लॉक करतात. त्यामुळे तेथे इन्सुलिन रक्तातून ग्लुकोज पेशींमध्ये प्रभावीपणे आणू शकत नाही. त्यामुळे रक्तातील साखर वाढते. इन्सुलिनच्या प्रतिकाराचे तीन मुख्य घटक असून त्यात शारीरिक हालचालींचा अभाव, अतिप्रमाणात चरबीयुक्त पदार्थ खाणे आणि जास्त कॅलरीयुक्त पदार्थांचे सेवन याचा समावेश होतो.

**मधुमेह टाळण्यासाठी काय करावे?**

टाइप २ मधुमेह लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता आणि अनुवांशिक कारणांमुळेही होऊ शकतो. कोणी जास्त चरबीयुक्त पदार्थ खात असेल किंवा वजन जास्त असेल तर तो साखर टाळतो. परंतु तरीही त्याला मधुमेहाचा धोका असतो कारण यामुळे इन्सुलिन डिस्चार्ज कमी होतो आणि इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता कमी होते. याव्यतिरिक्त, शरीरात विशेषतः व्हिसेरल फॅट असल्यास मधुमेहाचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत, इन्सुलिन चरबीच्या पेशींमध्ये जमा होते. वजन कमी केल्याने हे इन्सुलिन पुन्हा रक्ताभिसरणात आणण्यास मदत होते. त्यामुळे मधुमेह सुधारण्यासही मदत होते. त्याचप्रमाणे, तणाव आणि कमी झोपेमुळे हार्मोनल संतुलन आणि चयापचय विस्कळीत होते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते.

**काय करावे, काय करू नये?**

शारीरिकदृष्ट्या सक्रिय नसणे, वाढते वय आणि बरीच औषधे घ्यावी लागणे, विशेषतः स्टिरॉइड्स आणि काही अँटीडिप्रेसंट्सचे सेवन, जास्त साखर खाणे यामुळेही मधुमेहाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे आहाराकडे लक्ष देणे सर्वात महत्त्वाचे आहे. हा धोका टाळण्यासाठी ताजी आणि ऋतूनुसार उपलब्ध असणारी फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, कडधान्ये, मसूर आणि बिया खाव्यात आणि जंक, प्रक्रिया केलेले पदार्थ, तेलकट गोष्टी टाळल्या पाहिजेत. रोज किमान ४५ मिनिटे व्यायाम, योगा आणि ध्यान केल्याने खूप आराम मिळतो. हा धोका टाळण्यासाठी तणावापासून दूर राहून आठ तास चांगली झोप घेतली पाहिजे.

# लहान मुलांमध्ये कर्करोगाचा धोका

आरोग्यभान

डॉ. प्रसन्न नेने

लहान मुलांमध्ये कर्करोगाचा धोका वाढत असल्याची बाब समोर आली आहे. मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पिटल (टीएमएच) आणि खारघर येथील ॲडव्हान्स्ड सेंटर फॉर ट्रीटमेंट, रिसर्च ॲंड एज्युकेशन इन कॅन्सर (एसीटीआरईसी) येथील बाल कर्करोग उपचार संस्थांमध्ये गेल्या पाच वर्षांत कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये दोन टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट केले आहे.

मुंबई, बनारस, गुवाहाटी, विशाखापट्टणम, संगरूर, मुझफ्फरपूर येथील या सर्व केंद्रांमध्ये २०१९ मध्ये २,९८१ मुलांची उपचारासाठी नोंदणी करण्यात आली होती. २०२४ मध्ये ३,८७४ मुलांची नोंदणी झाली होती. याचा अर्थ असा, की गेल्या पाच वर्षांत नोंदणीमध्ये ३० टक्के वाढ झाली आहे. त्याच वेळी, इतर राज्यांमध्ये स्थापन झालेल्या टाटा केंद्रांमध्ये नोंदणींची संख्यादेखील वाढली आहे.

'इंडियन कॅन्सर सोसायटी'च्या मते, देशात दरवर्षी अंदाजे ५० हजार मुले कर्करोगाने ग्रस्त असतात. अर्थात मुलांमध्ये कर्करोगाच्या उपचारांमुळे उत्कृष्ट परिणाम मिळतात. रोग लवकर ओळखला गेला आणि उपचार दिले गेले तर ते बरे होतात.

टाटा मेमोरियल सेंटरच्या विस्तारामुळे या रुग्णांना फायदा होत आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत रुग्णांना उपचारासाठी मुंबईला यावे लागत होते; परंतु इतर राज्यांमध्ये टाटा सेंटर्स उघडल्यामुळे मुंबईसह त्या सेंटर्समध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. टाटा मेमोरियल सेंटरकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये मुंबईत २०८९ कर्करोगग्रस्त मुलांनी नोंदणी केली होती तर २०२४ मध्ये २,१३१ नवीन रुग्णांची नोंदणी झाली. टाटाच्या इतर पाच केंद्रांमध्ये २०१९ मध्ये ८९२ रुग्णांची नोंदणी झाली आणि २०२४ मध्ये नोंदणीची ही संख्या १७४३ पर्यंत पोहोचली. याचा अर्थ असा, की मुंबईत उपचार घेणाऱ्यांची संख्या पाच वर्षांत दोन टक्क्यांनी वाढली आहे आणि इतर पाच केंद्रांमध्ये ९५ टक्क्यांनी वाढली आहे.



रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या मुलांना उपचारानंतर खूप चांगले परिणाम मिळत आहेत. सुमारे ८० टक्के रुग्ण बरे होतात. त्याच वेळी, कर्करोगाच्या ट्यूमरने ग्रस्त असलेल्या ७० टक्के मुलांमध्ये हा आजार बरा होतो तर ३० टक्के मुलांमध्ये पुन्हा कर्करोग होतो.

या पार्श्वभूमीवर लक्षणे तपासणे गरजेचे आहे. एखाद्या मुलाला दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ ताप येत असेल, वजन कमी होत असेल, थकवा जाणवत असेल, भूक लागत नसेल, रक्तस्राव होत असेल तर ही रक्त कर्करोगाची लक्षणे असू शकतात. 'ब्रेन ट्यूमर'मुळे बराच काळ डोकेदुखी, उलट्या, चक्कर येणे, हाडांमध्ये वेदना होतात. अशावेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

आज कर्करोगाने कर्करोगाने ग्रस्त असणाऱ्या २५ टक्के मुलांना ल्युकेमियाचा त्रास आहे. हा पांढऱ्या रक्त पेशींचा कर्करोग आहे. तो अस्थिमज्जामध्ये तयार होणाऱ्या रक्तपेशींवर परिणाम करते. २५ टक्के मुलांना ब्रेन ट्यूमरचा त्रास आहे. यात मेंदूमध्ये कर्करोगाची गाठ तयार होते.

२० टक्के मुले लिम्फोमाने ग्रस्त असल्याचे आढळून येते. हा रक्त कर्करोगाचा एक प्रकार आहे जो लसीका प्रणालीवर परिणाम करतो. तर दहा टक्के मुलांना हाडांच्या गाठींचा त्रास आहे. म्हणजेच हा कर्करोग हाडांमध्ये होतो. इतर ट्यूमर १० टक्के आढळतात. याचा अर्थ असा की शरीराच्या कोणत्याही भागात कर्करोगाची गाठ तयार होऊ शकते.

# प्राण्यातूनही कोरोनाचा धोका

नोंद घ्यावी

डॉ. कुंदन गायकवाड

चीनमधील एका संशोधन पथकाला अलिकडेच नवा कोरोना विषाणू सापडला. माणसाला प्राण्यांमधून या विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका आहे. याबाबतचा अभ्यास आणि संशोधन शी झेंगली यांनी केले आहे. कोरोना विषाणूवरील व्यापक संशोधनामुळे त्यांना 'बॅटवुमन' म्हणून ओळखले जाते.

वुहान विद्यापीठ आणि 'वुहान इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी'च्या संशोधकांसह त्या काम करतात. वुहान शहरातील प्रयोगशाळेतून कोरोना विषाणू लीक झाल्याचे आरोप यापूर्वी झाले होते. कोरोना कुठून आणि कसा आला याबाबत अद्याप ठोस माहिती नसली, तरी काही अभ्यासकांनी हा विषाणू वटवाघळांमधून आला असल्याचे सांगितले होते. दरम्यान, 'वुहान इन्स्टिट्यूट' कोरोनाच्या उद्रेकासाठी जबाबदार नसल्याचे शी झेंगली यांनी म्हटले आहे.



जपानी वटवाघळांत विषाणू

'साऊथ चायना मॉर्निंग साऊथ पोस्ट'च्या अहवालानुसार, संशोधनात म्हटले आहे की, 'एचकेयू५' हा नवीन प्रकारचा कोरोना विषाणू आहे. हाँगकाँगमधील जपानी पिपिस्ट्रेल वटवाघळांमध्ये हा विषाणू प्रथम आढळला होता. तो 'मर्बेकोवायरस सबजीन'पासून उद्भवतो. यामध्ये 'मिडल इस्ट रेस्पिरेटरी सिंड्रोम' (एमईआरएस) पासून होणाऱ्या विषाणूचा समावेश आहे. हा विषाणू 'एसीई २' रिसेप्टरशी संबंधित आहे. तो कोविड-१९ विषाणूद्वारे पसरला जातो. संशोधकांचे म्हणणे आहे की, हा विषाणू मानवांमध्ये पसरण्याचा धोका जास्त आहे; मात्र कोविड १९ प्रमाणे धोकादायक नाही.

संशोधकांच्या मते 'एचकेयू५' केवळ वटवाघळांपासून वटवाघळांपर्यंत नव्हे तर मानव आणि इतर सस्तन प्राण्यांमध्येही सहज पसरू शकतो. संशोधकांना असे आढळून आले की, विषाणूंचे नमुन्यांमधून वेगळे केले गेले, तेव्हा ते कृत्रिमरित्या वाढलेल्या पेशी तसेच मानवी पेशींना संक्रमित झाले.

शी झेंगली यांच्या टीमला आढळले आहे की, 'एचकेयू ५' आणि आंतरप्रजाती संसर्गाची शक्यता जास्त असू शकते. अशा परिस्थितीमध्ये या विषाणूवर अधिक लक्ष ठेवण्याची गरज आहे. दरम्यान, त्यांच्या टीमने स्पष्ट केले आहे की, त्याची कार्यक्षमता कोविड १९ विषाणूपेक्षा खूपच कमी आहे आणि 'एचकेयू५'कडे मानवाने धोका म्हणून पाहू नये.

# नैराश्याच्या गर्तेत?

खास बात



सध्याच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगात प्रत्येकावर ताणाने कुरघोडी केली आहे. आज मानसिक आणि शारीरिक ताणतणावांपासून कोणीही लांब राहिलेलं नाही. आयुष्यातल्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करताना प्रत्येकाला कधी ना कधी हरल्यासारखं, थकल्यासारखं वाटतं, आयुष्यात काहीच उरलेलं नाही अशी भावना निर्माण होते. ताणामुळे दैनंदिन आयुष्यातली कामं करताना अडचणी येतात. या स्थितीला नर्व्हस ब्रेकडाऊन असं म्हटलं जातं. नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नाही. मात्र नैराश्य, पोस्ट ट्रॉमेटिक स्ट्रेस डिसऑर्डरसारख्या मानसिक विकारांचे परिणाम विषद करण्यासाठी या शब्दाचा वापर केला जातो.

नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नसल्यामुळे याची लक्षणं व्यक्तिनुसार आणि त्याच्या मानसिक स्थितीनुसार बदलत राहतात. मात्र याची काही सर्वसाधारण लक्षणं असतात. सतत अस्वस्थ वाटणं, नैराश्य, भीतीची भावना वाढीस लागणं, झोपेत अडथळे येणं, आहाराच्या सवयींध्ये बदल होणं, एकाग्रता भंग पावणं, मनात आत्महत्येचे विचार येणं, मूड बदलत राहणं, श्वास घ्यायला त्रास होणं, छातीत दुखणं, चक्कर येणं, पोट बिघडणं, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी न होणं, एकटं राहणं ही नर्व्हस ब्रेकडाऊनची काही लक्षणं आहेत.

नर्व्हस ब्रेकडाऊनची बरीच कारणं असतात. प्रचंड ताण आणि दबावामुळे माणूस नैराश्याच्या गर्तेत जाऊ शकतो. जवळच्या व्यक्तीचा अचानक झालेला मृत्यू माणसाला निराश करून सोडतो. सततचा कामाचा ताण, आर्थिक चणचण, जबाबदाऱ्यांचं ओझं, अभ्यासाचा ताण, शारीरिक आणि मानसिक त्रास अशा असंख्य बाबी नर्व्हस ब्रेकडाऊनला कारणीभूत ठरू शकतात.

नर्व्हस ब्रेकडाउन किंवा इतर कोणत्याही मानसिक विकारावर उपचार आहेत. रुग्णाची मानसिक स्थिती आणि लक्षणं यावर उपचारांची दिशा ठरते. उपचारांची पद्धत व्यक्तिनुसार बदलत रहाते. लक्षणांनुसार डॉक्टर समुपदेशन किंवा सायकोथेरेपीचा सल्ला देतात. काही औषधंही लिहून दिली जातात. यात नैराश्य कमी करणाऱ्या औषधांचा समावेश असतो.

जीवनशैलीतले काही बदलही नर्व्हस ब्रेकडाऊन, नैराश्य, ताण अशा मानसिक आजारांना आळा घालू शकतात. हा त्रास कमी करण्यासाठी वादविवाद लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. शरीरासोबत मनाला आराम देणारे योगा, मेडिटेशन, दीर्घ श्वसन असे व्यायाम नियमितपणे करा. दररोज किमान ३० मिनिटं व्यायाम केल्याने बराच फरक पडू शकतो. घराबाहेर पडा, आवडीच्या गोष्टी करा. एकटेपणामुळे नैराश्यात वाढ होऊ शकते. त्यामुळे वेगवेगळ्या लोकांशी संवाद साधा, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हा. झोपण्याच्या वेळा निश्चित करा. सकस आहार घ्या. अल्कोहोल, कॅफेन यांचं सेवन कमी प्रमाणात करा. काही कारणांमुळे आयुष्यात नैराश्याचे प्रसंग येतात. पण याचा अर्थ तुम्ही नर्व्हस ब्रेकडाऊनला बळी पडला आहात असा होत नाही. त्यामुळे लक्षणं जाणून मगच उपचार करा.

# मध्यरात्री भूक लागते?

लाईफस्टाईल

रात्री झोपण्याच्या किमान दोन तास आधी जेवावं, असा सल्ला नेहमीच दिला जातो. मात्र काम किंवा इतर कारणामुळे होणारे जागरण, लवकर जेवणं यामुळे रात्री उशिरा भूक लागू शकते. अशा वेळी वेफर्स, चॉकलेट्स, आईस्क्रीमसारखे अनारोग्यदायी पदार्थ खाल्ले जातात. मात्र रात्री भूक लागल्यानंतर खाता येणारे काही आरोग्यदायी पदार्थही आहेत. अशा पदार्थांमुळे तुमच्या कॅलरीही वाढणार नाहीत आणि रात्री त्रासही होणार नाही. कोणते आहेत हे पदार्थ? जाणून घेऊ.



तुम्ही मध्यरात्री विविध प्रकारच्या बिया आणि सुका मेवा हे मिश्रण खाता येईल. यात भरपूर पोषणमूल्य असतात. मात्र हे पदार्थ मर्यादित प्रमाणात खायला हवेत. रात्रीच्या वेळी उकडलेली अंडी चालून जाईल. एका मध्यम आकाराच्या उकडलेल्या अंड्यात फक्त ७८ कॅलरी असतात. तसंच अंडं हा प्रथिनांचाही स्रोत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अंड खाता येईल. फायबरयुक्त ओट्समुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. यातल्या पोषणमूल्यांमुळे तुम्हाला छान झोपही लागेल. वेगळा पदार्थ म्हणून तुम्ही पॉपकॉर्नही खाऊ शकता.

# स्मरणशक्ती सुधारायची तर...

आयुर्वेद आणि विकार

स्मरणशक्ती टिकून रहावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण सध्याच्या काळात अनेक कारणांमुळे विस्मरणाचं प्रमाण वाढत चाललं आहे. तल्लख बुद्धीसाठी तसंच स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यासाठी काही आयुर्वेदिक औषधी उपयुक्त ठरू शकतात. अशाच काही औषधींविषयी...

*ब्राह्मी

हा स्मरणशक्ती सुधारण्याचा रामबाण उपाय आहे. गुणधर्मामुळे ब्राह्मीवर बरंच संशोधनही झालं आहे. ब्राह्मीच्या सेवनाने मेंदूची क्षमता सुधारते. यासोबतच या औषधामुळे मेंदू ताजातवाना होतो. आपल्याला खूप शांत वाटतं. ताण कमी करण्यासाठीही ब्राह्मीचा वापर करता येईल.

*जिंको नामक आयुर्वेदिक औषधावर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. जिंकोमुळे मज्जासंस्थेचं रक्ताभिसरण सुधारून मेंदूला चालना मिळते. यासोबतच या औषधामुळे शरीरातल्या विविध पेशींना झालेलं नुकसानही भरून काढतं.

*अश्वगंधामुळेही मेंदूची सर्वांगिण कार्यक्षमता वाढते आणि स्मरणशक्तीही सुधारते.



*ज्येष्ठमधही मेंदूच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त औषध आहे. ज्येष्ठमधाच्या सेवनानंतर आपल्याला खूप शांत वाटतं. ताण, चिंता, काळजी अशा मानसिक आजारांवरही ज्येष्ठमध उपयुक्त ठरतो. त्यामुळे ज्येष्ठमधाचं नियमित सेवन करायला हवं.

# योगा करताना चुका टाळा

कुठे चुकतो?

योगासनामुळे आरोग्य उत्तम रहायला मदत होत असली तरी ही आसनं योग्य पद्धतीने करणेही गरजेचं असतं कारण योगासनं करताना होणाऱ्या काही चुकांमुळे त्रास होऊ शकतो. त्यातही नवखे असताना बरीच काळजी घ्यावी लागते. नवख्यांनी योगा क्लासमध्ये पहिल्या रांगेत बसण्याऐवजी शक्यतो मागे बसावं. यामुळे योगा प्रशिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष ठेवता येईल. दुसरं म्हणजे क्लासमधल्या इतरांची कृतीही न्याहाळता येईल.



काहीजण श्वास जास्त वेळ रोखून धरतात. पण हे चुकीचं आहे. ३० सेकंदांपेक्षा जास्त वेळ श्वास रोखून धरू नये. श्वास जास्त काळ रोखून धरल्यामुळे शरीरातल्या ऑक्सिजनच्या प्रवाहावर परिणाम होऊन घुसमटल्यासारखं वाटू शकतं. योगा करताना शरीराची स्थिती योग्य असणंही तितकंच गरजेचं आहे. बसण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे योगाचे काहीच लाभ मिळणार नाहीत. शिवाय इतर दुखणी मागे लागू शकतात. अखेरच्या टप्प्यात शवासन केलं जातं. यामुळे योग केल्यानंतर शरीराला आराम मिळतो. म्हणूनच शवासन टाळू नये. महत्त्वाचे म्हणजे भरल्या पोटी योगा करू नये.

rashtrasanchar.com
RASHTRA SANCHAR/ PUNE/ Marathi/ RNI Reg. No. MAHMAR/2023/89220
गुरुवार, २४ जुलै २०२५


# SPORTS



## बुमराने झोकून द्यावे, अन्यथा विश्रांती घ्यावी

**मँचेस्टर :** एक तर झोकून देऊन खेळ कर किंवा सामन्यांचा ताण या कारणामुळे निवडक लढतीत खळण्यापेक्षा पूर्ण विश्रांती घे, असा जसप्रीत बुमराला स्पष्ट आणि थेट सल्ला माजी वेगवान गोलंदाज इरफान पठाणने दिला आहे. इंग्लंडविरुद्धच्या निर्णायक चौथ्या कसोटीच्या पूर्वसंध्येला, इरफान पठाणने बुमराच्या चेंडूवरील अफाट कौशल्याचं कौतुक केलं, पण गरज असेल तेव्हा 'थोडं अधिक' देण्याचंही आवाहन केले. मी जसप्रीत बुमराच्या कौशल्याचा चाहता आहे. तो विलक्षण आहे, पण देशासाठी खेळता तेव्हा तुम्हाला सर्वस्व द्यावे लागते. पाच षटकांचा स्पेल झाला आणि रूट फलंदाजीला आला की तू सहावे षटक का टाकत नाही? त्यामुळे सर्वस्व दे अन्यथा नीट विश्रांती घे, अशा शब्दात पठाणने आपल्या यूट्युब चॅनेलवर म्हटले आहे. बुमरा पाच पैकी तीनच सामन्यात खेळेल, असे इंग्लंड दौऱ्यास रवाना होण्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी जाहीर केले होते. यातील एका सामन्यात बुमरा खेळला नाही.

# भारताच्या पोरींनी रचला इतिहास!

## इंग्लंडमध्ये जाऊन जिंकल्या सलग दोन मालिका; हरमनप्रीत कौरचे शतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**इंग्लंड :** भारतीय महिला संघाने इंग्लंडमध्ये इतिहास रचला. त्यांनी पहिल्यांदा इंग्लंडमध्ये सलग दोन मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. तिसऱ्या आणि शेवटच्या वन डे सामन्यात हरमनप्रीत कौरच्या या संघाने १३ धावांनी इंग्लंडच्या महिला संघाला पराभूत केले आणि मालिका २-१ ने खिशात घातली. यापूर्वी पाच सामन्यांच्या ट्वेंटी-२० मालिकेत भारतीय संघाने ३-२ असा विजय मिळवला होता. भारताच्या ३१९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडला ३०५ धावांवर समाधान मानावे लागले. क्रांती गौडने सहा विकेट्स घेतल्या.

प्रथम फलंदाजीला आलेल्या भारताला अपेक्षित सुरुवात करता आली नाही. प्रतिका रावल २६ धावांवर बाद झाली. त्यानंतर स्मृती मानधना व हर्लीन देओल यांनी डाव सारवला होता. पण, १८व्या षटकात स्मृती बाद झाली. तिने ५४ चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने ४५ धावा केल्या. हर्लीन व कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी तिसऱ्या विकेटससाठी ८१ धावा जोडल्या. हर्लीनने ६५ चेंडूंत ४५ धावा केल्या.


हरमनप्रीत व जेमिमा रॉड्रीग्ज या जोडीने इंग्लंडच्या गोलंदाजांच्या नाकीनऊ आणले. चौथ्या विकेटसाठीस दोघींनी ११० धावा जोडल्या. जेमिमा ४५ चेंडूंत ७ चौकारांसह ५० धावांवर बाद झाली. रिचा घोषने १८ चेंडूंत ३८ धावांची नाबाद खेळी करताना संघाला ३१८ धावांपर्यंत पोहोचवले. हरमनप्रीतने ८४ चेंडूंत १४ चौकारांसह १०२ धावांची खेळी केली.

लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचे दोन्ही ओपनर एमी जोन्स व टॅमी बियमोंट यांना क्रांती गौडने बाद केले. एमा लॅम्ब व कर्णधार नॅट शीव्हर ब्रंट यांनी संघाचा डाव सावरला. लॅम्बने ६८ धावांची खेळी केली. सोफी डंक्ली ( ३४) व एलिस डेव्हिडसन रिचर्ड्स ( ४४) यांनी इंग्लंडच्या आशा जीवंत ठेवल्या होत्या. दुसऱ्या बाजूने ब्रंट शतकाजवळ पोहोचली होती.

पण, ३५ व्या षटकात ब्रंटला माघारी जावे लागले. तिने १०५ चेंडूंत ११ चौकारांसह ९८ धावांची खेळी केली. चार्ली डीन ( २१) व लिन्सी स्मिथ ( १४*) यांचा संघर्ष अयशस्वी ठरला आणि इंग्लंडचा संपूर्ण संघ ४९.५ षटकांत ३०५ धावांत तंबूत परतला. क्रांती गौडने ५२ धावांत ६ विकेट्स घेतल्या. श्री चरणीने दोन, तर दीप्ती शर्माने १ बळी टिपला. भारताचा हा इंग्लंडमध्ये तिसरा वन डे मालिका विजय ठरला. यापूर्वी १९९९ मध्ये २-१ आणि २०२२ मध्ये ३-० अशी वन डे मालिका भारताने जिंकली होती.

# त्याच्या डोळ्यादेखत १५ खेळाडूंनी केले पदार्पण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत पिछाडीवर पडलेल्या भारतीय संघाला चौथ्या कसोटीत तीन बदल करावे लागले. नितीश कुमार रेड्डी व आकाश दीप यांना दुखापतीने सतावल्याने बाहेर बसावे लागले, तर फॉर्मात नसलेल्या करुण नायरला अखेर प्लेइंग इलेव्हनमधून हाकलले गेले. भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये शार्दूल ठाकूर व बी साई सुदर्शन यांचे पुनरागमन झाले आहे, तर अंशूल कंबोजला पदार्पणाची संधी दिली आहे. हे बदल होत असताना पुन्हा एकदा एक खेळाडू दुर्लक्षित राहिला आहे आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ७८००+ करण्याचा उपयोग काय? असा सवाल आता होताना दिसतोय...

लॉर्ड्स कसोटी थोडक्यात गमावल्यामुळे भारतीय संघ मालिकेत १-२ असा पिछाडीवर पडला आहे आणि मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्डवर त्यांना पहिला विजय खुणावतोय. आतापर्यंत इथे भारताला एकही कसोटी सामना जिंकता आलेला नाही आणि तो इतिहास बदलण्यासाठी शुभमन गिलचा संघ सज्ज आहे. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय भारताच्या पथ्यावर पडू शकतो. आतापर्यंत झालेल्या ८५ कसोटीत फक्त ११ कर्णधारांनी टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकदाही प्रथम गोलंदाजी करणारा संघ जिंकलेला नाही.

# बांगलादेशच्या 'वाघां'कडून पाकिस्तानची शिकार! शेवटच्या षटकात नाक घासायला लावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** बांगलादेशने घरच्या मैदानावर सुरू असलेल्या ट्वेंटी-२० मालिकेत पाकिस्तानला नाक घासायला भाग पाडले आहे. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या सामन्यात बांगलादेशने थरारक विजयाची नोंद करताना ट्वेंटी-२० मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. पहिल्या सामन्यातील पराभवानंतर मुख्य प्रशिक्षक माइक हेसन यांनी खेळपट्टीवर खापर फोडले होते, आता ते काय कारण देणार, याची उत्सुकता आहे.

बांगलादेशच्या १३३ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ १२५ धावांत तंबूत परतला. दुसऱ्या सामन्यात आठ धावांनी विजय मिळवल्यानंतर बांगलादेशने पाकिस्तानविरुद्ध पहिला ट्वेंटी-२० मालिका जिंकली. खचाखच भरलेल्या शेरे बांगला नॅशनल स्टेडियमने यजमान संघाला फहीम अशरफच्या आक्रमक गोलंदाजीने रोखून रोमांचक शेवट मिळवून दिला .

या सामन्यात पाकिस्तानचे सहा फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत, मागील सामन्यातही पाच जण एकेरी धावसंख्येवर बाद झाले होते. दुसऱ्या सामन्यात त्यांच्या तळाच्या फलंदाजांनी संघर्ष दाखवला होता, परंतु त्यांना अपयश आहे. अशरफने अब्बास आफ्रिदीसोबत नवव्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी करत आपले पहिले ट्वेंटी-२० अर्धशतक पूर्ण केले.बांगलादेशने संयम दाखवताना शोरिफुल इस्लाम , मुस्तफिजूर रहमान आणि तन्झिम हसन या वेगवान गोलंदाजांच्या जोरावर पाहुण्या संघावर दबाव आणला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशकडून जाकेर अलीने ५५ आणि महेदी हसनने ३३ धावांची खेळी केली. हे दोन फलंदाज वगळता बांगलादेशच्या परवेझ होसैन इमोन ( १३) याला दुहेरी आकडा गाठता आला. उर्वरीत ७ फलंदाज एकेरी धावसंख्येवर माघारी परतले. पाकिस्तानच्या सलमान मिर्झा, अहमद दनियाल व अब्बास आफ्रिदी यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या पाकिस्तानचा निम्मा संघ १५ धावांत तंबूत परतला होता. शोरिफूल इस्लाम व तंझीम हसन साकिब यांनी टिच्चून मारा केला. फहिम अशरफने ३२ चेंडूंत ५१ धावांची खेळी करून पाकिस्तानला विजयाची आस दाखवली होती. त्याला अब्बास आफ्रिदी ( १९), खुशदिल शाह ( १३) व अहमद दानियाल ( १७) यांनी साथ दिली. शेवटच्या षटकात विजयासाठी ९ धावा हव्या असताना अहमदने उत्तुंग फटका मारला, परंतु सीमारेषेवर त्याचा झेल टिपला गेला अन् पाकिस्तानचा संपूर्ण संघ १२५ धावांवर गडगडला. बांगलादेशच्या शोरिफूलने ३, तर महेदी हसन व तंझिम यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

# दक्षिण कोरियातील जागतिक तायक्वांदो स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंची १६ पदकांची कमाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** दक्षिण कोरियात नुकत्याच पार पडलेल्या १८ व्या वर्ल्ड तायक्वांदो कल्चरल एक्स्पो २०२५ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुण्याच्या आठ खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत ४ सुवर्ण, १० रौप्य आणि २ कांस्य पदकांची कमाई केली. हे खेळाडू आर. बी. होरांगी तायक्वांदो अकादमी आणि सेंट फेलिक्स हायस्कूलचे विद्यार्थी असून त्यांना प्रशिक्षक मास्तर रवींद्र भांडारी यांचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेत पुमसे आणि क्युरोगी प्रकारांत आयुषी भांडारी, झोया खान, हर्ष निकम आणि वाल्मीकी चौरसिया यांनी प्रत्येकी एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवले. समीक्षा साबळे आणि पवन ननावरे यांनी प्रत्येकी दोन रौप्य पदके पटकावली. स्वलिहा खान आणि अनुष्का चिनाय्या यांनी प्रत्येकी एक रौप्य आणि एक कांस्य पदक मिळवले.

दक्षिण कोरियातील कुकिवॉन - वर्ल्ड तायक्वांदो मुख्यालय येथे खेळाडूंना अधिकृत सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर खेळाडूंनी वर्ल्ड हपकीदो आणि कुमदो मार्शल आर्ट्स फेडरेशनचे अध्यक्ष ग्रँडमास्टर डॉन ओ चोई यांच्या डोजांगमध्ये प्रशिक्षण घेतले आणि त्यांच्याकडून ब्लॅक बेल्ट प्रमाणपत्रे व सुवर्ण पदके मिळवली.

तसेच खेळाडूंनी कोरिया शिन (९ वा डॅन, चंग-डो क्वान), ग्रँडमास्टर ह्युंगनाम क्वोन (९ वा डॅन, पूमसे प्रशिक्षक) आणि ऑलिंपिक सुवर्ण पदक विजेते ग्रँडमास्टर मून डे-सुंग यांच्याकडून प्रशिक्षण घेतले आणि वैयक्तिक सन्मान व प्रमाणपत्रे प्राप्त केली.

# न्यूझीलंड तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीत:आफ्रिकेचा पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हरारे :** झिम्बाब्वेमध्ये सुरू असलेल्या तिरंगी मालिकेत न्यूझीलंडने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मंगळवारी रात्री संघाने दक्षिण आफ्रिकेचा ७ विकेट्सने पराभव केला. न्यूझीलंड संघ २६ जुलै रोजी दक्षिण आफ्रिकेसोबत अंतिम सामनाही खेळेल. मंगळवारी हरारे स्पोर्ट्स क्लब येथे झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून १३४ धावा केल्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडने १५.५ षटकांत ३ गडी गमावून १३५ धावांचे लक्ष्य गाठले. संघाचा सलामीवीर टिम सेफर्टने ६६ धावांची नाबाद खेळी केली. त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने खराब सुरुवात असूनही १३४ धावा केल्या. एका टोकाकडून संघाचे विकेट पडत राहिले, तर दुसऱ्या टोकाकडून सलामीवीर रीझा हेन्ड्रिक्स धावा काढत राहिली. सलामीवीर रॅसी व्हॅन डर ड्यूसेनने १४, रुबिन हरमनने १० आणि डेवाल्ड ब्रेव्हिसने १३ धावा केल्या आणि लुआन डर प्रिटोरियस एक धाव घेत बाद झाला. रीझा हेन्ड्रिक्सने ४१ धावांची खेळी करत संघाला १०० धावांच्या पुढे नेले. रीझा व्यतिरिक्त जॉर्ज लिंडेने नाबाद २३ धावांचे योगदान दिले.

# बीसीसीआय राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या कक्षेत येईल

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आता राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या कक्षेत येईल. हे विधेयक बुधवारी संसदेत मांडले जाईल. वृत्तसंस्था पीटीआयने क्रीडा मंत्रालयातील सूत्रांचा हवाला देत म्हटले आहे की, 'जेव्हा हे विधेयक कायदा बनेल, तेव्हा बीसीसीआयला



त्याचे पालन करावे लागेल. जसे इतर राष्ट्रीय क्रीडा संघटना देशाच्या कायद्यांचे पालन करतात.' २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश झाल्यानंतर, बीसीसीआय आता ऑलिंपिक चळवळीचा एक भाग बनला आहे. वेळेवर निवडणुका, प्रशासकीय जबाबदारी आणि क्रीडा संघटनांमध्ये खेळाडूंच्या कल्याणासाठी एक मजबूत रचना निर्माण करण्यासाठी हे विधेयक आणले जात आहे. बीसीसीआयचे माजी सचिव संजय जगदाळे यांनी याबाबत सांगितले- या विधेयकाच्या कक्षेत बीसीसीआय आणण्याची मला कोणतीही शक्यता दिसत नाही. मला वाटते की बीसीसीआय ही सर्वात पद्धतशीरपणे चालवली जाणारी संघटना आहे. संघही चांगली कामगिरी करत आहे. अशा परिस्थितीत, भारतातील इतर राष्ट्रीय क्रीडा संघटनांनी बीसीसीआयकडून शिकावे आणि ते सरकारच्या कक्षेत आणू नये.

# महिला वनडे रँकिंग- दीप्ती शर्माला १० स्थानांचा फायदा



**दुबई :** आयसीसी महिला क्रमवारीत भारत आणि इंग्लंडच्या खेळाडूंना फायदा झाला आहे. भारताची अष्टपैलू दीप्ती शर्माने फलंदाजांच्या क्रमवारीत १० स्थानांची झेप घेतली आहे. तिने पहिल्या एकदिवसीय सामन्यात नाबाद ६२ आणि दुसऱ्या सामन्यात ३० धावा केल्या. आता ती २३ व्या स्थानावर पोहोचली आहे. इंग्लंडच्या सोफिया डंकलीने पहिल्या सामन्यात ८३ धावा केल्या आणि २४ स्थानांनी प्रगती करत ५२ व्या स्थानावर पोहोचली. ॲलिस डेव्हिडसन-रिचर्ड्सनेही ५३ धावा करत ४० स्थानांनी प्रगती करत ११८ व्या स्थानावर पोहोचली. भारताची स्टार फलंदाज स्मृती मंधानाने मालिकेत २८ आणि ४२ धावा केल्या आणि ७२७ च्या रेटिंगसह फलंदाजी क्रमवारीत तिचे अव्वल स्थान कायम ठेवले. इंग्लंडची सोफी एक्लेस्टन एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. तिने दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये चार विकेट्स घेतल्या, ज्यामध्ये दुसऱ्या सामन्यात ३/२७ चा आकडा समाविष्ट आहे. तिचे रेटिंग ७७६ पर्यंत वाढले आणि तिने आपले अव्वल स्थान मजबूत केले. इंग्लंडच्या चार्ली डीन आणि भारताच्या स्नेह राणा यांनी प्रत्येकी तीन बळी घेत फिरकी गोलंदाजांचा या मालिकेत दबदबा राहिला. डीनने टॉप १० मध्ये प्रवेश केला आहे आणि तो ९ व्या क्रमांकावर आहे, तर स्नेह राणा १२ स्थानांनी पुढे सरकून २१ व्या स्थानावर पोहोचली आहे. डीनने अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीतही प्रगती केली आहे आणि ऑस्ट्रेलियाच्या ॲलिस पेरीसह संयुक्तपणे १४ व्या स्थानावर आली आहे. सोफी एक्लेस्टननेही अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत तीन स्थानांनी प्रगती करत १८ व्या स्थानावर पोहोचली आहे. आयर्लंडच्या खेळाडूंनी टी-२० क्रमवारीतही मोठी झेप घेतली आहे. कर्णधार गॅबी लुईसने झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात ६७ धावा केल्या आणि ती फलंदाजांच्या क्रमवारीत पाच स्थानांनी पुढे सरकली.

# राजीव शुक्ला म्हणाले- आम्ही अभ्यास करून बोलू

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी बुधवारी सांगितले की, ते प्रथम राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाचा अभ्यास करतील आणि त्यानंतरच



त्यावर त्यांचे मत व्यक्त करतील. मंगळवारी क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले की, बीसीसीआय आता राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या कक्षेत येऊ शकते. हे विधेयक आज संसदेत मांडले जाईल. २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश झाल्यानंतर, बीसीसीआय आता ऑलिंपिक चळवळीचा एक भाग बनले आहे. क्रीडा संघटनांमध्ये वेळेवर निवडणुका, प्रशासकीय जबाबदारी आणि खेळाडूंचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी एक मजबूत रचना तयार करण्यासाठी हे विधेयक आणले जात आहे. विधेयक सादर होण्यापूर्वी शुक्ला यांनी त्यावर भाष्य करण्याचे टाळले आणि एएनआयला सांगितले की, "विधेयक सादर झाल्यानंतर आपल्याला त्याचा अभ्यास करावा लागेल. त्यानंतरच मी त्यावर माझे मत व्यक्त करू शकेन." यापूर्वीही बीसीसीआयला सरकारच्या कक्षेत आणण्याचे प्रयत्न झाले आहेत. बीसीसीआय तामिळनाडू सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९७५ अंतर्गत नोंदणीकृत आहे. भारतातील क्रिकेटच्या सर्व पैलूंवर स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देखरेख करण्याची जबाबदारी बीसीसीआयवर आहे. सध्या बीसीसीआय ४५ मान्यताप्राप्त राष्ट्रीय क्रीडा संघटनांच्या अंतर्गत येत नाही.

# भारताचे कुस्तीपटू मॅटवर उतरण्याआधीच चितपट? १७ वर्षांखालील स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** जागतिक विद्यापीठ स्पर्धेमध्ये सहा बॅडमिंटनपटूंवर अन्याय झाल्यानंतर आता भारतातील युवा कुस्तीपटूंवर १७ वर्षांखालील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी मॅटवर उतरण्याआधीच चीतपट होण्याची नामुष्की ओढावण्याची शक्यता आहे. ग्रीसमधील अथेन्समध्ये २८ जुलै ते ३ ऑगस्ट यादरम्यान १७ वर्षांखालील जागतिक अजिंक्यपद स्पर्धा खेळवण्यात येणार आहे, मात्र ग्रीस दूतावासाकडून भारतातील युवा कुस्तीपटूंच्या व्हिसा मुलाखतीच्या विनंतीला प्रतिसाद देण्यात आलेला नाही.

भारतीय कुस्ती संघटनेकडून १० जुलै रोजी मुलाखतीसाठी अर्ज करण्यात आला होता, पण आता १२ दिवस उलटून गेले असले तरी कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. भारतीय कुस्ती संघटनेकडून १६ जुलै रोजी परराष्ट्र मंत्रालयाकडे मध्यस्थी करण्याची विनंतीही करण्यात आली.

भारतीय कुस्ती संघटनेचे अध्यक्ष संजय सिंह यांनी या प्रकरणाबाबत मत व्यक्त करताना म्हटले की, गृह मंत्रालय व परराष्ट्र मंत्रालय यांना आमच्याकडून मध्यस्थी करण्याची विनंती करण्यात आली आहे, पण ग्रीस दूतावासाकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.

## इंग्लिश-ग्रीनची १३१ धावांची भागीदारी; रसेलने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला

# ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजला हरविले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जमैका :** जमैकाच्या सबिना पार्क येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजचा ८ विकेट्सने पराभव करून तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी निर्णायक आघाडी घेतली. हा विजय ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीचा परिणाम होता, ज्यामध्ये जोश इंग्लिश आणि कॅमेरॉन ग्रीन यांच्या नाबाद भागीदारीने महत्त्वाची भूमिका बजावली.

वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करताना ८ गडी गमावून १७२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने १७३ धावांचे लक्ष्य १५.२ षटकांत २ गडी गमावून पूर्ण केले.

ब्रँडन किंग-शाई होपने संघाला चांगली सुरुवात दिली नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजला सलामीवीर ब्रँडन किंग आणि शाई होप यांनी चांगली सुरुवात करून दिली. दोघांनीही पहिल्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी केली. किंगने ३६ चेंडूत ५१ धावा केल्या. किंग बाद झाल्यानंतर कोणताही फलंदाज ४० पेक्षा जास्त धावा करू शकला नाही. शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळणाऱ्या आंद्रे रसेलने १५ चेंडूत ३६ धावा करून संघाचा धावसंख्या १७२ पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ॲडम झम्पाने ३ विकेट घेतल्या ऑस्ट्रेलियाकडून ॲडम झांपा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ४ षटकांत २९ धावा देत ३ बळी घेतले. त्याच्याशिवाय ग्लेन मॅक्सवेल आणि नॅथन एलिस यांनी प्रत्येकी २-२ बळी घेतले. ऑस्ट्रेलियाने पहिली विकेट फक्त १३ धावांवर गमावली १७३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवात चांगली झाली नाही. त्यांची पहिली विकेट १३ धावांवर पडली. सलामीवीर ग्लेन मॅक्सवेलने १० चेंडूंचा सामना केला आणि १२ धावा केल्या. कर्णधार मिचेल मार्शही ४२ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने १७ चेंडूत २१ धावा केल्या.

#रा